साप्ताहिक

# माणूस

३१ मार्च ८४ दोन रुपये






## क्या बिहार भी असम बनेगा?



## एका सामुदायिकाकडे

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : चव्वेचाळीसावा

३१ मार्च १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार..

डोंगराच्या पोटाशी पाय दुमडून पडावं तसं हे 'नवेगाव' सटाण्यापासून अवघं सात किलोमीटर. चंद्रावर माणसं पोहोचलीत; परंतु ह्या गावात १९८४ साल उजाडलं तरी एस्. टी. गेलेली नाही! म्हणावं तसं आदिवासंचही हे गाव नाही. सगळी रजपूत वस्ती! दरिद्री, रोगट. शेळ्या-मेंढ्या आणि म्हशींचं दूध एकत्र करून हे रहिवासी बाराही महिने सटाण्यात दूध आणून पोहचवतात, अर्थात पाण्याशिवाय दूध देत नाहीत! गावात मात्र पाण्याचं अतोनात दुर्भिक्ष. 'गावात एक पाणवठा'– ही बाबा आढावांची कृत्रिम कल्पना इथे निसर्गाने अनादी कालापासून साकार ठेवली आहे. उन्हाळ्यात ही विहीर आटली की शासन त्यात टँकरने पाणी ओतत असते!

अशा ह्या गावात परवाच ग्रामपंचायतचं इलेक्शन एकमताने म्हणजे बिनविरोध पार पडलं!

त्याचं असं झालं. गावात इनुमिन दोनच माणसं मालदार. दोघेही दुकानदार. बाकी जनतेची हाता-तोंडाशी गाठ. ह्या असामींपैकी एकजण कवडीचुंबक. राहता राहिला एक. गावात एकूण मते सातशेवीस. त्या मतांचा लिलाव झाला. 'हायेस्ट बीटिंग' म्हणजे ३२५० रु. ला त्या दुकानदाराने सर्व मतदार विकत घेतले! (तो पैसा हा गावकीच्या सार्वजनिक सोयीसाठी खर्च करणार असं म्हणतात!)

आणि त्यामुळे तो म्हणेल ती माणसं निवडून आली. आता आपलं नाव यावं ह्यासाठी काहींनी त्याला पैसे दिले. येवढे ठीक झाले!

आता सरपंच हा शेठ निवडणार आणि जो सरपंच होण्यासाठी ह्याला जास्तीत जास्त पैसा देणार त्याला हा सर्वसभासदांना मतं द्यायला सांगणार. म्हणजे हा व्यापारी आता ३२५० चे पाच हजार करतो की काय देव जाणे! आहे की नाही लोकशाहीचा (सर)पंचनामा!

१० मार्च ८३ डॉ. मोहन माजगावकर
सटाणा

दि. १७ मार्च ८४ रोजीचा आपला अंक वैचारिक दृष्टीने उत्कृष्ट आहे. पंजाब–आसामच्या मार्गाने कसा जाणार याचे चांगले विवरण करून वाचकाला विचार करायला लावले आहे. आज कित्येक दिवस पंजाबच्या वाढत्या हिंसाचाराबाबत वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून नित्य लिहिले जाते; परंतु तरीसुद्धा सरकार अगदी स्वस्थ बसले आहे. अकालींच्या धार्मिक मागण्या मान्य झाल्या आहेत. मग त्यांना अजून काय हवे आहे? हे लोक स्वत:ला संत, साधू म्हणवून घेतात. संत भिंद्रनवाले जर सच्च्या धर्माचे पुरस्कर्ते आहेत तर त्यांनी व अकाली नेत्यांनी हे काय चालवले आहे? हे आपापसातील कलह आहेत, की धर्माविरुद्धचे बंड? राजरोसपणे गोळीबार होतो तोही गुरुद्वाराच्या पवित्र ठिकाणी! अकाली काय किंवा भिंद्रनवाले काय यांच्यात साधं माणूसपण राहिलेलं नाही. हे कसले संत? हे कसली धर्माची जोपासना करणार? धर्मातील लोक प्रेम करायला शिकवितात. धर्म हिंसाचार, क्रोध शिकवीत नाही.

आजपर्यंत एवढे निरपराध लोक बळी गेले, हे लोक लुटालूट जाळपोळ बिनधास्त करतात आणि भिंद्रनवाले यांच्या आश्रयाला जातात; परंतु पोलीसदल अजूनही काही करू शकत नाही हे फारच लांछनास्पद आहे. त्यातून या पंजाबच्या समस्येला आसाम–प्रश्नासारखे सरकार कुजवू पहात आहे. सरकारचे हे मौन खेदजनक व त्याहून ते घातकही आहे. पंजाबच्या हिंसाचाराचे हे लोण साऱ्या देशभर पसरेल आणि मग ते लोण थांबवणं सरकारला महत् प्रयासाचं जाईल! घटना जाळून देशाचा अपमान होत असताना सरकारनं आपला तटस्थपणा निश्चितच सोडला पाहिजे. वादविवाद व चर्चा थांबवून सरकारने शक्य तितक्या लवकर हा प्रश्न शांततेने सोडवलाच पाहिजे तरच ही खळबळ थांबेल व ते सर्वांनाच हितकारक ठरेल!

१९ मार्च ८४ जा. द. डोंगरे
भायखळा

मुखपृष्ठावर : १. अ. भा. वि. प. तर्फे – गौहत्ती सत्याग्रह
२. कलकत्ता परिषदेत – प्रफुल्ल महंतो (बोलताना)
छायाचित्रात डावीकडून – न्या. हंसराज खन्ना, ले. जन. जगजितसिंग अरोरा.

# सर

**मी** जर्नलिझमला असतानाची गोष्ट आहे. सकाळी ११ वाजता पहिला तास असायचा. आठवड्यातून तीन वेळा पहिला तास चालू घडामोडी आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावर असायचा. तास घ्यायचे प्रभाकर पाध्ये. मला सरांचा पहिला तास आठवतोय. ते इतके काही आत्मविश्वासाने वर्गात शिरले ! अगदी हसत हसत. अभ्यासकाचा आणि विचारवंताचा चेहरा ते जणू काही विसरूनच गेले होते. ते आले होते गप्पा मारायला, मैत्री करायला. चॉकलेटी रंगाचा सूट आणि त्याच रंगाचा थोडा गडद टाय त्यांचा आवडता होता. बऱ्याच वेळा, नंतर मी त्यांना त्या पोशाखात पाहिलं, सर इतके निटनिटके येत की, त्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासाला एक वेगळीच धार चढायची.

सरांची थोडी जवळून झालेली ही प्रथम ओळख. मग कधी लेक्चरमधून कधी नंतरच्या गप्पांमध्ये सर त्यांच्या त्या खास चिरक्या आवाजात खूप शिकवत राहिले, सांगत राहिले. सरांच्या गप्पा आणि त्यांचं वर्गातलं शिकवणं यात फार फरक नसायचा. कारण शिकवताना एकाच विषयाचं आणि एकाच पद्धतीचं बंधन त्यांनी कधीच घालून घेतलं नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला उत्स्फूर्तपणा त्यांच्या प्रत्येक अविष्कारातून ओसंडत रहायचा. त्याच्यामुळं 'चालू घडामोडी' आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचा तास नेहमी जिवंत असायचा. सरांचं बोलणं कधीच साचलेल्या पाण्यासारखं नसायचं, सतत वहातं रहायचं. त्या ओघामध्ये बऱ्याच अडगळीतल्या आठवणी, घटना, प्रसंग धुऊन निघायचे.

आता जेव्हा आठवतं, की सरांचं शिकवणं एवढं का मनात ठळक राहिलं असेल ? हे असं स्पष्ट चित्र फक्त माझ्याच मनात असेल की, वृत्तपत्रविद्या-विभागात ज्यांनी सरांचे धडे घेतले त्या सगळ्यांच्या मनात असेल ? त्यांचं ते ठासून, आक्रमक बोलणं, दरवेळी नव्या आवेशानं स्वतःचा मुद्दा मांडणं, समोरच्याची प्रच्छन्न टीका करणं, वादामध्ये सर्व शक्तीनिशी पेटून उठणं या सरांच्या सगळ्या गुणविशेषांची नोंद मी खूप वेळा चार-चौघांकडून कधी थट्टेच्या सुरात, कधी उपहासाच्या सुरात, तर कधी मत्सराच्या सुरात ऐकली आहे; पण मला मात्र आठवतात ८-१० जणांच्या निवडक ग्रूपमध्ये सरांच्या रंगलेल्या गप्पा ! तो अगदी सहज संवाद असायचा. एकानं सांगणं आणि दुसऱ्यानं ऐकणं हे त्यांच्या स्वभावातच नव्हतं. त्यांच्या अभ्यासापुढं आणि वयापुढं खरं तर आम्ही अगदी पोरंसोरंच; पण आमच्या मनातल्या बाळबोध शंकांना ते इतक्या प्रामाणिकपणानं आणि मनापासून विचारपूर्वक उत्तर द्यायचे की, त्यांच्याशी बोलताना आपलं मत अगदी लाखमोलाचं असल्यासारखं वाटायचं. सर बहुतेक सगळ्या विद्यार्थ्यांना पहिल्या नावानं हाक मारायचे, समोरचा माणूस आपल्या पातळीवरचा आहे असं समजून बोलायचे. त्यांच्या वयाची भिंत आमच्याबरोबरच्या त्यांच्या नात्यात कधीच आली नाही.

कॉलेजचे ३-४ महिने होऊन गेले होते. एका रविवारी 'सती' प्रश्नावरील वृत्तपत्रातला माझा पहिला लेख केसरीमध्ये प्रसिद्ध झाला होता. त्या रविवारी फर्ग्युसन कॉलेजमध्ये 'कविता दशकाची' या ग्रंथालीच्या पुस्तकावर मोठा कार्यक्रम होता. सर तिथे आले होते. दुपारी सरांबरोबर बाहेर पडताना मी सहजच (की मुद्दाम ?) त्यांना सांगितलं की, माझा लेख प्रसिद्ध झालाय म्हणून.

सोमवारी सकाळी लेक्चरला सुरुवात होण्यापूर्वी सरांनी सगळ्या वर्गात माझ्या लेखाचं इतकं उघड कौतुक केलं की आश्चर्याचा धक्काच बसला, मग पुढे कौतुकाचे त्यांच्या तोंडचे अनेक उल्लेख वेगवेगळ्या व्यक्तींबद्दल ऐकले; पण त्यात कोणताच अभिनिवेश नसायचा. तो एक स्वच्छ मोकळा प्रतिसाद असायचा.

सरांना वर्गात शांतता, शिस्त वगैरे आवडायची नाही. त्यांना विद्यार्थ्यांच्या वादप्रतिवादात विशेष रस असायचा. मुलं शंका विचारतात म्हणजे अभ्यासाच्या पुढच्या पायरीवर ती यायला लागली आहेत, असं त्यांना बहुदा वाटायचं. मग एखाद्या दिवशी वर्गात उशीरा जाऊन मागे बसले की ते ओरडून सांगायचे 'मेधा, पुढे येऊन बस !

त्या वर्षाच्या मधल्या टप्प्यावर सरांच्या 'सौंदर्यानुभव' ग्रंथाला पुरस्कार मिळाला. आम्हीही अगाऊपणानं त्यांचं अभिनंदन केलं. बक्षिस मिळाल्याचा आनंद सरांना निश्चितच झाला होता. सौंदर्यशास्त्राचे प्राथमिक धडे ते तो विषय आमच्या कक्षेत नसताना जाता येता देतच असत, इतके ते त्याच्यात गुरफटलेले असायचे. अभिनंदन केल्यावर सरांना म्हटलं पार्टी पाहिजे ! ते अगदी पटकन आनंदानं तयार झाले. प्रौढ वयाच्या सर्वसाधारण व्यक्तींमध्ये तरुण मुला-मुलींबरोबर वावरण्याबद्दल जो एक गंड तयार होतो त्याचा लवलेशही त्यांच्यामध्ये नव्हता. पण ते म्हणाले, 'पार्टी करू; पण समोर रुपाली-वैशालीत नको. मला ते चीप वाटतं. तुम्ही घरी या.' तेव्हा सरांकडे प्रथम गेलो ते नंतर काही कारणानं, कधी फक्त गप्पा मारायला जातच राहिलो. सरांना व्यक्तीगत नात्यांमध्ये रस होता, विचाराचा एखादा सुद्धा नवा उन्मेष त्यांना काही काळ प्रभावित करत असे. त्याचा ते उघड उल्लेख करत. अनेक विषयात व्यासंग मिळवण्यासाठी त्यांनी ज्या पद्धतीनं अफाट वाचन केलं ते त्यांना आमच्याकडून हवं होतं.

बघता बघता वर्ष संपत चाललं. परीक्षा जवळ आल्या. आम्ही काही ठराविक ७-८ जण परिक्षेच्या दृष्टीने काही वाचन करण्यासाठी सरांच्या घरी जाऊन त्यांना त्रास देत असू तेव्हा त्यांना खरा आनंद झालेला मी पाहिलेला आहे. घरी जाताना ते आम्हाला सोडायला बाहेरच्या गेटपर्यंत येत, त्याच गेटपाशी उभं राहून ते एकदा 'माझी आता दोनच वर्षं राहिली आहेत' असं म्हणाले आणि पुन्हा त्यांच्या शैलीत अगदी मोकळं तोंडभर हसले.

नंतर काही काही सभांमध्ये सर पुन्हा पुन्हा भेटत राहिले. आवर्जून पत्र पाठवत राहिले. पत्रांची उत्तरं देत राहिले. बरोबरीच्या मित्रानं मैत्रिणीला लिहावीत अशी त्यांची पत्रं असायची. त्यांच्या त्या उभट तिरप्या अक्षरांमधून, ५-६ ओळींच्या पत्रातसुद्धा त्यांचं व्यक्तीमत्व जाणवायचं.

पर्यायी संमेलन असावं की नसावं यावद्दल मराठा चेंबरमध्ये एक जाहीर सभा झाली

होती. तिथे पाध्ये बोलले. नेहमीप्रमाणे वरच्या पट्टीत, तारस्वरात, हल्ला केल्यासारखे आणि विस्कळीत. सभा संपल्यानंतर मी त्यांना तसं बोलले तेव्हा म्हणाले, 'म्हणजे बहुदा मी आता म्हातारा झालोय!'

परवा परवा सहा–सात महिन्यांपूर्वी साहित्य परिषदेच्या सभागृहात विद्याधर पुंडलिक, स. शि. भावे, श्री. ग. मुणगेकर आणि रेखा इनामदार यांनी घेतलेली त्यांची प्रकट मुलाखत रंगली. प्रश्न विचारणाऱ्यांना पाध्ये या व्यक्तिबद्दल आदर आहे, प्रेम आहे त्यांना समजून घेण्याची उत्सुकता आहे हे त्यांच्या प्रश्नांतून जाणवत होतं आणि सर त्यामुळे सुखावले होते. ती मुलाखत सरांच्या विचारांची नव्हती, त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाची नव्हती–ती फक्त प्रभाकर पाध्ये या जहाल रसायनाची होती.

त्या सुमारास सर अधूनमधून आजारी असायचे; पण 'आभाळातील अक्षरे' ते ताज्या दमानं लिहितच होते. नवीन पुस्तकाचं लेखनही त्यांचं चालू होतं. हे सगळं त्यांना अगदी शोभणारंच होतं. परवा त्यांच्या मृत्यूची बातमी मात्र अचानकच प्रहार करून गेली. सरांचं शेवटचं दर्शन मी घेतलं नाही. ते आता आपल्यामध्ये नाहीत हेही पटत नाही. वाटतं सकाळी पावणेअकरा वाजता सरांची रिक्षा वृत्तपत्रविद्याविभागात थांबेल. कडक सुटातले नाही तर निर्मळ धोतर–कुडत्यातले सर त्यातून उतरतील, ताठ पावलं टाकत हसत हसत वर्गात येतील. एका प्रसन्न दिवसाची सुरुवात करून देतील आणि विषयाच्या ओघात गांधी, सावरकर, नेहरू, कोस्लर, विनोबा, डॉ. लोहिया यांचे जागते संदर्भ देत देत–व्यक्तिगत आणि सामाजिक आठवणींना उजाळा देत घटनांमध्ये रंगून जातील. 'मी नवशक्ती कसं सोडलं' आणि 'गांधींनी मला हाताला धरून कसं समोर बसवून घेतलं' या आठवणींमध्ये ते इतके रंगून जातील की, ते 'चालू घडामोडी' सहज विसरतील आणि तास संपल्यानंतरच्या गप्पा सुरू होतील आणि एखादा खोडसाळ प्रश्न विचारला तर एक टप्पल मारून गप्प बसवतील.

मेधा राजहंस

# करंजवणचे सामुदायिक

## श्री. ग. माजगावकर

गाव मुख्य डांबरी सडकेपासून दोन मैल आत आहे.
गावाकडे जाणारा कच्चा रस्ता रुंद आहे.
बैलगाडी, जीप नीट जाऊ–येऊ शकते.
गाव थोडे चढावर. रस्ता थोडा चढ–उतार असलेला.
रस्त्याच्या दोन्ही बाजूस निपचित पडलेली शेते.
काळपट, तपकिरी रंगाची. काही पिवळट.
दगडगोट्यांचा खच असलेली.
अधूनमधून काळे पाषाण वर उगवलेले.
हिरवळ फक्त निवडुंगांची.
लांबवर एक पिंपळ दिसतो आहे.
दहा–पाच झाडे आणखी असतील पर्णहीन.
झुडपांचा पत्ताच नाही.
दोन–चार बसक्या झोपड्या. काटक्यांच्या. रंग करडा.
दगडांची भिताडे-पडकी.
कुंपणे–बाभळीच्या काटक्याकुटक्यांची.
मार्च महिना. नांगरटी दिसायला हव्यात.
पण सगळीकडे सामसूम.
चिटपाखरू नाही. माणसांचा वावर नाही.
गाव लागण्यापूर्वी एक खोलगट जागा आहे.
दोन–चार झाडांची सावली आहे.
पाणवठ्याचे दर्शन येथे घडते.
गावापासून हे अंतर खूपच आहे.
पाण्याचे हंडे डोक्यावर घेऊन २–३ बाया चढावरून हळूहळू गावाकडे चालल्या होत्या.
गावात शिरताना प्रथम शाळा लागते.
दोन खोल्यांची छोटी शाळा. स्वच्छ.
भिंती न रंगलेल्या.
दुसऱ्या बाजूला एक लहानसा पार. पारावर एक दगडी कमान व कोनाडा. कोनाड्यात देवादिक. एक–दोन तसबिरी.
पारावरच एक ट्रान्सफॉर्मर गंजत पडलेला.
गावात वीज आलेली आहे.
गावचा मुख्य रस्ताही स्वच्छ वाटला; पण पडकी घरे खूप.
दुमजली घर एकच. गावात शिरतानाच दिसणारे.
गावची वसती असावी सातशे–आठशे.
गावाच्या मध्यभागी एक मोठा बुरूज आहे. ढासळलेला.
मी एकाला विचारले, एवढेसे गाव.. आसपास सगळी ओसाडवाडी. हा बुरूज मग कशासाठी बांधला गेला असावा ?
टेहळणीसाठी.
कसली टेहळणी ?
पूर्वी आसपास जंगल होते. चोर–दरोडेखोर, जनावरे त्यात असायची. त्यांची चाहूल अगोदरच लावून घेता यावी म्हणून पूर्वीच्या लोकांनी हा बुरूज बांधला. बुरुजावर चांगली लांब-रुंद सपाटी आहे.

बुरूज असलेले गाव म्हणजे एके काळचे मातब्बर गाव.

पण आज ढासळलेले–उध्वस्त–उजाड !

वर्षातले चार–सहा महिने गावातले बहुसंख्य लोक आपल्या बैलगाड्या घेऊन साखरकारखान्याकडे कामाला जातात. तेथे ऊस–तोडणी–वाहतुकीचे काम त्यांना मिळते. तेथेच खोपटात बायको–मुलांसह राहायचे. ऐन थंडीत. ऊसतोडणीचा हंगाम संपला की गावात परत यायचे. जमेल तशी शेती करायची. दुष्काळी भाग म्हणून शेती सगळी पावसावर अवलंबून. मशागतीची आबाळ आणि पाणी नाही. काय पिकणार ?

तरी गाव शांत आणि समाधानी आहे. गावावर धार्मिकतेचा पगडा जाणवतो.

वंझारी, मराठे, हरिजन अशी गावात मिश्र वस्ती आहे; पण तणाव नाही. दुफळ्या कमी. एकोप्याचे वातावरण जाणवते.

कुणी तीस–चाळीस एकरवाले आहेत. कुणी दहा–पाचवाले; पण भाग दुष्काळी असल्याने एकरांच्या संख्येला–हिशोबाला काही अर्थच नाही. एकरी दोन–तीन पोती बाजरी निघण्याचीही जेथे मारामार तेथे

कसला आला आहे बडा आणि छोटा शेतकरी? सगळेच बडे आणि सगळेच छोटे! साखर–कारखान्यावर बैलगाडी घेऊन बडाही जातो आणि छोटाही. सगळेच अर्धे मजूर आणि अर्धे मालक. शेती दुष्काळी. मजुरी तात्पुरती व अर्धवट. गाव सुटत नाही, शहर बोलवत नाही. सगळ्याच दुष्काळी गावांची ही स्थिती. पुण्या–मुंबईच्या झोपडपट्ट्या अशाच गावांहून आलेल्या शेतकरी–मजुरांनी खच्चून भरलेल्या आहेत. मराठवाड्यात तर अशा गावांची संख्या खूप.

या मराठवाड्यातलाच एक जिल्हा बीड. या बीड जिल्ह्यातला एक तालुका पाटोदा. या एका तालुक्यातून केवळ चौदा–पंधरा हजार बैलगाड्या दरवर्षी साखर–कारखान्याकडे जात असतात. पंधरा हजार बैलगाड्या म्हणजे सुमारे चाळीस–पन्नास हजार लोकवस्ती. एका बैलगाडीबरोबर किमान कुटुंबातले तीनजण तरी असावे लागतात.

हे दुष्काळचक्र वर्षानुवर्षे चालू आहे. हे थांबवावे, हे थांबू शकते असे आजवर कुणाला वाटले नाही. हे थांबवण्याचा मार्ग आजवर कुणी हुडकलाच नाही.

मी ज्या गावाला आज आलेलो आहे त्या गावाने असा एक मार्ग हुडकला आहे.

मार्ग आहे सामुदायिक शेतीचा. सहकाराचा.

गावाचे नाव आहे करंजवण.

ता. पाटोदा. जि. बीड.

पुण्याहून एस. टी. चे भाडे सत्तावीस रुपये पडले.

प्रवास सहा–सात तासांचा.

□

मी दुपारी एकच्या सुमारास गावात पोचलो. ही वेळ सामसुमीची. लोक शेतात कामाला वगैरे गेलेले असतात. गावकऱ्यांना भेटण्याची खरी वेळ रात्रीची; पण दीनदयाळ संस्थेच्या कार्यकर्त्यांची चौकशी करत मी एका पडक्या झोपडीत पोचलो तेव्हा १०–१२ जण तेथे जमलेले दिसले. एक सरकारी अधिकारीही आले होते व कर्ज–प्रकरणी त्यांची काही चौकशी चालली होती. दीनदयाळ संस्थेतर्फे या गावात पॉली–वस्त्राचा एक ग्रामोद्योग गेल्या महिन्यातच सुरू झाला आहे. या उद्योगाला वित्तसंस्थेने ( M. S. F. C. ) कर्जपुरवठा केलेला आहे. या वस्त्रकेंद्राचे काम कसे चालले आहे ते पाहावे, कर्जासाठी केलेल्या नवीन अर्जाची छाननी करावी यासाठी हे अधिकारी बीडहून आलेले होते. त्या दिवशी नेमके केंद्र बंद होते. केंद्रातील १–२ पायमाग नादुरुस्त झाले होते व दुरुस्ती करणारा माणूस परगावाहून यायचा होता. तरी पण केंद्राची प्रगती वाईट नव्हती. १०–१५ तरुणांना या केंद्रामुळे गावात काम मिळालेले होते व यंदा निदान या १०–१५ जणांवरचे म्हणजे त्यांच्या कुटुंबावरचे स्थलांतराचे, मोलमजुरीसाठी गाव सोडावे लागण्याचे संकट टळलेले होते. या स्वतंत्र्यानंतरच्या पुढील शिक्षणासाठी दोनजणांना कोईमतूरला-तामिळनाडूत पाठवण्यात आले आहे. पायमाग बसवून आणखी काही तरुणांना–स्त्रियांना या उद्योगात गुंतवण्याचा प्रयत्न सुरू आहे. या केंद्रात तयार झालेले वस्त्र मी पाहिले. मला ते विकत घ्यावेसे वाटले; पण त्या दिवशी तरी माल शिल्लक नव्हता. आसपासच्या गावातही या वस्त्राने इतक्या थोड्या दिवसांत चांगलेच कुतूहल व आकर्षण निर्माण केल्याचे समजले. असे केंद्र आपल्या गावात यावे, गावातच उद्योग वाढावा अशी मागणी इतर गावांतूनही पुढे येत आहे. केंद्राची ही प्रगती जरी अल्पावधीतली असली तरी यामागे दीनदयाळ संस्थेच्या कार्यकर्त्यांचे गेल्या वर्षभराचे प्रयत्न आहेत. उत्तर प्रदेशात – गोंडा जिल्ह्यात नानाजी देशमुखांनी, दीनदयाळ संस्थेच्या वतीने ग्रामोदयाचे एक नवेच विकासपर्व सुरू केलेले आहे. या धर्तीवर महाराष्ट्रातही कार्य सुरू व्हावे म्हणून बीड जिल्ह्याची निवड झाली व गेले वर्षभर या भागात संस्थेतर्फे विविध कार्यक्रम योजले गेले. आरोग्य-शिबिरे झाली, शैक्षणिक मेळावे झाले, लहानसहान पदयात्रांतून लोकांचे प्रश्न काय आहेत, स्थानिक गरजा कोणत्या आहेत यांचा शोध घेण्यात आला. ग्रामोदयामागे पुरुषार्थाची प्रेरणा आहे. आव्हाने स्वीकारण्याची ऊर्मी आहे. बीड अत्यंत मागासलेला



व दुष्काळग्रस्त जिल्हा. मग इथेच आपला पुरुषार्थ का पणाला लावू नये? काम सुरू झाले. असे ध्यानात आले की, बीड जिल्ह्यातही पाटोदे तालुका हा सर्वाधिक मागासलेला. म्हणून तळ पडला पाटोद्यात. पाटोद्यातही करंजवण हे गाव आणखीच मागे पडलेले. गेल्या ३६ वर्षांत या गावात एकही विकासयोजना अवतरली नाही. म्हणून संस्थेच्या कार्यकर्त्यांनी या गावाकडे विशेष लक्ष दिले व वर्षभर गावात वरचेवर जाऊन, तेथे राहून, गावकऱ्यांत मिळूनमिसळून प्राथमिक माहिती जमा केली, गावकऱ्यांचा विश्वास संपादन केला. गांधीविनोबाप्रणीत सर्वोदयी आश्रमतंत्र, नेहरूप्रणीत नोकरशाहीतंत्र, यापेक्षा दीनदयाळ शोध-संस्थाप्रणीत विकासतंत्राचे हे पहिले व महत्त्वाचे वैशिष्टय. प्रथम लोकमानस समजावून घेणे, लोकपुरुषार्थ जागृत करणे. योजक प्रथम, योजना नंतर. असा हा ग्रामोदयाचा क्रम असल्याने उत्तर प्रदेशातील गोंडा-प्रकल्पाला अल्पावधीत विक्रमी यश लाभले व करंजवणसारखे, महाराष्ट्रातल्या बीड जिल्ह्यातले आजवर निपचित पडलेले एक दुष्काळी गाव आज झेप घेण्याच्या तयारीत आहे.

¤

झेप? होय, निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असणारी, पाण्याचा टिपूस नसणारी पाचसातशे एकर कोरडवाहू जमीन एकत्रित करून, तेथे नंदनवन फुलवायची आकांक्षा बाळगणे ही करंजवणच्या गावकऱ्यांनी घेतलेली एक झेपच आहे. मी वृत्तपत्रात ही बातमी वाचली आणि तडक करंजवण गाठले. भारतीय शेतीचा मुख्य प्रश्न हा कोरडवाहू शेतीचा प्रश्न आहे. सगळ्या पाणीपुरवठा-योजना अंमलात आल्या तरी जेमतेम पंचवीस-तीस टक्के जमिनीला पाणी मिळेल असे तज्ज्ञ सांगत आहेत. मग उरलेल्या सत्तर टक्के जमिनीचे व त्यावर गुजराण करणाऱ्या शेतकऱ्यांचे भवितव्य काय? त्यांनी शहरी भागात यावे! दुष्काळ पडला आणि तो दर चार-पाच वर्षांनी एकदा पडतोच, कधी ओला-कधी कोरडा, की शहरांकडचे ओघ आणखी वाढतात, झोपडपट्ट्या फुगतात. एकदा शहरात आलेली माणसे खेड्याकडे पुन्हा जात नाहीत. खेडी ओस पडतात, शहरे ओसंडून वाहतात. हे दुष्टचक्र थांबवायचे तर मुळातच उपाययोजना केली पाहिजे— लोकांना खेड्यांतच उद्योगधंदा पुरवला पाहिजे, शिक्षण-करमणूक इत्यादी गरजा खेड्यांतच लोकांना भागवता यायला हव्यात. २-४ कारखाने ग्रामीण भागात काढून किंवा एखादी रेल्वेलाइन टाकून हा प्रश्न सुटणार नाही. शेतीविकासाला अग्रक्रम द्यायला हवा. पाणी नाही, जमीन विखुरलेली, अवजारे जुनी व मोडकीतोडकी, घरातली कर्ती माणसे शहरात गेलेली. गावात फक्त म्हातारेकोतारे व लहान मुले. अशांच्या हाती भारतीय शेतीचे भवितव्य. अशी शेती सुधारणार कधी व शहरात रोज होणारी झोपडपट्ट्यांची वाढ थांबणार केव्हा? एकेकटा, विखुरलेला शेतकरी हे चित्र बदलू शकत नाही. आज नाही उद्या त्याचे शेतीतून-गावातून उच्चाटन होणे अपरिहार्य आहे; पण काही समाईक-सामुदायिक प्रयत्न केला तर? शक्यता आहे चित्र बदलण्याची. उच्चाटनाला आळा बसण्याची. आजवर असे तुरळक प्रयत्न झालेही आहेत; पण ते पूर्ण फसलेले आहेत, हेही विसरून चालणार नाही. पुण्याजवळ मांजरी येथे असा एक प्रयत्न पूर्वी झाला होता. जाणकार मंडळींनी तो केला होता. पाण्याची भरपूर सोय होती. पुण्यासारखे मोठे शहर जवळ होते. भांडवलाची अडचण नव्हती. तरी पण अपयश आले, ही वस्तुस्थिती आहे. केरळात कम्युनिस्ट राजवट असताना कोचीनजवळ पेरियर नदीच्या काठी असाच एक मोठा प्रयत्न झाला होता. तोही फसला. नीट चाललेल्या संयुक्त सहकारी शेती संस्था आपल्याकडे हाताच्या बोटांइतक्याही नसतील. हे अपयश जगजाहीर असल्यानेच यापुढे अशा संस्थांना परवानगी व मान्यताही देऊ नये असे महाराष्ट्र शासनाचे अलिखित धोरण असल्याचेही कळते. अपवाद म्हैसाळचा, मधुकरराव देवलांनी उभ्या केलेल्या संस्थांचा; पण बीड-करंजवण भागात म्हैसाळसारखे पाण्याचे भाग्य नाही. एक भाग्य मात्र दोन्हीकडे समान आहे. म्हैसाळला मधुकरराव देवलांसारखा कुशल कार्यकर्ता लाभला करंजवणला दीनदयाळ संस्थेच्या कार्यकर्त्यांनी ही गरज पूर्ण केली. मी गेलो त्या दिवशी संस्थेचा अधिकृत असा बाहेरचा एकही कार्यकर्ता गावात नव्हता. गावचे लोक व संस्थेचे स्थानिक कार्यकर्तेच उत्साहाने माहिती देत होते, अडचणी सांगत होते, आपल्या नव्या संकल्पित सामुदायिक शेतीयोजनेतील जमिनीतून हिंडवत होते. यशाबद्दल धाकधुक तर सर्वांनाच वाटत होती; पण हिंमतही जाणवत होती. 'पावसानेच दगा दिला, निसर्गाने साथ अजिबात दिली नाही तरच अपयश. माणसांनी म्हणून जे जे करणे शक्य आहे ते ते आम्ही केल्याशिवाय राहणार नाही. आम्हाला कल्पना आहे आम्ही फार मोठी उडी घेत आहोत याची.' बळी मला सांगत होता. बळी जायभाये. दीनदयाळ संस्थेचा येथला तरुण कार्यकर्ता.

'पण काय रे, तुम्हाला ही एकत्रित शेती करण्याची कल्पना सुचली कशी?' मी

'दादांनीच दोन महिन्यांपूर्वी बोलता-बोलता हा विषय काढला. बघा, फेब्रुवारीची ७-८ तारीख असेल. त्या वेळी ते येथे होते. मग त्यावर बैठका झाल्या. अगदी घरातल्या बायकांचादेखील दादांनी विचार घेतला. शेवटी हे धाडस करायचे असे सर्वांनाच वाटू लागले. तसा आम्ही लेखी ठराव केला. मग मात्र दादा वेगाने पुढच्या जुळवाजुळवीला, व्यवस्थेला लागले.'

दादा म्हणजे पुण्याचे के. डी. जोशी. औद्योगिक सल्लागार. व्यवसायातून लवकर निवृत्ती घेतली आणि आता पूर्ण वेळ दीनदयाळ संस्थेचे कार्यकर्ते.

गावचा ठराव झाल्यावर के. डी. जोशींनी प्रथम परभणीचे कृषिविद्यापीठ गाठले. या विद्यापीठाच्या प्रमुखांचे व विद्यार्थ्यांचे साहाय्य त्यांनी मिळवले. विद्यार्थ्यांची एक तुकडी करंजवणला येऊनही गेली. प्रमुखांनी येऊन जमिनीची पाहणी वगैरे करून सल्ला दिला. सुट्ट्या लागल्या की, काही विद्यार्थी करंजवणला मुक्कामच करणार आहेत.

औरंगाबादला जाऊन जोशींनी मग राष्ट्रीकृत बँकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. कर्जपुरवठ्याची सोय झाली.

¤

नाना वेलणकर

परांजपे

अशी काही कार्यकर्ती मंडळी गोळा झाली.

मला यापैकी कुणी भेटले नाही. भेटले असते तर त्यांना विचारले असते की, आपले उद्योग सोडून ते या दुष्काळी गावात कशासाठी ठाण मांडून बसणार आहेत ?

कारण वेलणकर परभणीचे. यांचा एक मुलगा आसामात विद्यार्थी परिषदेचा पूर्ण-वेळ कार्यकर्ता म्हणून काम करतोच आहे.

परांजपे पुण्याचे, बकाऊवुल्फ कंपनीतली चांगल्या पगाराची नोकरी यांनी कशासाठी सोडली ?

कार्यकर्त्यांची शक्ती अशी हळूहळू उभी राहत आहे.

गाव झेप घेण्याच्या तयारीत आहे.

तीन ट्रॅक्टर्स गावात येऊ घातले आहेत.

आनंद यादवांच्या 'गोतावळा' कादंबरीचा शेवट ट्रॅक्टर गावात आल्याने होतो.

सारं करंजवण गाव मी गेलो तेव्हा येऊ घातलेल्या ट्रॅक्टर्सच्या प्रतिक्षेत असलेले मला दिसले.

येत्या ३० मार्चला, भूमिपूजनसमारंभ आहे. राळेगणशिंदीचा कायापालट करणारे अण्णा हजारे यांच्या शुभहस्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे उद्घाटन होत आहे.

¤

गावात आजमितीस दारू नाही. असल्यास अपवादात्मक. भांडण–तंटे गावातल्या गावातच मिटवले जातात. आल्या-गेल्याचे स्वागत मनापासून. आता रस्ता आला. गावात वाहने, ट्रक्स, ट्रॅक्टर्स येणार. एस. टी. येणार. गावचे हे पूर्वापारचे शांत-समाधानी व परस्परविश्वासाचे स्वरूप टिकून राहणार का? संकल्पित सहकारी-सामुदायिक शेतीसंस्थेचा प्रयोग या दृष्टीने फार मोलाचा ठरू शकतो. एकेकटी व्यक्ती आर्थिक सुबत्तेबरोबर नकळत येणाऱ्या दुर्गुणांना बळी पडण्याची शक्यता खूप. सामुदायिक आधाराची, वातावरणाची निर्मिती यासाठी उपयुक्त ठरू शकते. आर्थिक विकासाबरोबरच नैतिक संस्कारांचीही सोय झाली तर व्यक्ती सुरक्षित राहते व गावाचीही वाताहत होत नाही. पुस्तकी किंवा कायदेशीरदृष्ट्या करंजवणेचा शेतीप्रयोग सहकारी किंवा सामुदायिक ठरू शकेल की नाही, सांगता येत नाही. कारण खाजगी मालकी या नव्या प्रयोगात आज तरी अबाधित ठेवली आहे. नांगरट, पिकांचे नियोजन, लागवड, वाटप वगैरे शेती विकास कार्यक्रम सात जणांचे एक मंडळ ठरवेल त्याप्रमाणे पार पाडण्याची निदान यंदाची, पहिल्या वर्षापुरती तरी योजना आहे. म्हणजे व्यवहारात सामुदायिक पण कागदोपत्री वैयक्तिक असेही संमिश्र स्वरूप या प्रकल्पाचे आहे असे म्हणता येईल. मालकी काढून घेण्याचा आग्रह सुरुवातीसच धरला गेला नाही हे एका दृष्टीने योग्यच आहे. कारण जमीनमालकीबद्दलचे आकर्षण लहानातल्यालहान शेतकऱ्यातही आहे, अगदी साम्यवादी क्रांती झाली त्या देशातही हे आकर्षण कमी झालेले नाही. रशियात खाजगी शेतांना पुन्हा वाव मिळू लागलेला आहे, चीनची कम्युनव्यवस्थाही माओनंतर हळूहळू सैल होत आहे. सामुदायिक शेतीपेक्षा अशा खाजगी व लहानलहान शेती तुकड्यावरची उत्पादनक्षमता अधिक असते असेही आढळून आलेले आहे. तेव्हा मालकी कुणाकडे हा वादविषय न करता सामुदायिक व सामाजिक न्यायावर आधारित अशी उत्पादन व वितरणव्यवस्था परस्पर विचारविनिमयाने, सहकार्याने निर्माण करण्याचा करंजवणच्या प्रयोगवीरांचा निर्णय उचित वाटतो. सगळ्यांची जमीन जरी दुष्काळी असली तरी त्यातल्यात्यात काहींची जमीन अधिक सुपीक आहे. अशा जमिनी असणारे २।४ शेतकरी या सामुदायिकाच्या प्रयोगात सहभागी व्हायला उत्सुक नव्हते. आमच्या सुपीक जमिनी आम्ही कसू, सर्वसाधारण जमिनी सामुदायिकात घालू असा या शेतकऱ्यांचा प्रस्ताव होता. गावकऱ्यांनी याला मान्यता दिली नाही. अगदी सुपीक तुकडा म्हटला तरी तो दुष्काळी भागातला. उत्पन्न पावसावर अवलंबून. ते असून असणार किती? एकरी दोनशे किंवा तीनशे रुपये शिकस्त. सध्याच्या बाजारभावाने एवढ्या उत्पन्नाची शाश्वती संकल्पित सामुदायिक प्रयोगात लाभणार असेल तर सुपीक–नापीक असा फरक करण्याचे काहीच कारण नाही. सुपीक जमीनवाल्यांना हा हिशोब, तफावत दूर करण्याचा हा मार्ग पटला व सामुदायिकाच्या उभारणीतली ही सुरुवातीची बारीकशी अडचण दूर झाली. कुणावरही अद्याप सक्ती नाही; पण न्यायाचे, व्यवहाराचे सूत्रही दृष्टिआड होऊ दिले गेले नाही. एकूण ७५० एकर जमीन या सामुदायिकाखाली येत आहे. सभासदसंख्या १६०. समाविष्ट कुटुंबे ११०. मोठ्यात मोठा शेतकरी ५२ एकरवाला. लहानात लहान शेतकरी अर्ध्या एकराचा मालक. एकाची ३५ एकर, आणखी एकाची १० एकर; पण बहुसंख्य शेतकरी ३।४ एकरवाले. पाऊस नीट पडला तर जेमतेम



एकरी १००।२०० रुपये उत्पन्न मिळवणारे. वर्षाकाठी चार-सहा महिने यातले बहुसंख्य शेतकरी गावाबाहेरच. फुटकळ शेती, मशागत अनिश्चित. हा एक शापच; पण नेमका हा शापच येथे वरदान ठरू पाहत आहे. समान संकट हे समान पुरुषार्थाचा आधार ठरत आहे. यंदाच पुण्याजवळच्या थेऊर साखरकारखान्यात ऊसतोडणी–वाहतुकीच्या कामावर करंजवणच्या ३५ बैलगाड्या जालेल्या आहेत. कुणी नगर जिल्ह्यातल्या साखरकारखान्यांवर, तर कुणी थेट पंढरपूरपर्यंत गेलेले. करंजवणमधून यंदा सुमारे दोनशे बैलगाड्या, म्हणजे तेवढी कुटुंबे बाहेर गेलेली. साखरकारखान्यांचे काम संपले, की ही परतणार. गावात आल्यावर जशी होईल तशी मशागत. परतायला उशीर झाला तर मशागत होऊही शकत नाही कित्येकदा. ही येथील वास्तवता दीनदयाळ संस्थेच्या कार्यकर्त्यांनी अचूक हेरली व सामुदायिक म्हणा, सहकारी म्हणा किंवा संयुक्त म्हणा, शेतीचा विचार गावासमोर ठेवला. हातचे हाती राहतेच आहे, मग पळत्याच्या मागे, थोडा धोका पत्करूनसुद्धा धावायला काय हरकत आहे ? गावकऱ्यांनी व्यवहार पाहिला. दीनदयाळ संस्थेच्या कार्यकर्त्यांनीही मनुष्यस्वभावाकडे दुर्लक्ष केले नाही. पुरुषार्थवादाला येथे व्यवहाराची जोड लाभली आहे. व्यवहारवादानेही आकाशात मस्त भरारी घेतली आहे.

¤

'ट्रॅक्टर' घडघडला तरी 'गोतावळा' न तुटण्याची शक्यता या सामुदायिकामुळे निर्माण झाली आहे. फक्त हा 'गोतावळा' नवीन असेल, सामाजिक न्यायाला, समानतेच्या सूत्राला धरून असेल.

## स्वयंसेवी व स्वयंपूर्ण घटक

पुण्याला परतल्यावर ज्ञानप्रबोधिनीच्या निवडक विद्यार्थ्यांसमोर ही करंजवणच्या नव्या प्रयोगाची माहिती सांगितली. कार्यक्रम चर्चेचा होता. चर्चेचा विषय होता 'गांधी, लोहिया आणि दीनदयाळ या तीनही व्यक्तींमध्ये साम्यस्थळ हुडकायचेच तर एवढेच म्हणता येईल की, या तिघांनीही विकेंद्रीकरणाचा पुरस्कार केला. आपल्या अर्थव्यवस्थेला भारतीय रूप देण्याचा यांचा प्रयत्न होता. प्रत्यक्षात मात्र नेहरूप्रणीत नियोजन आणि शहरीकरण–केंद्रीकरण या मार्गानेच देश गेला, अजूनही जात आहे. विकेंद्रीकरणवादाला, ग्रामीण विकासाला फक्त तोंडी मान्यता लाभली. विकेंद्रीकरण हवे असे सगळेच म्हणत होते; पण शहरे वाढतच गेली. ग्रामीण भाग ओस पडला. मध्यंतरी २८ महिने दिल्लीला गांधीप्रणित समाजवाद मानणारे जनता सरकार आले; पण या सरकारलाही केंद्रीकरणाचा प्रवाह थोपवण्याच्या दृष्टीने फारसे काही करता आले नाही. हा प्रवाह थोपवायचा तर ग्रामीण क्षेत्रात आर्थिक सत्तेची पर्यायी व समांतर शक्तीकेंद्रे निर्माण व्हायला हवीत. सगळीकडेच कारखानदारी वाढवता येणार नाही. भांडवलाची चणचण आहेच; पण मुख्य प्रश्न बाजारपेठांचा आहे. दोन वर्षे मुंबईत कापडगिरण्यांचा संप चालतो; पण बाजारात कापडाची टंचाई जाणवत नाही, याचा अर्थ काय ? याचा अर्थ मालाला गिऱ्हाईक नाही असा आहे. हीच बोंब शेतीमालाची. स्वतंत्रपणे शेती करणारा बागायत भागातला शेतकरी उत्पादित मालाला गिऱ्हाईक नाही म्हणून आजच अडचणीत आलेला आहे. गरजेपुरते पिकवा असा आदेश शेतकरीनेते शरद जोशी यांनी दिला आहे. पण शेतकरी या कमी उत्पादनाच्या मार्गाकडे यापूर्वीच वळलेला आहे. उत्पादन वाढवा असे सांगण्याचा काळ मागे पडतो आहे. बदललेले हे वास्तव राजकीय–आर्थिक क्षेत्रातील मंडळी ध्यानातच घेत नाहीत. जगभर आज बाजारपेठांची चणचण आहे, तिसऱ्या जगात यासाठी शोधाशोध सुरू आहे. परस्परांच्या गरजा ध्यानात घेऊन हवे तितकेच व हव्या तेवढ्याच वस्तूंची निर्मिती करणाऱ्या लहानलहान स्वयंपूर्ण वसाहती हा या मंदीतून बाहेर पडण्याचा व आपल्या हाती असलेला एक खात्रीचा उपाय आहे. स्वयंसेवी संस्थांनी या कामी पुढाकार घ्यायला हवा. खऱ्याखुऱ्या विकेंद्रीकरणाची ही सुरुवात ठरेल व ग्रामीण भागातल्या बेकारांनाही गावात किंवा आसपास काम मिळेल. करंजवणसारखे एक सामुदायिक नीट उभे राहिले तर सध्या चालू असलेले शहरी भागाकडचे ग्रामस्थांचे स्थलांतर पूर्ण थांबेल व इतर पाच सहाशे लोकांना हे एक सामुदायिक पुरेसा कामधंदाही पुरवू शकेल. असे किल्ले ठिकठिकाणी उभे व्हायला हवेत. एका किल्ल्याचा दुसऱ्या किल्ल्याशी संबंध असतो, परस्परांचे दळणवळणही असते. स्वयंपूर्णता म्हणजे तुटकपणा नाही; पण असे स्वयंपूर्ण प्राथमिक घटक नाहीत तोवर आपला विकास सुरक्षित नाही, आपले परावलंबन वाढतच जाणार हेही नक्की. पुढारलेल्या राष्ट्रांच्या आर्थिक गुलामगिरीतून व त्या बरोबरच येणाऱ्या सांस्कृतिक–राजकीय दबावातून देश मुक्त करणे हे वास्तविक आपले पहिले कर्तव्य; पण स्वातंत्र्यानंतरची वाटचाल नेमकी उलट दिशेने सुरू झाली. आपली मुंबई–कलकत्ता शहरे न्यूयॉर्क–पॅरीसच्या दबावाखाली आहेत. आपला ग्रामीण भाग मुंबई–कलकत्त्याकडे डोळे लावून बसला आहे. आपला माल जोवर शेतकरी शहरात नेऊन विकत आहेत, दलाल किंवा नोकरशहांच्या मध्यस्थीची जोवर त्याला गरज आहे तोवर ही स्थिती कायमच राहणार आहे, मुंबई–कलकत्त्याचे किंवा शरद जोशींच्या भाषेत इंडियाचे लोकच त्याच्यावर राज्य करणार आहेत. यातून सुटका करून घेण्याचा मार्ग एकच. गिऱ्हाईक शेतकऱ्याच्या–उत्पादकाच्या दारात येईल अशी व्यवस्था करणे. अशी व्यवस्था एकट्या पुरती होणे शक्य नाही–एकेकट्याचे प्रयत्नही तोकडे पडणार. म्हणून उत्पादन–वितरण हे सर्व व्यवहार सामुदायिक व स्वयंपूर्ण केंद्रांमार्फत, अशा केंद्रांभोवती गुंफले जायला हवेत. असे स्वयंपूर्ण प्राथमिक घटक जितके लोकप्रयत्नातून, स्थानिक विविधता ध्यानात घेऊन उभे केले जातील तेवढे ते यशस्वी होण्याची शक्यता अधिक. अशा प्रयत्नांतून प्रयोगातूनच झाला तर भविष्यात एखादा भारतीय विकासाचा वैशिष्ट्यपूर्ण आकृतीबंध निर्माण होऊ शकेल, आणि चालू असलेले अनुकरणपर्व संपेल. अमेरिका आणि इंग्लंड ज्या मार्गाने गेलं त्याच मार्गाने आपण गेलो तर या देशांना आपण केव्हाच, कधीही मागे टाकू शकणार नाही. आजच हे देश औद्योगिक–आर्थिक क्षेत्रात आपल्या किती तरी पुढे आहेत. या देशांचेच उत्पादन–वितरण तंत्र, या देशांचीच अर्थव्यवस्था, या देशांचीच कारखानदारी इकडे रुजवून आपण स्वतंत्र व स्वावलंबी कसे व केव्हा होणार ? आपला मार्ग आपण निराळा हुडकला पाहिजे. असा शोध घ्यायचा असेल तर गांधी–लोहिया–दीनदयाळ या व्यक्तींचे विचारच उपयुक्त ठरतील.

करंजवणसारख्या प्रयोगांमुळे या विचारांना थोडाफार वास्तवाचाही आधार सापडेल. किंबहुना असे प्रयोग हीच या विचारांची ओळख करून घ्यायची, अभ्यास करण्याची खरी जागा आहे. स्वतःला राष्ट्रवादी म्हणवणाऱ्या संस्थांनी, संघटनांनी, व्यक्तींनी तर अशा जागा हुडकून काढल्या पाहिजेत, नसल्या तर निर्माण केल्या पाहिजेत. शेवटी राष्ट्रवादाचा तरी सध्याचा नेमका आशय कोणता? ऋणमुक्त भारत; आत्मनिर्भर भारत! राजकीय स्वातंत्र्य मिळाले. आता आर्थिक स्वातंत्र्यासाठी झटले पाहिजे. यासाठी स्वतःचे विकासतंत्र हवे. परकीय ते टाकावू असा याचा अर्थ नाही; पण उचलेगिरी वाईट. आज ती चालू आहे.

—अशी चर्चा खूप लांबली.उ लटसुलट प्रश्नोत्तरे झाली.

कार्यक्रम रंगला.

करंजवणची पार्श्वभूमी नसती तर मात्र हा कार्यक्रम अगदीच पुस्तकी व कंटाळवाणा झाला असता.

तसे पाहिले तर या तीन व्यक्तींमध्ये साम्यापेक्षा वेगळेपणच अधिक आहे.

लोहिया मला ग्रीक बुद्धिवादी बंडखोर परंपरेचे वारसदार वाटतात.

गांधीजींवर ख्रिस्ती धर्माचा प्रभाव होता.

दीनदयाळ हे रामायण संस्कृतीचे अपत्य होते.

पुढे ?

¤

करंजवण गावात दलितांची २–३ कुटुंबेच आहेत; पण या कुटुंबांतील कर्ती माणसे मुंबईला असतात. त्यामुळे त्यांची या सामुदायिकाबद्दलची प्रतिक्रिया समजू शकली नाही; पण ताण–तणाव–विरोध सध्या तरी नसावा असे वाटते, सगळेच गाव तळागाळात रुतलेले आहे. एकजण मला म्हणाला होता, 'सगळ्या गावावरच बाँब पडावा, सगळ्यांनी एकदम मरून जावे असे वाटते. मागे कोणी शिल्लक राहायला नको. दिवसचे दिवस पाणी वाहण्यात जातो. वर्षातले चार–सहा महिने परागंदा व्हायचे. हे कसले आयुष्य?' अशा या गावात दीनदयाळ संस्थेचे कार्यकर्ते पोचले. त्यांनी तेथे नवा आशावाद, नवी उभारी आणली. गंगाराम खाडे, अश्रुबा खाडे, बळी जायभाये, निवृत्ती खाडे अशी तरुण व प्रौढ मंडळी आता कामाला लागली आहेत. आपण एक फार मोठे आव्हान स्वीकारीत आहोत याची या मंडळींना कल्पना आहे. सामुदायिकाच्या शेतीवर आम्ही बसलो होतो. गप्पा सुरू होत्या. दुपारची उन्हाची रखरख कमी झाली होती. संध्याकाळची शांत वेळ. वारे वाहू लागलेले. बाजूचा पिंपळ सळसळत होता. दुपारी लांबून पाहिला तेव्हा किती एकाकी आणि स्तब्ध वाटला होता? पण गावाबरोबर तोही आता एका चैतन्ययात्रेला जणू निघत होता. या यात्रेचे उद्दिष्ट? बळी जायभाये बोलून गेला— 'अहो, हिंदुस्थानातलेच काय, परदेशातले लोक देखील आमचा हा प्रयोग पाहायला येथे येतील. अगदी ते मॉस्कोवालेसुद्धा!'

मला एक जुने पद्य आठवले— 'याच दिनी तू घालायाची आकाशी गवसणी'... 'पंख असावे मज गरुडाचे...'

¤

सूर्य मावळत होता किरणे मंदावत होती. ही वेळ तशी उदासबोधाची; पण करंजवणच्या संकल्पित सामुदायिकातील पिंपळाजवळच्या एका शेतावर या वेळी कल्पनांचे वारू भरधाव सुटले होते. झेपावत होते, पश्चिम क्षितिजांकडे. जिथे सूर्य धरित्रीला भेटत होता, ढगांना तिथे सोनेरी कंकणे चढली होती! □

राजधानी दिल्ली

## 'इंडिया इंटरनॅशनल'तर्फे

# परिसंवाद

'लोदी इस्टेट' हा दिल्लीतील रमणीय भागांपैकी एक भाग. येथील 'लोदी गार्डन' हे इब्राहिमखान लोदीच्या काळापासूनचे प्राचीन उद्यान. संपूर्ण लोदी इस्टेटचा परिसर अत्यंत निवांत, शांत आहे. लोदी गार्डनच्या प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर इब्राहिमखानच्या काळातील एक किल्लेवजा छोटी गढी लागते. अवतीभवती सर्वत्र प्रशस्त उद्यान. मार्च–एप्रिलमध्ये येथे ठिकठिकाणी नाना रंगच्छटांच्या छोट्या छोट्या फुलांना बहर आलेला दिसतो. केवळ लोदी गार्डनच नव्हे तर दिल्लीतील सर्व छोट्या–मोठ्या बागा, ट्रॅफिक आयलंड्स, सर्वत्रच अशा नयनवेधक फुलांची रंगपंचमी रंगलेली असते. केंद्रीय सचिवालयाहून जर या ठिकाणी बसने जाऊ लागलो तर हुमायूनरोड, अकबररोड, शहाजहानरोड वगैरे एकाहून एक सुंदर रस्त्यांतून वळणे घेत बस लोदी इस्टेटला येते. बाप, मुलगा, नातू अशा या मोगल बादशहांच्या काळातील वैभवाचे आधुनिक काळातील काव्यात्म रूप म्हणजे त्यांचे नामकरण झालेले हे रस्ते! रस्त्यांच्या दुतर्फा उंच झाडी, कडेला लाल मातीचे पट्टे आणि त्यांच्या कडेने वाढवलेली शोभेची झाडी या रस्त्यांचे सौंदर्य खुलवते. लोदी गार्डनच्याच कुशीत 'इंडिया इंटरनॅशनल'ची देखणी वास्तू उभी आहे. वरच्या मजल्यावर सुंदरसे हॉटेल, त्याखाली कॉन्फरन्सरूम आणि इतर विभाग अन् तळमजल्यावर कमिटीरूम व मोठी लायब्ररी, समोर हिरवळीचे चौकोनी अंगण नि पलीकडे बुफे डिनर, चहापार्टीसाठी लांबरुंद रोड!

या इंडिया इंटरनॅशनलमध्ये दि. १० आणि ११ मार्च रोजी 'आधुनिक भारतीय कवितेतील प्रचलित प्रवाह' या विषयावर एक सेमिनार झाला. 'ऑथर्स गिल्ड ऑफ

इंडिया 'ची दिल्ली शाखा आणि 'साहित्य कला परिषद' या दोन संस्थांनी संयुक्तपणे हा सेमिनार आयोजित केला होता. या सेमिनारमध्ये मराठी, उडिया आणि तमिळ या तीन भाषांतील कवितांमधील प्रचलित प्रवाहांविषयी निबंध सादर केले गेले आणि त्यावर चर्चा झाली. या सेमिनारचा पहिला टप्पा सप्टेंबर १९८३ मध्ये झाला. त्या वेळी बंगाली, मल्याळम् आणि सिंधी या तीन भाषांतील कवितांच्या प्रवृत्तींवर चर्चा झाली होती.

'ऑथर्स गिल्ड ऑफ इंडिया 'च्या दिल्ली शाखेची स्थापना १९८१ मध्ये झाली. ज्ञानपीठ आणि साहित्यअकादमीची पारितोषिके मिळालेले, पद्मश्री, व्यावसायिक लेखक, कवी, बुद्धिजीवी, राज्यपाल, न्यायाधीश, वकील, राजदूत, इंजिनियर... अशा विविध क्षेत्रांतील दोनशेहून जास्त सभासदांचा त्यामध्ये समावेश आहे.

'साहित्य कला परिषद' ही दिल्ली प्रशासनाने स्थापन केलेली संस्था आहे. दिल्लीच्या परिसरात कला व साहित्य यांच्या विकासाचे उपक्रम हाती घेणे हा या संस्थेच्या स्थापनेचा उद्देश आहे.

वरील दोन्ही संस्थांच्या संयुक्त सहकार्याने प्रस्तुत सेमिनार घडवला. या सेमिनारचे उद्दिष्ट असे– 'समान संस्कृती आणि युगपरंपरा भारतामध्ये ओतप्रोत झिरपलेली आहे. या देशाचे वाङ्मय जरी अनेकविध भाषांतून व लिपींमधून लिहिलेले असले, तरी ह्या मूलभूत एकजिनसीपणाचे प्रतिबिंब त्यामध्ये ठळकपणे उमटलेले आहे. कवितेमधून तर माणसातील चैतन्याचा आविष्कार नेहमीच झाला आहे. म्हणून तीन–तीन भाषांच्या कवितेचे अंतस्तल धुंडाळून भारतीय एकात्मतेच्या प्रयत्नांना हातभार लावला पाहिजे!'

सेमिनारमध्ये एकंदर ५०–५५ निमंत्रितांनी भाग घेतला. मराठी, उडिया आणि तमिळ या भाषांतील कवितांविषयी एक–एक निबंध key–note paper सर्वांना आधीच पाठविण्यात आला होता. प्रत्येक सेमिनारमध्ये त्या निबंधांच्या आधारे सुरुवातीला थोडक्यात विषय मांडावा आणि मग त्यावर चर्चा व्हावी, अशी योजना होती. डॉ. निशिकांत मिरजकर (मराठी), श्री. जीवन पाणी (उडिया) आणि श्री. का. ना. सुब्रह्मण्यम (तमिळ) हे निबंधलेखक आणि प्रमुख वक्ते होते.

लंबचौकोनाकृती कॉन्फरन्सरूममध्ये मध्यावर टेबलांची लांब रांग आणि तिच्या भोवती खुर्च्या मांडलेल्या होत्या. सेमिनारमध्ये भाग घेणाऱ्या प्रत्येक दोन–तीन सभासदांमध्ये एक माईक होता. संपूर्ण कार्यक्रम टेप करता येईल अशी त्या हॉलमध्ये स्वयंचलित व्यवस्था होती. ऑथर्स गिल्ड ऑफ इंडियाचे सेक्रेटरी लेफ्टनंट कर्नल गौतम शर्मा (रिटायर्ड) यांनी महिनाभर आधीपासून खपून सेमिनारची चोख व्यवस्था ठेवली होती.

दि. १० मार्च रोजी सकाळी १०.३० वा. कार्यक्रमास सुरुवात झाली. सेमिनारचे उद्घाटन लोकसभा-सदस्य श्री. श्रीकांत वर्मा यांनी केले. विविध भारतीय भाषांमधील कवींच्या अनुभूतीतील समानता त्यांनी वर्णन केली; परंतु 'आयडेंटिटी'ची समस्या उत्तरेकडील कवितेतून जास्त प्रमाणांत प्रगट झालेली आहे, हे त्यांचे विधान विवाद्य होते.

ऑथर्स गिल्डच्या सदस्य–कवींच्या कवितांचा (इंग्लिश आणि इंग्लिशमध्ये भाषांतरित) एक निवडक संग्रह श्री. श्रीकांत वर्मा यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

साहित्यकलापरिषदेचे कार्यवाह श्री. डी. पी. सिन्हा यांच्या छोट्या भाषणानंतर ११.३० वाजता सेमिनारचा पहिला टप्पा संपला. १२ पर्यंत चहा–पानाचा कार्यक्रम आटोपला आणि कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यास सुरुवात झाली.

मराठीच्या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांनी भूषविले होते. त्यांच्या प्रास्ताविकानंतर डॉ. निशिकांत मिरजकरांनी आधुनिक मराठी कवितेमधील प्रचलित प्रवाहांचे सविस्तर स्पष्टीकरण केले. त्यांच्या भाषणाचा सारांश असा : 'मर्ढेकरांच्या कवितेपासून १९५० च्या सुमारास उदित झालेल्या मराठी कवितेच्या नव्या युगाने अनेक प्रकारच्या तीव्र प्रतिक्रियांना तोंड दिले. कवींच्या व्यक्तीगत आत्मनिष्ठेतून अनुभवलेली वास्तववादी समाजचित्रे या कवितेने प्रसृत केली. या समाजचित्रातून जीवनाचे बीभत्स दर्शन घडते, अशी टीका मर्ढेकरांच्या काळापासून झाली; पण ढासळलेल्या जीवनमूल्यांमुळे ही बीभत्सता अनिवार्य होती. कारण समाजजीवनाचे ते अपरिहार्य अंग होते. या बीभत्सतेच्या आवरणाखाली सौंदर्याची अतृप्त तहान होती. (मर्ढेकर, विंदा करंदीकर, वसंत बापट, कुसुमाग्रज, मंगेश पाडगांवकर, अनिल, सदानंद रेगे, आरती प्रभू, अरुण कोलटकर, मनोहर ओक, सतीश काळसेकर, गुरुनाथ धुरी इत्यादींच्या काव्यातून उदाहरणे देऊन डॉ. मिरजकरांनी सविस्तर स्पष्टीकरण केले.) आविष्काराच्या आकृतिबंधातील अभिनव प्रयोगांचे विश्लेषण करून त्यांनी दलित कवितेचे सोदाहरण विवेचन केले.

दुपारी १ वाजता संस्थेच्या आवारातच खास भोजनाचा आस्वाद घेऊन, थोडयाशा गप्पाटप्पांनंतर २ वाजता निबंधावरील चर्चेला सुरुवात झाली. चर्चा बरीच रंगली. जवळजवळ सर्वांनीच चर्चेत भाग घेतला. मराठी कवितेवरील पाश्चात्य प्रभाव, दलित कवितेचे स्फूर्तिस्थान, तिचा महाराष्ट्रातील आविष्कार, दलित कवितेमध्ये कवयित्रींचा वाटा अशा विविध प्रश्नांच्या अनुरोधाने चर्चा झाली. सामाजिक दुःखांचे आणि मनोव्यथांचे भेदक चित्रण करणाऱ्या मराठी कवितेत जीवनातील सुंदरतेचे चित्रण नाही का? असा प्रश्न एका मानसशास्त्रज्ञ स्त्रीने विचारला. तसेच, महात्मा गांधींच्या हत्येची प्रतिक्रिया मराठी कवितेत उमटली की नाही, स्त्री-मुक्तीविषयी मराठी कवितेची काही विशिष्ट भूमिका आहे काय इत्यादी अनेक प्रश्न चर्चेमध्ये चर्चिले गेले. डॉ. मिरजकरांनी त्या सर्वांची सोदाहरण व सविस्तर चर्चा केली. डॉ. दाभोळकरांनीही चर्चेमध्ये त्यांच्या बरोबरीने भाग घेतला. त्यांनी सभेचे संचालन अतिशय कुशलतेने केले. एका विशिष्ट उंचीच्या स्तरावरून रंगलेली ही चर्चा आणि डॉ. मिरजकर आणि डॉ. दाभोळकर यांचा त्यातील सहभाग म्हणजे एक सुखद जुगलबंदी होती, असे श्रोत्यांनी बोलून दाखविले. मराठीच्या चर्चासत्राने सेमिनारमध्ये एक फार चांगले वातावरण निर्माण केले. मुख्य म्हणजे मराठी वाङ्मय हे फारच कमी प्रमाणात भाषांतरित झालेले असल्यामुळे त्याची इतर भाषिकांना ओळख करून देण्याची अत्यंत आवश्यकता आहे, याची तेव्हा तीव्र

पान २९ वर

## अ. भा. वि. प. नियोजित कलकत्ता परिषद

# घुसखोरीच्या विरुद्ध राष्ट्रीय संघर्षाचा निर्धार

विनय सहस्रबुद्धे

'भारत-बांगलादेश – सीमा प्रत्यक्षात तीन मैल दूर असूनही आताच आम्हाला आम्ही जणू काही बांगलादेशात असल्यासारखे वाटू लागले आहे. वीस-पंचवीस बैठ्या घरांच्या सात-आठ वस्त्या आम्ही आतापर्यंत ओलांडल्या. त्या सर्व वस्त्यांमधून एकजात बांगलादेशी भाटिया मुसलमान आहेत: हिरवे, चाँद-ताऱ्यांचे झेंडे मधूनच डोकावताना दिसतात. मशिदींची संख्याही डोळ्यास येण्यासारखी आहे. या प्रत्यक्ष सीमावर्ती भागात येण्यापूर्वी गेडे नावाच्या गावात आम्ही गेलो होतो. सिआल्दाहून ( कलकत्ता ) गेडेला सरळ रेल्वेने येता येते. त्या दिवशी या गाडीने सुमारे पन्नास बांगला देशींचा एक जथा उतरला. त्यात हिरव्या लुंग्या आणि पांढरी दाढी अशा वेशातले वीस-बावीस पुरुष होते. ईद जवळ आल्यामुळे ही सर्व मंडळी सणासुदीसाठी आता बांगलादेशात आपापल्या गावी परत चालली असल्याचं माझ्याबरोबरच्या एका पत्रकार मित्रानं सांगितलं. बांगलादेशींच्या या टोळक्यांतल्या एका बारा वर्षाच्या मुलानं माझ्या प्रश्नाचं उत्तर देताना सांगितलं की, तो आणि त्याचे आई-वडील व चार बहिणी असं सगळं कुटुंब कलकत्याच्या ब्रेब्रॉनरोडवर राहतात. आणि गेल्या दोन वर्षापासून ते तिथं राहत आहेत. विशीच्या आतबाहेर असलेल्या एका बांगलादेशी मुलीनं सांगितलं की, पूर्व-कलकत्यात कांकुरगाची भागात ती घरकाम करून पैसे मिळवते व वर्षातून एकदा तरी मैमनसिंग जिल्ह्यातल्या आपल्या गावाकडे जाऊन येते. या मुलीच्या वडिलांच्या डोक्यावर बरंच सामान होतं सीमा सुरक्षा दलाचे जवान हे तुमचं सामान वगैरे पाहून तुम्हाला अडविणार नाहीत का? असं त्या मुलीच्या बापाला मी विचारलं. तसा तो म्हणाला, 'अपने घर को जाना, किस को पाबंदी है? और अगर रोका ही तो क्या हुआ? सौ-सव्वा सौ टका देने से कोई नहीं रोक सकता।'

कलकत्याच्या 'आलिक' या साप्ताहिकाच्या एका वार्ताहरानं पाठविलेला हा 'आँखो देखा हाल' आहे. प. बंगालच्या नादिया जिल्ह्याला लागून असलेल्या भारत-बांगला-सीमाक्षेत्राचा.

घुसखोरीची समस्या केवळ आसामपुरतीच मर्यादित आहे, असा एक सार्वत्रिक समज असला तरी प्रत्यक्षात मात्र प. बंगाल, बिहार, त्रिपुरा या राज्यांपुढेही वाढत्या घुसखोरीची भीषण समस्या उभी आहे. तिकडे पश्चिमसीमेवरही राजस्थान, गुजरात, जम्मू व कश्मिर या भागात घुसखोरीचे प्रमाण हळूहळू वाढत आहे. अ-भारतीय नागरिकांच्या बेकायदेशीर घुसखोरीबरोबरच पाकिस्तानी नागरिकांच्या भारतातील बेकायदेशीर किंवा मुदतबाह्य वास्तव्याची ही हजारो प्रकरणे आहेत. बिहार व प. बंगाल या दोन्ही राज्यांत घुसखोरीचे संकट दिवसेंदिवस अक्राळ-विक्राळ स्वरूप धारण करीत आहे. बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यात स्थानिक वनवासी जनता आणि भाटिया-बांगलादेशी मुसलमान यांच्यातील संघर्ष आता हिंसक वळण घेऊ लागला आहे. घुसखोरांची मजल आता थेट राजधानीपर्यंत पोचली असून राष्ट्रपतीभवनापासून अवघ्या काही मैलांवर 'न्यू सीमापुरी' नावाची एक वसाहत घुसखोर बांगलादेशींनी राजरोसपणे वसविली आहे. *गेल्या १२ फेब्रुवारीस कलकत्त्यात पार पडलेल्या* घुसखोरी-विरोधी राष्ट्रीय परिषदेत संकलित झालेल्या आकडेवारीनुसार देशात अवैधपणे राहत असलेल्या घुसखोरांची एकूण संख्या सुमारे एक कोटी आहे. आपल्या महाराष्ट्रातील सुमारे आठ-नऊ जिल्हे वा लोकसभेचे दहा-बारा मतदारसंघ त्यातून सहज निर्माण होऊ शकतात.

घुसखोरीची ही समस्या नवी नसली, तरी ती मुळात प्रकर्षाने लक्षात येऊन त्याबाबत जन-जागरण घडून त्याविरुद्ध संघर्षाची सुरुवात होण्यासच बराच वेळ लागला. या राष्ट्रव्यापी समस्येविरुद्ध पहिले रणशिंग फुंकले ते अर्थातच आसामने! पंजाबात निव्वळ राजकारणापायी आज जो संघर्ष पेटविला गेला आहे, त्यामुळे आसामच्या या लोक-आंदोलनाकडे साहजिकच दुर्लक्ष झाले आहे. अर्थात असे असले तरी *आसामातील सध्याची शांतता* ही टिकाऊ नाही. निराशा, उद्विग्नता, असाहय्यता, अतिरेकी वृत्ती, एक प्रकारची कोंडी झाल्याची भावना, त्यातून सुस्थिर जीवनाचं आकर्षण व पुढे निरुत्साह अशा अतिशय विचित्र मिश्रणाचे एक रसायन आज आसामच्या वातावरणात व्यापून आहे.

आसामात १९८०-८१ मध्ये आंदोलनाच्या आरंभीच्या काळात जी स्थिती होती ती आज राहिलेली नाही हे स्पष्टच आहे. एकाच वाक्यात सांगायचे तर आंदोलनाचा ज्वालामुखी केव्हाच ओसरला आहे. आज पेटलेली आहे ती केवळ एक मशाल! गेल्या वर्ष-दोन वर्षांतील घटना, 'आसू' ने वारंवार दिलेले कार्यक्रम आणि जनतेचा 'आसू' आवाहनांना मिळालेला प्रतिसाद याचा साकल्याने, तपशीलवार विचार केला तर हे दिसून येईल की, काय वाटेल ते होवो ही मशाल विझू द्यायची नाही. यासाठीच मुख्यत्वे आज 'आसू' प्रयत्नशील आहे. ( अर्थात या मशालीचे असंतोषाच्या आगडोंबात रूपांतर करणे आता एकट्या 'आसू' च्या हातात राहिलेले नाही. )

एकीकडे 'आसू' या दिशेने प्रयत्नशील आहे तर दुसरीकडे गेल्या २७ फेब्रुवारीस आपला वर्षाचा वाढदिवस साजरे करणारे सैकिया सरकार लोकमान्यता मिळावी, अगदीच नाही तर निदान जनतेच्या

विरोधाची धार बोथट व्हावी यासाठी साम, दाम, दंड, भेदादी सर्व मार्गांचा वापर करून प्रयत्न करीत आहे. मुख्यमंत्री हितेश्वर सैकिया, अर्थमंत्री महम्मद इद्रिस आणि सार्वजनिक बांधकाममंत्री अन्वरा तैमूर हे उच्चपदस्थ त्रिकूट दिल्लीच्या आशीर्वादाने अत्यंत हुशारीने पावले टाकीत आहे. दडपशाही हे त्यांच्या कारभारातील ठळक सूत्र आहे !

सरकारला ठायी ठायी विरोध करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, ही आपली घोषणा खरी करून दाखविण्याचा हितेश्वर सैकिया यांनी जणू चंग बांधला आहे. मुत्सद्देगिरीत पटाईत असलेल्या या अत्यंत महत्त्वाकांक्षी अहोम मुख्यमंत्र्याने संबंध आसामलाच जणू काही धाकात ठेवले आहे. गेल्या नोव्हेंबरमध्ये मुख्यमंत्रीमहोदय उत्तर आसामच्या शिवसागर जिल्ह्यातील नाझीरा या गावी एका शाळेत काही कार्यक्रमासाठी गेले होते नाझीरा हे खरे तर मुख्यमंत्र्यांचे स्वतःचे गाव; पण अवैध निवडणुकीतून सत्तेवर आलेल्या या मुख्यमंत्र्याला गावात प्रचंड निषेधाला तोंड द्यावे लागले. शाळेच्या कार्यक्रमासाठी म्हणून मुख्यमंत्री मारे ऐटीत शाळेत उतरले. पाहतात तो संबंध शाळेत मूठभर शिक्षकांव्यतिरिक्त कोणी नाही. बेकायदेशीर सरकारच्या या प्रमुखाच्या आगमनाप्रीत्यर्थ गावातल्या तमाम पालकांनी आपल्या पाल्यांना शाळेत पाठविलेच नव्हते. या अपमानाने दुखावलेल्या सैकियांनी तिथल्या तिथे ही शाळा बंद करण्याचे आदेश दिले. शेवटी महिन्या–दीड–महिन्याने सर्व पालकांकडून माफीपत्रे लिहून घेतली गेली, आणि अखेर शाळा सुरू झाली. गौहाटीतील वैद्यकीय आणि पशुवैद्यकीय महाविद्यालये म्हणजे घुसखोरीविरोधी आंदोलनाची महत्त्वाची केन्द्रे ! या दोन्ही ठिकाणी केन्द्रिय राखीव पोलिसांची जणू कायमचीच ठाणी आहेत. आंदोलक विद्यार्थ्यांना संरक्षण देण्याच्या आरोपावरून पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या डीनना पोलिसांनी वेठीस धरले. त्यांच्या घराच्या वेळी अवेळी झडत्या होऊ लागल्या. काही दिवस त्यांना व त्यांच्या सुविद्य पत्नीलाही पोलीसकोठडीची हवा खावी लागली. एका महाविद्यालयाच्या डीनची ही अवस्था तर तिथे विद्यार्थ्यांची मुस्कटदाबी कशा प्रकारे होत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

तीन–साडेतीन महिन्यांपूर्वी त्रिदिब शर्मा नावाच्या एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याने मुख्यमंत्री हितेश्वर सैकिया यांच्या हत्येचा प्रयत्न केल्यापासून तर पोलीसखाते अधिकच चेकाळले आहे. विशीच्या आत बाहेर असलेल्या या कोवळ्या तरुणाने एका समारंभात मुख्यमंत्र्यांवर पिस्तुल रोखल्याच्या या घटनेला प्रमाणबाह्य प्रसिद्धी तर दिली गेलीच; पण सर्वसामान्य सक्रीय विद्यार्थ्यांमागे पोलिसांचा ससेमिरा लावण्यासाठीही तिचे भांडवल केले गेले. गेल्या नोव्हेंबरच्या मध्यासच गौहाटी रेल्वेस्थानकावर झालेल्या बॉंबस्फोटामुळे वातावरण अधिकच चिंताजनक बनले. मोटारसायकली व स्कूटर्सवरून गुन्हेगार पळून जातात म्हणून संध्याकाळी ५ नंतर या दुचाकी वाहनांच्या वापरावर निर्बंध घातले गेले. रेल्वे स्थानकावरच्या या स्फोटात सुमारे वीस जण ठार झाल्याचे प्रत्यक्षात सांगितले जात असले, तरी मृतांची खरी संख्या निदान दुप्पट होती असे हा स्फोट प्रत्यक्ष पहाणारे सांगतात.

हिंसेचे असे तुरळक प्रकार गेल्या सहा महिन्यात अनेकदा घडले असले तरी हे प्रकार संघटितरित्या घडविले जात आहेत, असे मानण्यास काहीही जागा नाही. 'आसू'ने यातील कोणत्याही घटनेशी आपला संबंध नसल्याचे वारंवार सांगितले आहे, शिवाय या घटनांचा कडक शब्दात निषेधही केला आहे. निराशेमुळे अतिरेकी मार्गांचा अवलंब करण्यास प्रजावलेली काही विद्यार्थीमंडळी विशेषतः ग्रामीण भागात, हिंसक प्रकारांच्या मागे लागली आहेत हे खरे असले तरी जनमानसात त्याबद्दल अनुकूलता नाही हे निःसंशय !

या सगळ्या वातावरणात वर्षभराच्या आपल्या कारकिर्दीत हितेश्वर सैकिया यांनी आपले आसन चांगलेच बळकट केले आहे. मुख्य म्हणजे पंतप्रधानांचा विश्वास त्यांनी संपादन केला असून, आता नजिकच्या काळात तरी पक्षांतर्गत कुरबुरींमुळे त्यांचे उच्चाटन होण्याची शक्यता दिसत नाही. प्रागज्योतिषपूर या नावाने नव्याने वसविण्यात येत असलेल्या राजधानीची घोषणा करून त्यांनी असमियांच्या प्रादेशिक अस्मितेला हुशारीने खतपाणी घातले आहे. देशातील अन्य राज्यांपेक्षा, गेल्या वर्षभरात, पंतप्रधानांनी आसामला अधिक वेळा भेट दिली आहे. मुख्यमंत्री सैकिया यांनी घुसखोरांचा प्रश्न सोडवायचा नाही असेच जणू ठरवून टाकले असल्यामुळे घुसखोरी हुडकणारी निवाडामंडळे अगदी आजदेखील नीटपणे काम करू लागलेली नाहीत. अर्थात मुख्यमंत्री सैकिया हे जाणतात की, निवाडामंडळांच्या संदर्भातील चालढकलीमुळे जनसमर्थनाच्या बाबतीत जाणवणारी उणीव अन्य काही मार्गांनी भरून काढली पाहिजे. त्यासाठीच आसामच्या ग्रामीण जीवनात सांस्कृतिक केन्द्राच्या स्वरूपात काम करणाऱ्या शंकरदेवांच्या 'सत्रांना' (छत्रे) भेटी देण्याचा व तिथे स्वागत, पूजा, मानपत्र स्वीकारण्याचा त्यांनी अक्षरशः सपाटा लावला आहे. आसामात आता सर्व काही आलबेल असल्याचे चित्र आसामबाहेर उभे करण्यासाठीही ते प्रयत्नशील आहेत. गेल्या नोव्हेंबरातच आसामात, गौहाटीत, भारत आणि वेस्ट इंडिज यांच्या दरम्यान झालेला क्रिकेटसामना आयोजित करण्याबाबत ते अत्यंत आग्रही होते ते एवढ्याचसाठी. अर्थात जगाला काहीही सांगत असला तरी ४७ वर्षाचा हा अत्यंत चलाख, धूर्त राजकारणी अगदी विश्वासातल्या पत्रकारालाही मुलाखत देताना एकटा राहण्याचे धाडस करत नाही. न जाणो, आणखी कोणी पिस्तुल रोखले तर ?

## घुसखोरांची दहशत

गेल्या सहा महिन्यांतील आसामातील सर्वसाधारण घडामोडींचा आढावा घेताना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने गेल्या २ ऑक्टोबरला गौहाटीत योजलेल्या 'आसाम बचाओ' सत्याग्रहाची नोंद अपरिहार्य आहे. तीन टप्प्यांत योजण्यात आलेल्या राष्ट्रव्यापी 'असम बचाओ' अभियानाच्या अखेरीस पार पडलेल्या या सत्याग्रहात देशाच्या सर्व कानाकोपऱ्यातील साडेआठशेहून अधिक विद्यार्थी–विद्यार्थिनींनी भाग घेतला. असामातील घुसखोरांविरुद्धचा संघर्ष हा केवळ आसाम पुरताच मर्यादित नसून, घुसखोरांची समस्या ही एक राष्ट्रीय समस्या असल्यामुळे त्या विरुद्धच्या संघर्षात सर्व देश असमिया जनतेच्या पाठीशी उभा आहे, ही भावना रुजविण्याच्या दृष्टीने सत्याग्रह हे एक योग्य पाउल ठरले. हा सत्याग्रहाचा बेत हाणून पाडण्यासाठी सैकीया सरकारने शक्य ते सर्व उपाय योजले. सुमारे शे–दोनशे सत्यग्रहींना

फकिराग्राम आणि न्यूबंगाईगाव स्थानकांवरूनच परत पाठविण्यात पोलीस यशस्वी ठरले खरे; पण त्यातलेही काहीजण अक्षरशः धावत-पळत, काही अंतर पायी चालून, तर काही वाहनाने; पण अखेर गौहाटीत पोहोचले. गौहाटीच्या जजेस फील्ड या मैदानात पार पडलेल्या जाहीर सभेनंतर सर्व विद्यार्थ्यांनी आपले मागणीपत्र देण्यासाठी मोर्चाने राजभवनावर जायचे ठरविले. त्या वेळी जमलेल्या शेकडो कार्यकर्त्यांवर केंद्रीय राखीव दलाच्या जवानांशी दोन हात करण्याचा प्रसंग आला. जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांनी अमानुष लाठीहल्ला केला ! मोर्चात सर्वात अग्रभागी असलेल्या विद्यार्थिनींच्या तुकडीवर पोलिसांनी लाथा आणि लाठ्यांचा वर्षाव सुरू करूनही परिषद कार्यकर्त्यांनी पराकोटीचा निर्धार आणि संयम दाखविला व त्यामुळेच पोलीस बावचळून गेले. जोरदार लाठीमार केल्यानंतरही जमाव पांगत नाही आणि चवताळून प्रतिकारही करीत नाही, हे लक्षात आल्याने अखेर मनात नसतानाही पोलिसांना तमाम सत्याग्रहींना अटक करावी लागली. अनुशासनबद्ध विद्यार्थ्यांच्या या विराट, अहिंसक सत्याग्रहाचं कौतुक म्हणून गौहाटीच्या 'दि सेंटिनल' या दैनिकाने खास अग्रलेख लिहिला. 'सेंटिनल' म्हणतो : There was absolutely no question of violence whatso ever on the part of the students assembled. On the contrary they maintained the most rigid discipline and refused to be provoked under any circumstances. In fact one of the police officers was over heard remarking how difficult it had become to provoke the activists. After some time it was the police that seemed to have run short of time and patience for they fell upon the squatting satyagrahis, laying about the defenceless youth with their trucheons and kicking them mercilessly.

१९८३ ची निवडणूक वगळली तर पोलिसांशी जनतेचा सरळ सामना झाल्याची १९८१ नंतरची ही पहिलीच वेळ ! स्थानिक वर्तमानपत्रांनी या उपक्रमाला चांगलेच उचलून धरले. विलगतावादी मंडळींना या राष्ट्रव्यापी सत्याग्रहाने चांगलाच धक्का बसला. देशाच्या अन्य भागातील जनताही या प्रश्नावर सजग आणि सक्रीय असल्याचे या सत्याग्रहाने पुन्हा एकवार सिद्ध केले !

आसाम आंदोलनाचे पुढे काय होणार? आसाम आंदोलनाचा एक अभ्यासक म्हणतो: 'घुसखोरी विरुद्धचा संघर्ष ही ग्रामीण भागात जमिनींचे मूळचे मालक व जमिनी बळकावणारे झपटसुंभ यांच्यातली लढाई आहे. जमिनीचा प्रश्न दैनंदिन जीवनाशी जोडलेला असल्याने, शहरी भागात विशेषतः कार्यक्रमरूपात सुरू असलेल्या आंदोलनाचा जोर ओसरता वाटला तरी असंतोष खदखदत राहील हे निःसंशय !'

आसामात सुमारे ४५ लक्ष घुसखोर आहेत तर शेजारच्या प. बंगालमध्ये ही संख्या 'स्टेटसमन'च्या माहितीनुसार ४० लक्षांच्या आसपास आहे. प्रश्न जवळपास तितकाच तीव्र असूनही बंगालात आंदोलनाची ठिणगीही दिसू नये हे आश्चर्यकारक, त्याहीपेक्षा अधिक खेदजनक आहे. अर्थात असे असले तरी परिस्थिती हळूहळू बदलत आहे. वर्तमानपत्रांनी आता हा विषय चांगला उचलून धरला असून घुसखोरीच्या समस्येकडे आपण वेळीच लक्ष दिले नाही तर भयानक धोके उद्भवतील याची जाणीव विचारवंत वा तत्सम मंडळीत वाढू लागली आहे.

सीमा सुरक्षा दल तैनात केलेले असूनही घुसखोरांची संख्या आज ४० लक्षांचा आकडा ओलांडून अधिकाधिक फुगत चालली आहे. याचे कारण अक्षरशः दररोज चालणाऱ्या या 'मानवी स्मगलिंग'चे कुणाला काही वाटेनासेच झाले आहे. भारताची अत्यंत अनैसर्गिक फाळणी एकदा मान्य केल्यानंतर, अनैसर्गिकपणेच भारतीय तो भारतीय, घूसखोर तो घुसखोर हे तत्त्व सरकारने आणि मुख्य म्हणजे जनतेने स्वीकारण्याची गरज होती; पण ते झाले नाही. परिणामतः नाहिया, २४ परगणा, प. दिनाजपूर, मालडा, मुर्शिदाबाद इ. सीमावर्ती जिल्ह्यांत आज, विशेषतः मुस्लिम लोकसंख्येत, अनैसर्गिक वाढ दिसून येते व ती अनिर्बंधित घूसखोरीमुळेच आहे.

प. बंगालात येणाऱ्या घुसखोरांमध्ये बिहारी मुस्लिमांचे प्रमाण जास्त आहे. बांगलादेशाच्या निर्मितीनंतर आता तिथे 'नकोसे' झालेले हे उर्दूभाषी मुसलमान पाकिस्तानात जाण्याच्या इराद्याने बांगलादेश सोडतात व वाटेत भारतातच सुस्थिर जीवनाच्या आकर्षणाने स्थायिक होतात. टिटाघर आणि कांकिनारा ही गावे बिहारी मुसलमानांचे बालेकिल्ले आहेत. गेडे या गावाहून सिआल्दाला (कलकत्ता) जाणारे अक्षरशः शेकडो प्रवासी मुळात बिहारी मुस्लिम असतात. अनेक गावातून स्थानिक भारतीय मुस्लिम किंवा राजकीय

**प. बंगाल विधानसभा**
**मुस्लिम आमदारांची वाढती संख्या**

| वर्ष | संख्या |
|---|---|
| १९५२ | २२ |
| १९५७ | २३ |
| १९६२ | २५ |
| १९६७ | ३१ |
| १९६९ | ३६ |
| १९७१ | ३८ |
| १९७७ | ४० |
| १९८२ | ४३ |

**बांगलादेशाच्या काही जिल्ह्यांच्या लोकसंख्येत वा लोकसंख्यावाढीच्या प्रमाणात पडलेला फरक दर्शविणारा तक्ता**

| जिल्हा | जनगणनावर्षनिहाय लोकसंख्या | | |
|---|---|---|---|
| | १९५१ | १९६१ | १९७४ |
| पाबना | ३७,५०० | ७०,६१५ | ९९,१६६ |
| मैमनसिंग | २९,७५५ | १,२२,७३९ | १,११,२५० |
| नौखाली | ९५,०४५ | २,०२,५०७ | २,६१,२२६ |

संदर्भ : नॅशनल व्हॉल्यूम, बांगलादेश पॉप्युलेशन : पृष्ठ ३५ (जनगणना अहवाल १९७४)

नेते त्यांना आश्रय देतात. त्यातून काचारीपारा, नांदलपूर, सबजीपारा इ. ठिकाणी घुसखोऱ्यांच्या स्वतंत्र वस्त्या उभ्या राहिल्या आहेत. करीमपूर पोलिसस्टेशनच्या हद्दीतील अनेक जुन्या रहिवाशांनी घुसखोरांच्या आक्रमक दहशतीला घाबरून अक्षरश: पळ काढला आहे. दि. १७ जुलै ८३ च्या 'स्टेटस्मन'च्या बातमीत म्हटल्याप्रमाणे सोंदलपूर भागात बांगलादेशींची नावे मतदारयाद्यात घुसविण्यासाठी खुद्द मार्क्सवादी कम्युनिस्टांनी प्रयत्न केले. अनेकदा मोठमोठे जमिनदार बांगलादेशी मुलांना शाळेत प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात, कारण त्यांच्या आई-वडिलांच्या रुपात त्यांना स्वस्त मनुष्यबळ सहज उपलब्ध होते. बोनगार, बारसात, बसीरहाट या भागात तर अनेक घुसखोरांनी राजरोसपणे जमीन विकत घेऊन शेती सुरू केली आहे.

राजकीय आश्रय, बोकाळलेला भ्रष्टाचार आणि अपुरी सीमा सुरक्षा व्यवस्था हीच या अनिर्बंधित घुसखोरीची खरी कारणे आहेत. प. बंगाल विधानसभेचे उपसभापती श्री. कलिमुद्दिन शम्स शेकडो बांगलादेशींना रेशनकार्डे वा परवानापत्रे देण्यात आघाडीवर असतात हे तर जगजाहीर आहे. केवळ काँग्रेसच नव्हे तर मार्क्सवादी कम्युनिस्टही घुसखोरांचा मतांच्या पेढ्या ( Vote-bankes) म्हणून वापर करतात हे अनेक उदाहरणांवरून स्पष्ट आहे. सत्ताधारी डाव्या आघाडीने तर घुसखोरांना उघड उघड अभय दिले असून केन्द्रीय गृहमंत्रालयाकडून या भागातील नागरिकांना नागरिकत्व सिद्ध करण्याच्या नोटिसा बजावण्याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. डाव्या आघाडीच्या सरचिटणीसांच्या मते घूसखोरांची संख्या अगदी किरकोळ असून त्याबाबत वृत्तपत्रे 'गहजब' करीत आहेत.

बोकाळलेल्या भ्रष्टाचाराबाबतही बरीच तपशीलवार माहिती 'स्टेटस्मन'ने प्रसिद्ध केली आहे. शंभर रुपये दिले की, कोणत्याही बांगलादेशीला भारतात येणे सहज शक्य आहे. घुसखोरीला मदत करणाऱ्या काही धंदेवाईक टोळ्या आणि सीमा सुरक्षा जवानांमध्ये चांगलेच साटेलोटे आहे. या धंदेवाईक टोळ्यांमधील माणसे घूसखोरांकडून माणशी शंभर रुपयाबरोबच सोबतच्या प्रत्येक वस्तूमागे स्वतंत्र कमाई करतात व त्यातला वाटा सीमा सुरक्षा जवानांकडे बिनबोभाट पोचवितात. घुसखोरांना निर्धोक ठिकाणी स्थायिक होण्यास मदत करणारीही काही धंदेवाईक मंडळी आज सीमाक्षेत्रात सक्रीय आहेत घुसखोरीचे हे प्रमाण पिकांच्या कापणीच्या वेळी वाढते. काही वरिष्ठ सीमासुरक्षा अधिकाऱ्यांच्या मतानुसार या काळात दररोज ५०० घुसखोर भारतात येतात. प. बंगालच्या हरिदासपूर पोलीसचौकीवरून प्रतिवर्षी भारतात प्रवेशणाऱ्या ८०,००० बांगलादेशींपैकी निदान २५% लोक परत बांगलादेशात जात नाहीत!

अपुऱ्या सुरक्षाव्यवस्थेच्या संदर्भात नादिया ( प. बंगाल ) जिल्ह्याचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. नादियाची २६९ कि. मी. लांबीची सीमा बांगला देशास लागून आहे. या सीमेवर प्रत्येकी सुमारे १२ जवानांसह एकूण फक्त ३५ ग्रस्त चौक्या आहेत. शिवाय संपूर्ण जिल्ह्याकरता एकच फिरते त्रस्तपथक आहे; साहजिकच गस्तवाल्यां चा डोळा चुकवून, विशेषत: रात्रीच्या वेळी, सीमा ओलांडणे कठीण राहिलेले नाही. बांगलादेशातून आलेले हे घुसखोर आता अधिक सुरक्षित अशा कलकत्त्यात पोचले असून विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार बांगलादेशातील ३ लक्ष बिहारी मुस्लिम आज कलकत्त्यात आश्रय घेऊन आहेत. किद्दरपूर, एकबालपूर, गार्डन रीच, मातियाबुरूज हे काही भाग हळूहळू घूसखोर बहुसंख्य होण्याचाही धोका आहे!

## आता धोका बिहारला

प. बंगालपाठोपाठ घुसखोरीच्या संकटाने हळूहळू बिहारचा घास घ्यायला सुरुवात केली आहे. खुद्द बिहारचा एकही जिल्हा बांगलादेशाला लागून नसला तरी बांगलादेशच्या कुकुरदाह सीमाक्षेत्रांपासून बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यातले किशनगंज हे शहर अवघ्या १८ कि. मी. अंतरावर आहे. बंगाली भाषा बोलू न शकणारे भाटिया मुसलमान अठरा कि. मी. चा पट्टा पार करून बिहारात येणे अधिक पसंत करतात आणि तिथे त्यांना अधिक सुरक्षितता वाटते. भाटिया मुसलमानांच्या या अनिर्बंधित घुसखोरीचे जबरदस्त फटके बिहारमधील, मुख्यत्वे पूर्णिया आणि २४ परगणा या जिल्ह्यांना बसले आहेत. १९७१ मध्ये २२ लाखांच्या घरात असलेली पूर्णियाची लोकसंख्या यामुळे १९८१ पर्यंत ३६ लाखाच्या घरात पोचली असून या वाढीव १४ लाखात तीन लाखांहून अधिक भाटिया मुसलमान असावेत असे तर खुद्द बिहार शासनाच्या प्रवक्त्यानेच सांगितले आहे. किशनगंज तालुक्यातील बेलवा, कोलवा, कुलामनी आणि सिंगिया पंचायतीच्या क्षेत्रात घुसखोरांची गावे वसली आहेत. किशनगंज शहराच्या रुइधासा मोहल्ल्यात तर घुसखोरांनी वस्ती योग्य ठिकाणी कसे जावे याचे मार्गदर्शन करणारे केन्द्रच उघडण्यात आले आहे.

बांगलादेशी नागरिकांच्या घुसखोरीचे वर्णन सामान्यत: 'शांततापूर्ण व अहिंसक अतिक्रमण' असे केले जाते; परंतु बिहारात ज्या पद्धतीने घुसखोर भाटियामंडळी स्वत:ला assert करू लागली आहेत, ती पाहता ही घुसखोरी आता हिंसक आणि तणावजन्य ठरणार यात शंका नाही. गेल्या २६ जुलैला लक्ष्मीपूरच्या (जिल्हा—पूर्णिया ) संथाळ जमातीच्या काही वनवासींना जमिनीच्या प्रश्नावरून भाटिया मुसलमानांनी जीवे मारण्याच्या घटनेने या घुसखोरीला हिंसक वळण लागणार हे स्पष्ट झाले आहे. पूर्णिया जिल्ह्यातील पडाडेरा या गावच्या एका सरपंचाचाही भाटिया मुसलमानांनीच खून केल्याचे आता पोलिसांनीही मान्य केले आहे. आसामातील घुसखोरी हे सांस्कृतिक, भाषिक व आर्थिक आक्रमण समजले जाते. बंगालात घुसखोरीचे प्रमाण आसामइतकेच असूनही भाषेच्या दुव्यामुळे सामीलिकरण ( assimilation ) सहज शक्य झाले आहे. बिहारात मात्र घुसखोरांच्या हिंसक व आक्रमक पवित्र्यामुळे घुसखोर आणि एतद्देशीय जनता यांच्यात दोन हात होण्याची चिन्हे आहेत.

घुसखोरीचा प्रश्न बिहारात असा उग्र बनला, त्यातच विद्यार्थी परिषदेने राज्यभर या प्रश्नावर जनजागृती घडवून आणली, परिणामत: या घूसखोरीकडे दुर्लक्ष करणे बिहारच्या चंद्रशेखर सिंग सरकारला अशक्य झाले आहे. घुसखोरी करून आलेले सर्वच मुसलमान असल्यामुळे एकीकडे 'घुसखोरी नगण्य आहे व कोणालाही सक्तीने बांगलादेशात पाठविणे कठीण आहे.' अशी घोषणा करायची तर दुसरीकडे 'एकही घुसखोर बिहारात ठेवला जाणार नाही.

हे सांगायचे अशी धोरणात्मक कसरत मुख्यमंत्री करीत आहेत. खोटया सेक्युलरिझमसाठी देशाच्या सुरक्षिततेच्या एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे डोळेझाक करणे, इं. कांग्रेस व कम्युनिस्टांपाठोपाठ आता जनता पक्षानेही धोरण म्हणून ठरविले असावे. जनता पक्षाच्या बिहारमधील मुस्लिम आमदारांनी भाटिया मुसलमानांना घुसखोर ठरविण्याला तीव्र विरोध केला आहे. या पक्षाच्याच काही अति-उत्साही आमदारांच्या पुढाकाराने भाटिया मुस्लिमांना दिलासा देण्यासाठी फारुक अब्दुल्लांना पाचारण करण्यात आले होते. बिहार सरकारने त्याबद्दल नापसंती व्यक्त केली व त्यामुळे अखेर अब्दुल्ला-साहेबांचा दौरा रद्द झाला.

बिहारमधील घुसखोरीच्या प्रश्नाचे दुसरे एक वैशिष्टय म्हणजे, इथली जनता या प्रश्नाबाबत अलिकडेच का होईना पण बरीच सक्रिय झाली आहे. विद्यार्थी परिषदेने हा प्रश्न चांगलाच उचलून धरला आहे. घुसखोरीच्या प्रश्नात तातडीने लक्ष घातले न गेल्यास राज्यात आसामसारखे आंदोलन सुरू करू या धमकीपाठोपाठ परिषदेने व्यापक सर्वेक्षणाच्या आधारे हजारो भाटियांच्या नागरिकत्वाबद्दलच्या शंका सरकारदरबारी दाखल केल्या. परिणामतः बिहार राज्य निर्वाचन आयोगाने १४ हजार भाटियांना नागरिकत्व सिद्ध करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत. विद्यार्थी परिषदेनेच फारबिसगंज येथील स्टेट बँकेच्या काही खात्यांत विदेशी पैसा असल्याचा आपला आरोप यशस्वीरीत्या सिद्ध केल्याने सरकारला काही खाती गोठविणे भाग पडले आहे. सौम्य प्रकृतीचा पण करारी बाण्याचा ऐनतिशीतला राजेंद्रप्रसाद गुप्ता हा विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता 'बिहार घुसपैठ–विरोधी समिती'चा सचिव आहे. त्याच्या नेतृत्वाखाली गेल्या १८ डिसेंबरला किशनगंज येथे विद्यार्थी परिषदेने योजलेल्या घुसखोरी–विरोधी राज्यव्यापी परिषदेला हजारो नागरिकांनी प्रतिसाद दिल्याने या प्रश्नाबद्दलची लोकभावना स्पष्ट झाली आहे.

## गरज राष्ट्रीय–जागरणाची

आसाम, प. बंगाल आणि बिहार या तिन्ही प्रांतांत या समस्येचे स्वरूप व तिची तीव्रता यात काहीसा फरक असला तरी अखेर शत्रू एकच आहे – बांगलादेशी घुसखोर! नेमकी हीच भावना रुजविण्याच्या मुख्य उद्देशाने, विद्यार्थी परिषदेच्या पुढाकाराने कलकत्त्यात स्थापन झालेल्या पूर्वांचल घुसपैठ–विरोधी समितीने गेल्या १२ फेब्रुवारीस कलकत्त्यातच घुसखोरी–विरोधी राष्ट्रीय परिषद योजून या प्रश्नाला खऱ्या अर्थाने राष्ट्रीय पातळीवर नेण्याबाबत यशस्वी प्रयत्न केले. ११ राज्यांतून आलेले पत्रकार, राजकीय नेते, समाजसेवक इत्यादी सुमारे ११८ जणांनी ह्या परिषदेत भाग घेतला. आसाम, बिहार व बंगालमधील घुसखोर-विरोधी आंदोलकांना राष्ट्रीय व्यासपीठावर एकत्र आणण्याच्या या प्रयत्नांना 'आसू'ने चांगला प्रतिसाद दिला. आसू–नेते प्रफुल्ल-कुमार महंत, ललित राजखोवा, गौहाटी प्राध्यापक संघटनेचे नेते श्री. हिरालाल दुआरा, नागरी स्वातंत्र्यचळवळीचे एक नेते व आसामचे सेवानिवृत्त पोलीसमहानिरीक्षक श्री. देवकांत काकती; विद्यार्थी परिषदेचे महामंत्री सुशिलकुमार मोदी, उपाध्यक्ष प्रा. बाळ आपटे, संघटनमंत्री श्री. मदन दास, नामवंत अर्थतज्ज्ञ डॉ. कल्याणप्रद भट्टाचार्य, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते डॉ. धनंजय दास आणि डॉ. बी. डी. मिश्रा, आगरतळयाचे (त्रिपुरा) एक ख्यातनाम पत्रकार बिनयभूषण भट्टाचार्य, पूर्णियाचे एक सामाजिक कार्यकर्ते नित्यानंदलाल दास, शिवाय राजकीय पक्षांचे प्रतिनिधी म्हणून सर्वश्री समर गुहा, काशिकांत मोइत्र, अशोक मुखर्जी (जनता), खासदारद्वय श्री. राम जेठमलानी आणि जसवंत-सिंग ( भाजप ), लोकदलाचे खा. स्वामी इंद्रवेश आणि राष्ट्रीय फॉरवर्ड ब्लॉकचे श्री. निहारेंदुदत्त मुजुमदार इत्यादींचा प्रमुख उपस्थितांमध्ये समावेश होता.

एक दिवसाच्या या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री. हंसराज खन्ना यांनी केलेले भाषण हा स्पष्टवक्तेपणाचा नमुना होता. 'उघड उघड शत्रूशी दोन हात करणे सोपे आहे; पण लपतछपत येणाऱ्या घुसखोराला हुडकून त्याला हाकलून लावणे अत्यंत कठीण आहे व म्हणून घुसखोरांच्या बाबतीत सीमाभागातील जनतेने अतिशय सावध असले पाहिजे!' असा इशारा न्या. खन्ना यांनी दिला. या घुसखोरांचा काही राजकीय मंडळींनी मतपेढया ( Vote–Banks ) म्हणून वापर चालविला आहे व ही अत्यंत शरमेची गोष्ट आहे असेही न्या. खन्ना म्हणाले. नागरिकत्व हे केवळ अधांतरी न ठेवता आता त्याच्या राज्यव्यापी नोंदणीची काही व्यवस्था करण्याची वेळ आली आहे असे सांगून न्या. खन्ना यांनी सवाल केला की, संपन्न राष्ट्रेसुद्धा घुसखोरी रोखण्याबाबत काटेकोर असतात, तिथे भारतासारख्या विकसनशील देशाने अकारण हा बोजा का म्हणून स्वीकारावा?

१९७१ च्या भारत–पाक–युद्धाचे सेनानी सेवानिवृत्त ले. जन. जगजीतसिंग अरोरा उद्घाटनसमारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. घुसखोरीचा प्रश्न हा केवळ त्यात राजकारण घुसविण्यात आल्याने किचकट बनला असल्याचे सांगून श्री. अरोरा म्हणाले की, आज आपल्या देशात निवडणुकीतील विजय हेच सारसर्वस्व बनले आहे. सीमेवरती कुंपण वा भिंत बांधण्याची कल्पना हे थोतांड असल्याचे सांगून श्री. अरोरा यांनी राष्ट्रीय जागृतीशिवाय हा प्रश्न सुटणे कठीण असल्याचे सांगितले.

दिवसभराच्या या राष्ट्रीय परिषदेत मुख्यत्वे घुसखोरीच्या प्रश्नाचे स्वरूप व त्याची भीषणता या प्रश्नामुळे निर्माण झालेले सामाजिक–आर्थिक प्रश्न, प्रश्नाची कायदेशीर बाजू व प्रश्नाच्या सोडवणुकीचे संभाव्य मार्ग इत्यादी मुद्द्यांचा सविस्तर विचार झाला. या संमेलनाच्या अखेरीस जे एक निष्कर्ष–पत्र (Statement of Conclusions) प्रसृत करण्यात आले तेही महत्त्वाचे आहे. सर्व सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये एक विशेष जनगणना दशकाच्या मध्यास घेतली जावी, या भागातील सर्व भारतीय मतदारांना ओळखपत्रे दिली जावीत, बांगलादेशातील असहिष्णु वातावरणा-मुळे भारतात येणाऱ्या हिंदू, बौद्ध व ख्रिश्चनादी धार्मिक अल्प-संख्यांकांना शरणार्थी किंवा निर्वासित समजून स्वीकारण्यात यावे, यापुढे घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही निवडणुकीपूर्वी घुसखोरांची नावे मतदारयाद्यांतून वगळली जावीत, संपूर्ण देशात एक नाग-

रिक्तत्वाचे नोंदणी–पुस्तक तयार केले जावे इत्यादी ठळक मागण्या या निष्कर्ष–पत्रात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

घुसखोरीचा प्रश्न एकीकडे दिवसेंदिवस उग्र बनत चालला आहे; पण त्याविषयी पाहिजे तेवढी सार्वत्रिक जागृती अजिबात दिसत नाही. या प्रश्नावर असमिया जनतेने छेडलेला ऐतिहासिक संघर्ष केन्द्र सरकारच्या निगरगट्ट भूमिकेपुढे निष्प्रभ ठरला आहे. विहारमध्ये बंगाली भाषी बांगलादेशींना विदेशी मानण्यास कचरणाऱ्या बंगाल्यांना हाही एक प्रश्न आहे याची जाणीव यायला आत्ताच कुठे सुरुवात झाली आहे. अशा स्थितीत आज मुख्यत्वे या तीन राज्यांपुरताच हा प्रश्न मर्यादित असला तरी उद्या त्याची व्याप्ती राजस्थान, गुजरात, काश्मिर या भागांतही वाढणार आहे हे ओळखून या सर्वांना आपल्या समोरच्या समान शत्रूविरुद्ध लढण्यासाठी एकत्र आणण्याच्या दृष्टीने विद्यार्थी परिषदेच्या पुढाकाराने पार पडलेले हे संमेलन कमालीचे यशस्वी झाले. आसामातील आंदोलनाबद्दल तीव्र व टोकाचे पूर्वग्रह बाळगणाऱ्या बंगाल्यांनी 'आसू' नेत्यांचे स्वागत तर केलेच; पण त्यांचे विचारही शांतपणे ऐकून घेतले ही गोष्ट कमी महत्त्वाची मानता येणार नाही. असमिया नेत्यांना हिंदू बांगलादेशींचा शरणार्थी म्हणून स्वीकार करण्याचा मुद्दा कधीच मानवणार नाही. खोटया निधार्मिकतेच्या एका गंडाने (complex) पछाडलेले आसूचे नेतृत्व घुसखोरांचा प्रश्न हा असमिया संस्कृतीच्या (?) सुरक्षिततेचा प्रश्न आहे या भूमिकेवरून पुढे येऊन तो एक राष्ट्रीय प्रश्न असून सर्व घुसखोरग्रस्त प्रांतांमधील आंदोलकांबरोबर एकत्रितपणे लढून तो सोडविता येईल या भूमिकेला मान्यता देण्यास तयार झाले हे ही या परिषदेचे उल्लेखनीय यश म्हणावे लागेल. आसामच्या संघर्षाला नवा प्राणवायूच नव्हे तर नवी राष्ट्रीय परिमिती मिळवून देण्यात, बंगाल्यांना या संकटाची अधिक स्पष्ट कल्पना आणून देण्यात व व बिहारच्या आंदोलकांना राष्ट्रीय मान्यता देण्यात कलकत्त्याच्या परिषदेचा वाटा मोलाचा ठरणार यात शंका नाही.

घुसखोरीच्या प्रश्नावर राष्ट्रीय जनजागरणाची एक नवी सुरुवात कलकत्ता परिषदेने केली आहे. हा प्रश्न निदान येती दहा वर्षे तरी पुरून उरणारा आहे. आपल्या देशातील खोटया निधार्मिकतेचा भयानक बागुलबुवा, राजकीय निर्धाराचा अभाव, सर्व प्रश्नांत राजकारण आणण्याची घातक सवय आणि यावर कळस करणारी शासकीय मुर्दाड–वृत्ती यामुळे आसामच्या आंदोलनाचे काय झाले ते आपल्या डोळ्यांसमोर आहे. अशा अस्सल समस्येवरच्या आंदोलनांची सातत्याने उपेक्षा झाली तर ही आंदोलने विकृत वळण घेऊन फुटिरतावादी बनू शकतात हेही आपण जाणतो. या पार्श्वभूमीवर देशाच्या संरक्षणाच्या, तुमच्या आमच्या अस्तित्वाच्या प्रश्नाशी निगडित असलेल्या या समस्येबाबत राष्ट्रीय स्तरावर विचारमंथन घडवून राष्ट्रवादी, हिंदुत्ववादी मंडळींनी स्वतःला चांगले assert केले आहे. या आघाडीवरच्या राष्ट्रीय संघर्षाची मशाल निरंतर पेटती ठेवण्यातच आता खरी कसोटी आहे.

एखाद्या घराला वाळवी लागावी तसे हे घुसखोरीचे संकट आहे. शांतपणे, गाजावाजा न करता आपल्या घराचे वासे खाऊन टाकण्याची क्षमता या विषारी संकटात आहे. मानवता आणि खोटया निधार्मिकतेच्या भोंगळ कल्पनांनी वहकलेले आमचे राजकीय नेते या विषयी प्रामाणिकपणे काही उपाययोजना करतील अशी अपेक्षा बाळगणे दुधखुळेपणाचे ठरेल. लोकजागृती व लोकसंघर्ष हाच या समस्येवरचा उपाय आहे. कलकत्त्याची परिषद हे त्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. ☐


अलिप्तपणे तरी भेदकतेने
घडवलेले बिहारच्या
माणसाचे दर्शन.

**पूर्णिया**
अनिल अवचट
बारा रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

राष्ट्रवादी भूमिकेतून
नव्या क्षितिजांचा
घेतलेला शोध.

**बलसागर**
श्री. ग. माजगावकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**
अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

पुणे विद्यापीठ वृत्तविद्या विभागातर्फे विद्यार्थ्यांचा अभ्यासदौरा दरवर्षी दिल्लीला जातो. यंदा या दौऱ्याबरोबर गेलेले संजय संगवई यांनी सवड काढून चंडीगढ गाठले. १२ मार्चला चंडीगढ राजभवनाला घेराव घालण्याचा पंजाबच्या शेतकऱ्यांचा कार्यक्रम होता. त्यासाठी महाराष्ट्रातून एक हजार शेतकरी शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली चंडीगढला अगोदर जाऊन थडकले होते. या कार्यक्रमाचा वृत्तांत गेल्या अंकात दिलाच आहे.
हा त्यांनंतरच्या अमृतसर दौऱ्याचा वृत्तांत.

# अमृतसरमध्ये तीन दिवस

संजय संगवई

पंजाबच्या विस्तीर्ण मैदानी भागात गव्हाचं पीक गच्च उभं होतं. निलगिरी, सुरूच्या रांगा, गहू–करडीची हिरवी–पिवळी शेती, सतलज, रावी, त्यांचे कालवे पार करीत बसेस, ट्रेन्स धावताहेत. मधूनच निळे डगले घातलेले–कृपाण, खंजीर घेतलेल्या जत्थेदारांचे ताफे ट्रक–ट्रॅक्टर्समधून अमृतसरकडे जात होते.

अमृतसरकडे जाताना तशी कोणतीच भावना नव्हती. आतापर्यंत दिसलेले पंजाबचे रूप नेहमीप्रमाणेच होते. बाजारात गर्दी, दोस्तांची बिनधास्त टोळकी, ढाब्यांवर, पानठेल्यांवर तंबाखू मळत येत्याजात्याकडे पाहणारे मजनू, सिनेमासाठी रांगा...हिंदू–शीख असा फरकही जाणवला नाही. बग्गा, ग्रेवाल, बाबा दी हट्टी, जसपाल इंजिनिअर्स, अशासारखी दुकाने एकमेकांना खेटून होती. नि:शंकपणे ये–जा चालू होती. मंडीमध्येसुद्धा असाच प्रकार. सर्वत्र पंजाबीचा मुक्त वापर. हिंदूंमध्ये किंवा आर्यसमाजिस्टांमध्ये हिंदीचाच वापर होतोय असाही प्रकार नव्हता.

मात्र अमृतसर बसस्टॅंडवरून रिक्षा करून गुरुद्वारासाहिबला चला म्हटल्यावर वृद्ध असा हिंदू रिक्षाड्रायव्हर ( प्रधान ) काकुळतीनं म्हणाला, 'भई क्यों जा रहे हो वहाँ ? उससे अच्छा दुर्गादेवी का मंदर है। तुम हिंदू दिखते हो. स्वर्णमंदर मत जाओ। वहाँ सारी मोर्चेबंदी लगाए लोग बैठे है।'

बोलता बोलता गल्ली–बोळातनं चौकघंटाघरचा भाग आला. गुरुद्वाराच्या दुसऱ्या मजल्यावर घडयाळाच्या मनोऱ्याखाली, तटांवर वाळूची पोती ठेवली होती त्यामागे दुनळी, एकनळी बंदुका घेऊन निळया डगल्यातील उंच पगडयातील अकालसेवक शांतपणे बसून होते. परधान म्हणाला, 'देखो, अब मंदरमे सभी तरफ यही है। पुलिस भी उन्हे घबराते है।'

...रात्री यूथ हॉस्टेलमधल्या एका साथीदाराला स्वर्णमंदिरात जाऊन आलो ते सांगितलं न् तो उडालाच. दिल्लीचा होता. दर आठवडयाला अमृतसरला येतो; पण एकदाच दीड वर्षापूर्वी गुरुद्वारात गेला. त्या भागात आसपास फिरणं म्हणजे देखील 'मौत की घाटी में उतरना' आहे असं त्याचं म्हणणं. केव्हा कुठून गोळी येईल त्याचा नेम नाही. तो शहारून गेला.

सुवर्णमंदिर तसं फार गचगचीत वर्दळीत वसलेलं आहे. आसपास सगळी वस्ती. रस्ता आणि प्रवेशद्वार यात अंतरच नाही. बाहेरच्या भिंतीवर शस्त्रधारी असतात. मंदिराभोवती सशस्त्र सैनिक आहेत. आत विस्तीर्ण आवार आहे. नितळ तळयाच्या मध्यावर टुमदार सुवर्णमंदिर आहे. बाजूच्या विस्तीर्ण ओवऱ्यांतून चक्कर काटताना तुम्हाला दिसतात. वरच्या मजल्यावरून नजर ठेवून असणारे संगीन, स्टेनगन तलवार व भाला धरलेले एखादे दुसरे सेवक. ओवऱ्यांतूनसुद्धा ते फिरत असतात. मुख्य मंदिराकड जाताना समोर डोकं टेकवून वर नजर उचला. मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावरील पाच खिडक्यात बंदुकीच्या नळया वर करून पाच सेवक मख्खपणे तुमच्यावर रोखून बघत आहेत. अकाल तख्तमधून दोन–चार स्टेनगनधारी बाहेर पडतात. येथेच संत भिंडरांवाले राहतात. थोडे जरी ढेपाळाल तर गडबडून जाऊन सर्वांचे लक्ष तुमच्याकडे जाईल. अजनबी, नवा माणूस लगेच लक्षात येतो. तो काय करतो, कुठे बघतो, काय वाचतो इकडे कोणी नं कोणी लक्ष देतच असतो. मुख्य मंदिराच्या वरच्या अलिशान लहानशा, सोन्याने मढलेल्या मजल्यात अनेक जण भक्तीत, सबद कीर्तनात तल्लीन होत आहेत. बाजूला पाच बंदुकधारी आहेत.

मुख्य मंदिराच्या उजवीकडे बाहेर तीन मजली नानकनिवासाची इमारत आहे. संत लोंगोवाल तिथेच राहतात. सगळं पाहताना संबंध जुळवीत असताना दहशत, अनाम भीती, उत्सुकता आणि जिगर यांचे एक विचित्र मिश्रण असते. कोणताही निश्चित भाव न घेता आपण लगतच्याच वर्दळीच्या रस्त्यावर परत येतो. संध्याकाळी ६ वाजता मंदिरात अकाली रेडिओ लागतो. सर्वजण त्या बातम्या ऐकतात. इंदिरा गांधींवर त्या वेळी जोरदार टीका होते ! आणि हां ओवऱ्यात एका खोलीत शस्त्रे दिसून जातात.

रात्री अमृतसरची स्थिती थोडी फार बेरूतसारखी होते. मी गेलो तेव्हा रात्रीची संचारबंदी उठविली होती. मात्र संध्याकाळी सहा वाजल्यानंतर मुख्य शहरात जाणे धोक्याचे समजले जाते. सकाळी परत व्यवहार सुरू होतात. पोलीस, केंद्रीय राखीव दल यांनी मंदिराच्या भोवताली थोडया अंतरावर मोर्चे बांधले आहेत. एखाद्या लष्करी राजवटीप्रमाणेच सैनिकांचा सुळसुळाट आहे. रस्त्यावर, दुकानात, कुठेही ते गप्पा मारत उभे असतात. अमृतसर जवळ येऊ लागल्यापासूनच त्यांचे अस्तित्व जाणवू लागले.

सकाळी दरबारासाहिबचा रस्ता विचारीत जाताना जसपालसिंग हा जलंधरचा युवक

भेटला. 'मिरी पीरी दरशन' (शक्ती व भक्तीदर्शन) नावाचे धार्मिक नियतकालिक चालवतो. गुरुगोविंदसिंगांची भक्ती व शक्ती ही तत्त्वे आहेत असे सांगून तो म्हणाला, शिखांची राजनीती व धर्म वेगळा नाही. धर्मातून राजनीती निघाली पाहिजे. मात्र सध्या राजकारणातूनच धर्म निघतो. पंजाबचा सध्याचा प्रश्न हा सगळा सियासती (राजकारणी) लोकांची करणी आहे. सामान्य शिखांचा याच्याशी काहीच संबंध नाही. शीख, हिंदु हे एकाच घरातील असतात त्यामुळे त्यांच्यात कटुता येण्याचे काही कारण नाही.' सर्वसाधारण वातावरण कसे असे विचारताच तो म्हणाला, 'ये तो आप देख ही रहे है ! कुछ अटपटासा लगता है क्या ?'

पंजाबातले ढाबे ही एक अनुभवण्यालायक चीज आहे. मुख्य शहर संपल्यावर लुधियाणा रोड (ग्रँट ट्रक रोड)वरचा 'शुद्ध वैष्णो' ढाबा असाच. रात्री आरामात जाऊन सब्जी फुलका, दूध–चाय आणि बाहेर टाकलेल्या बाजांवर आराम करण्यासाठी ट्रकवाले, देहाती जाट, शहरातले कॉलेज–तरुण येतात. ट्रकवाल्यांत सर्वचजण मुख्यत: मजहबी शीख आहेत ढाबेवाला 'शुद्ध वैष्णो!' पण नेहमीप्रमाणे कचर–पचर बोलत, हसत–खेळत खाणं–पिणं चालू ! त्याच्याकडे एक शीख नोकर आहे. 'बाबूजी होना क्या फुलका ?' 'लो जी, ठेकेदारसाब गरम चाय' करत तो नाचत होता. ढाबेवाला म्हणाला, 'देखो जी यहाँ तो कुछ भी नहीं ! दरबारसाहिब के पास कुछ था, अब वह कम हो गया. हम खुद दरबारसाहिब जाते हैं ! ये नौकर तो सिख्ख है– यहाँ तो कोई तनाव नही !'

तो म्हणाला, 'या राजकीय गडबडीचा लोक आपापसातल्या कुरबुरी निस्तरण्यासाठी उपयोग करत आहेत. बहुतेक सगळे हेच प्रकार. माझ्या गावालासुद्धा हीच कथा. सरपंचाने आपसातल्या जमिनीच्या भांडणातून पाच जणांचा खून केला. तिला एकदम हिंदू-शीख असे स्वरूप दिले !'

संध्याकाळ होत होती. रस्त्यावर, पलिकडच्या मैदानात धूळ उसळत होती. रात्र पडत असताना हा माणूस आपल्या लहानग्या पोरीला कवटाळत म्हणाला, 'भई, ये मजहब, धरम तो अपनी–अपनी सरधा की बात है, वह सियासत से क्यों मिलाया जाएँ ?'

लाली हा अटारीत (भारत–पाक सरहद्दीजवळ) राहणारा रिक्षावाला. मजहबी शीख (मागासवर्गीय) वाघाकडून अटारीकडे जाताना आपल्या पंजाबीत तो आपल्या खेड्यात जाट शीख कशी दांडगाई करतात ते सांगत होता. मध्यंतरी गडबड होती. आता ठीक आहे, असं सांगताना गरिबीमुळे आपल्याला किती त्रास पडतो त्याचंच फार वर्णन करीत होता. मला म्हणाला 'तुम्ही बंगाली दिसता. सरहद्दीपल्याड जायचंय् का? आम्ही खूप बंगाल्यांना असं पोचवून दिलंया शेताडीतनं !'

स्मगलिंग तर इथे होतच असते. बंदुका व इतर शस्त्रे यांचं स्मगलिंग सकाळी ७ वाजण्याआधीच होऊन जाते अशी बहुमूल्य माहिती त्याने दिली !

अमृतसर स्टेशनवरचा सूचासिंग तर म्हणाला, 'भैया माझ्या सहा भावांपैकी चार शीख, दोन हिंदू आहेत. आमच्यात कसचे वैर असणार ?'

ताराचंद हा दयानंद अँग्लो–वेदिक कॉलेजचा विद्यार्थी. या अतिरेक्यांमुळे हिंदु–शिखांमध्ये थोडाफार का होईना दुरावा निर्माण झाल्याचे तो म्हणाला. शीख–हिंदू मित्र. यांचे संबंध तसेच आहेत, मात्र आतापर्यंत नसलेली आपण शीख किंवा हिंदू असल्याची जाणीव निर्माण झाली असे तो म्हणाला.

चंडीगढच्या शेतकरी मेळाव्यात तर कटूतेचा मागमूस नव्हता. भेटलेले सर्व जाट शीख शेतकरी म्हणत होते, 'हमारे गाँव में ऐसा कुछ नहीं.'

अकाली दलाच्या आंदोलनात जाट शीखच जास्त प्रमाणात आहेत. किसानमेळावा एक प्रकारे अकाली दलाचेच शक्तीप्रदर्शन होते. यातील शेतकरी खुलेपणाने बोलत होता. त्यांची हरयाणा–मध्यप्रदेश, महाराष्ट्रातल्या इतर शेतकऱ्यांशी चांगली ओळख झाली.

मात्र त्याच वेळी हरयाणाचे शेतकरी थोडेसे अलग पडल्यासारखेच झाले होते. मिरवणुकांमध्ये पंजाबच्या शेतकऱ्यांपैकी काहीजण 'यक्की–दुक्की चक दे आंगे' असल्यासारख्या जातीय ठरणाऱ्या घोषणा देत होते. सर्वच काही भासवतात त्याप्रमाणे आलबेल नाही हे जाणवतच होते. हथियारबंद जत्थेदार हे बहुसंख्य खेड्यातीलच होते. संत भिंडरांवालाच्या अनुयायांमध्ये बहुसंख्य खेड्यांतील जाटांचाच समावेश आहे.

सुशिक्षित शीख तर आपणाविषयी गैरसमज होऊ नये असा प्रयत्न करतात. इतरांची पंजाबविषयी काय मते आहेत ते जाणून घ्यायला ते उत्सुक आहेत. अमृतसरहून परतताना एक चाळीशीचे शीख अधिकारी बरोबर होते. त्यांनीच मला विचारलं, 'हाऊ इज अमृतसर ?' म्हटलं ठीक आहे. ते म्हणाले, 'बरोबर ! अहो सर्वसामान्य लोकांच्या नेहमीच्या जीवनावर, परस्परसंबंधात कुठेच बदल झाला नाही.' आणखी बरंच बोलत राहिले. पलिकडे एक मॉड युवकांचा ग्रुप पत्ते पिसत होता, सरदारजीही त्यात होते. पंजाबविषयीच त्यात खुल्लमखुल्ला चर्चा चालली होती. अनेक फिरक्या ताणल्या जात होत्या. पंजाबातील काही नेते परिस्थिती यावर कोट्या होत होत्या ! बाजूलाच भाले, किरपाण घेतलेले खेड्यातले जत्थेदार डुलक्या घेत होते, सर्वजण पाणी पिण्यासाठी, छोले–भटूरे चापण्यासाठी जागा मिळविण्यासाठी धर्मनिरपेक्ष (!) रीतीने बोलत, कावत, भांडत होते ! सहज बच्चनच्या मधुशालेतल्या एका रुबाईची आठवण झाली-

मुसलमान और हिंदू है दो,
एक मगर उनका प्याला,
एक मगर उनका मदिरालय,
एक मगर उनकी हाला।
दोनो रहते एक न जब तक
मंदिर मस्जिद मे जाते, बैर बढाते
मंदिरे–मस्जिद मेल कराती मधुशाला।

## वाद कशावरून ?

'अकाली दलाचा लढा केवळ राजकीय मागण्यांसाठी आहे, त्यांचे भांडण केन्द्रसरकारशीच आहे तर पंजाबात हिंदूंचीच का हत्या होते ? अकाली दलाच्या मागण्या जर संपूर्ण पंजाबसाठीच आहेत तर त्यांनी इतर पक्षांना, गटांना आवाहन करून पंजाबच्या मागण्यांसाठी स्वतंत्र व्यासपीठ का नाही निर्माण केले ?' असा सवाल अमृतसरच्या राष्ट्रीय सुरक्षासमितीचे प्रमुख ओमप्रकाश वैद विचारत होते. दुर्गादेवी (दुर्गियाणा) मंदिराच्या परिसरातच समितीचे कार्यालय आहे. वैदजी हे प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे, उच्च शिक्षित गृहस्थ. आपले म्हणणे कुठलीही

लपवाछपवी न करता ते मांडत होते. 'अकाली दलाचा केंद्राशी संघर्ष आहे ना, मग खुल्लमखुल्ला इतर सार्वजनिक आंदोलनाप्रमाणे नेहमीसारखा का संघर्ष नाही? गुप्तपणे, मंदिरातून हा संघर्ष का लढविला जातो? पाण्याचा प्रश्न, चंडीगढचा प्रश्न हे सर्व प्रश्न हिंसाचार करण्याइतके महत्त्वाचे आहेत? पाण्याची मागणी फक्त शेतकऱ्यांची आहे. अकाली दलाला पूर्व पंजाब्यांची काळजी असती तर त्यांनी पंजाबातील कारखाने, शेतमजूर यांच्याही मागण्या मांडल्या असत्या.

'खरं तर यांना पंजाबमध्ये 'सिक्खों का बोलबाला' (सुप्रीमसी) पाहिजे. 'खालसे का बोलबाला', 'स्वतंत्र कौम' या घोषणा काय सांगतात? यांच्या घोषणा काय आहेत! 'धोती-टोपी यमुनापार', 'यक्की दुक्की चक् दे आंगे, ताणवते गोड्डा रख्ख दे आंगे,' 'नीचे बमणी उपर तरखाण, बनके रहेगा खालिस्तान!'

मी म्हटलं विदेशी शक्तींचा हात असल्याचा आरोप इंदिराबाई करतात–

वैदजी म्हणाले, 'प्रेस रिपोर्टवरून तर ते जाणवतेच. अजून एक. या अकालींच्या जत्थ्यांमध्ये सत्याग्रही म्हणून मुसलमान जातात. त्यांना हे आपले भाई मानतात; पण हिंदूंचा द्वेष करतात! ही मुस्लिम तुष्टिकरणाची नीती येते कुठून? हिंदूंच्या विरुद्ध शीख व मुसलमान यांची लॉबी उभी करण्याचा प्रयत्न चालू आहे तो कशाने? अरे भई, हिंदू-शीख एकही मुद्रा के दो भाग नहीं, वे तो एकही है!'

**: मग सध्याच्या अशा बेदिलीच्या, परस्पर अविश्वासाच्या वातावरणाला जबाबदार कोण आहे?**

ते म्हणाले, 'हां, प्रथमतः गुरु नानकदेव विद्यापीठातून तयार होत असलेले वाङ्मय! ते फार भयानक आहे. त्यातून राष्ट्रविरोधी प्रवृत्तींना जोर येतो. शीखांशिवाय इतरांसंबंधी त्यातून घृणा निर्माण केली जाते. शीखबहादूर-हिंदू नेभळट अशी भमिका मांडली जाते.

'दुसरे म्हणजे हा भिंडरांवाला. त्या माणसाला व त्याच्या हस्तकांना कायदा धाब्यावर बसविण्याचा परवानाच मिळाला आहे. या अनावश्यक लायसेन्समुळे प्रशासनाचे नीतीधैर्यच खचलेले आहे. या लोकांनी धर्मस्थानांचा दुरुपयोग सुरू केला. या लोकांचे सरकारमध्ये हस्तक आहेत. पुढे काय कृती होणार याची आधीच वित्तबातमी त्यांना कळते. गुप्तचरखात्यात यांची माणसं आहेत. म्हणजे यांना रोखण्यासाठी सरकार असमर्थ आहे!

'आपली सुप्रीमसी (सर्वंकषता) आणण्यासाठी पूर्वी हुकुमशाही असे. आता लोकशाही आहे. शिखांशिवाय बाकीच्यांनी आपल्यालाच मते द्यावीत म्हणून हा हिंसाचार. बुलेट का प्रयोग बॅलट के लिए किया जा रहा है!'

**: निवडणुका झाल्यावर काही शांतता येईल का?**

'कॉंग्रेस (आय) सत्तेवर आली तर आंदोलन काही थांबणार नाहीच. मात्र अकालींना सत्ता मिळाल्यास शांतता निर्माण होण्यास थोडाफार वाव आहे.

पंजाबमधल्या हिंदूंनी पंजाबीऐवजी हिंदी मातृभाषा म्हणून का नोंदविली याला वैदजींकडे उत्तर नव्हते. हिंदूंनी स्वतःला शिखांपासून अलग पाडले का? यावरही ते बोलले नाही. त्यांचे म्हणणे असे की, शिखांचाच हिंदीला, देवनागरी लिपीला विरोध आहे.

'आमचा (राष्ट्रीय सुरक्षासमितीचा) ना अकालींना विरोध ना शिखांना अराष्ट्रीय कृत्ये व तत्त्व यांच्याविरुद्ध आम्ही आहोत. आरंभी अकालींमध्ये काही मवाळ व समंजस लोक आहेत असे आम्ही समजत होतो. मात्र २५ वे कलम जाळल्याच्या घटनेनंतर सर्वजण एकाच माळेचे मणी आहेत– ते एक आहेत असे समजतो!'

रा. सु. समिती आपल्या कार्यकर्त्यांना अराष्ट्रीय तत्त्वांचा विरोध करण्यासाठी तन मन व धन यांनी तयार करते असे ते म्हणाले.

संत लोंगोवाल हा माणूस वागायला बोलायला एकदम सौम्य. बोलताना कुठेही आवाज चढवणार नाही. शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीच्या इमारतीतील एका खोलीत ते होते. 'संत'च्या दर्शनाला येणाऱ्या जत्थेदारांची ये-जा चालू होती. लोंगोवालांनी नेहमीप्रमाणेच सर्व हिंसाचार इंदिरा गांधींमुळे होतोय असे सांगितले. आदल्याच दिवशी दरबारासिंगवर झालेल्या खुनी हल्ल्याबाबत पूर्ण माहिती मिळाल्याशिवाय प्रतिक्रिया देता येणार नाही असे ते म्हणाले. पंजाबमध्ये हिंदूंची हत्या कोण करते ते समजत नाही, त्यामुळे त्यांना हत्या बंद करायला सांगणारा मी कोण? असेही ते म्हणाले.

## सेक्युलर कोणी नाहीच!

'पंजाबच्या प्रश्नांवर अकालीदलाने दिलेल्या बंदच्या आदेशाला सर्व जमातींनी पक्षांनी पाठिंबा दिला. त्यावरून आम्हाला त्यांचा पाठिंबा आहे. त्यासाठी इतर पक्ष किंवा संघटनांना आमंत्रण द्यायची आम्हाला गरज वाटत नाही. अकाली मोर्चात २ हिंदू व ३ मुस्लिम ठार झाले. हा मोर्चा केवळ शिखांचाच आहे असे नव्हे!'

'शीख हे स्वतंत्र राष्ट्र आहे. ब्रिटनमध्ये स्कॉट्स वेल्श हे वेगळे राष्ट्र म्हणून अस्तित्वात येऊ शकतात तर शीखच का नको?

'हा देश मुळीच सेक्युलर नाही. इथे फक्त हिंदुत्ववाद आहे. अहो, रशियानेसुद्धा बहुराष्ट्रीयता मान्य केली!'

आधुनिक युगात धर्मावर आधारलेले हितसंबंधी गट असणे कितपत योग्य आहेत? त्यावर संत लोंगोवाल म्हणाले, 'आपण पूर्ण सेक्युलर नाहीच. त्यामुळे कुठेच नसण्यापेक्षा कोणत्या तरी भूमिकेवर असणे ठीक आहे.'

हिंदूंच्या संघटना इंदिरा गांधींच्या तालावर नाचताहेत. हिंदू, हिंदी व हिंदुस्थान ही इंदिराजींची पॉलिसी आहे. आपली गादी कायम राखण्यासाठी त्या असे करतात इ. इ. ते म्हणाले.

आधी अकाली प्रश्न सोडवूनच निवडणुका घ्याव्यात. हिंसाचाराच्या बाबत सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्तींमार्फत चौकशी व्हावी; वृत्तपत्रांची भूमिका ५ टक्के योग्य व ९५ टक्के अयोग्य असल्याचे ते म्हणाले. अटवाल, संजीव गोडवरील हल्ले दरबारसाहिब परिसरात नसून बाहेर झाले. (त्यामुळे ती आमची जबाबदारी नाही) असा त्यांचा दावा होता.

लोंगोवाल यांची पंचाईत व्हायची ती भिंडरांवाले यांच्याविषयी प्रश्न विचारल्यावर. भिंडरांवाले-इंदिरा-झैलसिंग संबंध, निर्लेप कौर यांची मागणी याविषयी ते म्हणत– 'नो कॉमेंट्स!'

खेड्यापाड्यांतून शांतता प्रस्थापित

करण्यासाठी अकालीदलाने गट स्थापन केले आहेत. त्यात सर्व धर्मांचे लोक असून, परस्पर-सामंजस्य कसे वाढेल याचा ते विचार करतात असे लोंगोवाल म्हणाले. आम्ही आशावादी आहोत. इंदिराजींशी बोलणी करण्यासही तयार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

रामबाग चौकात राहणारे शहराचे कॉंग्रेस (आय) प्रमुख व आमदार साधुराम शर्मा गुळमुळीतच बोलले. त्यांच्या म्हणण्यानुसार चंडीगड, पाणी, धर्मयुद्ध या काही अकालींच्या खऱ्या मागण्या नाहीत. त्यांच्या खरोखरीच काही मागण्या नाहीत. अकालींना शिखांचा पाठिंबाच मिळवायचाय सत्तेसाठी ! पंजाबच्या राजकारणाचे वर्णन करताना शर्मा म्हणाले, 'पंजाबात ५१ टक्के शीख आहेत. त्यातीलही फार तर २५ टक्के अकालींच्या मागे. म्हणजे एकंदर लोक-संख्येच्या १३ ते १५ टक्के लोक अकालीं-मागे आहेत. मजहबी शिखांचा त्यात समावेश नाही. अकालींच्या तथाकथित मागण्यां-वर सार्वमत घेतले तर फार झाल्यास २५ टक्के पाठिंबा मिळेल. अकाली आमदारात अनेक मोठमोठे जमीनदार आहेत. उदा– हरचरण ब्रार, जगजितसिंग ब्रार, राजा हरिंदरसिंग यांच्यामधूनच कालव्याच्या जादा पाण्याची मागणी पुढे आली. वस्तुत: पंजाबला जादा पाण्याची आवश्यकताच नाही. भाकडा–नानगलचे तीनचतुर्थांश पाणी इथे मिळते. कॉंग्रेस ( आय ) सरकारांनीच इथे शेतीव्यवस्थेत सुधारणा केली. अकालींनी शेतकऱ्यांसाठी यापूर्वी काहीच केले नाही. अकाली दलानेच स्वत:, अंबाला हरयाणाला व कांगडा हिमाचल प्रदेशाला देऊन टाकला. आता बंदुकांच्या भीतीने जर शासन त्यांच्या मागण्या मान्य करेल तर ते घातक ठरेल ?

नानकनिवास, रामदास सराई, एस्. जी. पी. सी. ऑफिस व लंगर हा सुवर्णमंदिर परिसराचा भाग नाहीच असे त्यांचे म्हणणे होते.

हॉलगेट या गजबजलेल्या भागात 'पंजाब केसरी' 'वीर प्रताप' या दैनिकांची कचेरी आहे. बहुसंख्य हिंदू वस्तीचा भाग. बाजार आहे. के. एल्. कमलेश हे वार्ताहर तिथे असतात. त्यांच्या म्हणण्यानुसार अमृतसरची तणावाची समस्या ही कायदा व सुव्यस्थेची समस्या आहे. राजकीय व आर्थिक माग-ण्यांशी याचा काहीच संबंध नाही. शहरात कायद्याची काही इज्जतच राहिली नाही. कर्फ्यू लावा किंवा दफा १४४ लागू करा, लोक आपले मस्त येतात–जातात, तलवारी घेऊन मोर्चे काढतात. पोलीस नुसते बघत राहतात ! अतिरेक्यांमध्ये बहुसंख्य जाट आहेत. या जातीचा स्वभाव ( टेंपरामेंट ) आम्हाला माहीत आहे. 'तुम उनसे अच्छी बात करोगे तो वे अकडेंगे. जूता उतारोगे तो नरम आएँगे !' सुवर्णमंदिरातून एवढा गैर-व्यवहार होत आहे. पोलीस आत का पाठ-वीत नाही ? पोलीस पाठविण्याने काही काही फार मोठा भडका उठेल असं नाही. हे लोक पळून जातील. 'इस मसलेसे थोडी सख्तीसे निपटना चाहिए.'

### थोडी सक्ती हवीच !

अकालीदलाच्या मागण्या राजकीय आहेत. तो सत्तासंघर्ष चालू राहीलच. अमृतसर व पंजाबमधील तणाव चालू ठेवण्यात इंदिरा गांधी व कॉंग्रेस (आय)चा हात आहे. १९८० मध्ये जनता सरकार व अकाली सत्ता पाडण्यास त्यांनी भिंडरांवालेला पुढे आणले. दल खालसाचा पाठिंबा मिळ-विला. आजही अकाली सदस्यांपेक्षा कॉंग्रेस (आय)चे शीख आमदार खेड्यातील जाट शिखांना गुन्हेगारीसाठी प्रवृत्त करत आहेत. इंदिरा, झैलसिंग यांनीच तणाव वाढविला. अकालीदलाचा यात जास्त दोष नाही. त्यांच्यात तलवंडी, तारासिंग, भिंडरांवाले, लोंगोवाल असे अनेक गट आहेत. लोंगोवाल एकटे पडतात. इतर गट अतिरेकीपणाकडे जातात. त्यामुळे आपले अपील कायम ठेवण्या-साठी लोंगोवालगटालासुद्धा अतिरेकी स्टेट-मेंट्स करावी लागतात.

या प्रकरणी थोडी सक्ती पाहिजेच; पण गंमत अशी की, पोलिसांतही जाटांची संख्या जास्त व अतिरेकीही जाटच.

या आंदोलनाला परकी सत्ता ( पाकि-स्तान) पाठिंबा देत असल्याचे कमलेश यांनी उडवून लावले. १९४७ पासूनच पंजाब सीमेवर स्मगलिंग चालू आहे. अनेक वस्तूंचे व अनेकांबरोबर ते चालू आहे. केवळ शिखांनाच हे स्मगलर वस्तू पुरवितात असे नाही.

दुसरे, खुद्द पाकसरकारचाच खलिस्तान कल्पनेला विरोध आहे. खलिस्तान निर्माण होणे म्हणजे दुसऱ्या इस्रायलची निर्मिती होय. हे खलिस्तान भारताशी वैर करणार नाहीच. कारण तेथील सर्व जण त्यांचे भाऊच. त्यांचा रोख राहील उरलेल्या पश्चिम पंजाबवर. शिखांची बहुतेक धार्मिक स्थळे ( ननकानासाहिब ) शहरे पाक पंजाबमध्येच आहेत. त्यामुळे इथे शीख राज्य निर्माण होणे पाकिस्तानला हानिकारक आहे.' हे विधान तेथील 'मशरीक' दैनि-काच्या संपादकांनी केल्याचे कमलेश यांनी सांगितले. इंदिरा गांधींचा याबाबतचा प्रचार हा 'एस्केपिझम'चा प्रकार आहे.

पंजाबमध्ये रा. स्व. संघाची भूमिका फार वेगळी आहे. पंजाब हिंदू संघटनसारख्या संघटनांना पायाच नाही. पवनकुमारसारखे कोणी तरी स्वघोषित नेते केवळ पत्रकबाजी करतात. संघाचा इथे मास बेस आहे असं सांगून कमलेश म्हणाले, 'संघवाले शिखांना हिंदूच मानतात. त्यामुळे त्यांनी दोन्ही जमातींच्या ऐक्यासाठी खूप प्रयत्न केले. चंडीगढ–अमृतसर येथे जनता संमेलने भर-विली. जगजितसिंग अरोरा, प्रतापसिंग तेथे आले. अमृतसरच्या संघशाखांमधूनही शीख आहेत. त्यांनी निर्माण केलेली राष्ट्रीय सुरक्षा समिती पॉझिटिव्ह भूमिका बजावत आहे. हिंसाचाराला त्यांनी प्रोत्साहन दिले नाही. उलट संघामुळेच पंजाबातला हिंदू शांत राहिला. पवनकुमारसारख्यांना फारसा पाठिंबा नाही.

### पत्रकारांचा दोष !

आणि आग धुमसत ठेवण्याचे काम प्रेस-वाली मंडळी करतात असं खुद्द कमलेश म्हणाले. 'पी. टी. आय., यू. एन. आयचे अमृतसरचे वार्ताहर शीख आहेत. ट्रिब्यूनचा वार्ताहर अकाली सदस्य आहे. शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीचा संपर्काधिकारी हरबीरसिंग हा 'ट्रिब्यून' व यू. एन. आयचा अर्धवेळ वार्ताहर आहे. सुवर्णमंदिरपरि-सरात यू. एन. आयला मोफत जागा दिली आहे. पी. टी. आयने आत्ता कुठे स्वतंत्र ऑफिस उघडले. 'इन्होने नॅशनल प्रेस को खरीदा है। संजीव गौड (इंडियन एक्सप्रेस) शर्मा (ट्रिब्यून) राम शर्मा ( पी टी आय ) ऐसे निष्पक्ष रिपोर्टरोंको वे भगा देते हैं।'

ही सगळी अंकित मंडळी लहानशी

घटनासुद्धा ब्लोअप करतात. काही तरी भयंकर घटना घडत आहे असा आभास निर्माण करतात. पी. टी. आय., यू. एन. आय. तर्फे संपूर्ण देशात या बातम्या जातात.

मधू दंडवतेंसारख्या विरोधी पक्षातील एका नेत्याला पंजाबचा प्रश्न हा केंद्र–राज्य संबंधामुळे महत्त्वाचा वाटतो. अधिक स्वायत्तता ही अकालींची प्रमुख मागणी आहे, त्याला सर्व विरोधकांचे समर्थन आहे. मात्र २५ वे कलम जाळण्याच्या त्यांच्या कृतीमुळे कम्युनिस्टांसकट सर्व विरोधी पक्ष त्यांच्यापासून दूर झालेत असे त्यांचे मत.

### रमेश थापर

'सध्याची परिस्थिती म्हणजे आर्थिक विकास प्रक्रियेतला एक टप्पा आहे. देशाच्या सामाजिक वाटचालीत व प्रगतीत प्रत्येक गटाला आपले स्थान असावे, आपल्याला वाव असावा असे वाटते. आसामचा प्रश्न किंवा पंजाब तरी काय, याच प्रेरणेची रूपे आहेत. पंजाबमधल्या जाट शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक उतरंडीत अधिक पुढे जाण्याच्या ऊर्मीतून हे आंदोलन जन्मले आहे–'

'सेमिनार' या चर्चात्मक मासिकाचे प्रमुख संपादक रमेश थापर आपल्या पद्धतीने प्रश्नाची मांडणी करीत होते. ते म्हणाले, 'ग्रामीण भागातील पैसा शहरांमध्ये गुंतविण्याची प्रत्येक गटाची इच्छा असते. आजचे अनेक उद्योगपती, व्यापारी यातूनच पुढे आले. शीख जाट समाजाकडे आज पैसा आहे. त्याला तो वाढविण्यासाठी शहरांमध्ये संधी पाहिजे; पण शहरांमध्ये सर्व क्षेत्र हिंदूंच्याच ताब्यात आहे! यातून येणाऱ्या संघर्षाला धार्मिक रूप मिळाले. प्रत्येक धार्मिक गटाच्या काही आकांक्षा असतात हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्याला मान्यता दिली पाहिजे. पंजाबात, किंबहुना संपूर्ण भारतातच हिंदूंनीच आपल्या हितसंबंधांचे तसेच सांस्कृतिक कल्पनांचे सार्वत्रिकीकरण करून ठेवलेय. दुसऱ्या गटांच्या काही स्वतंत्र आकांक्षा व कल्पना (अॅस्पिरेशन्स) असतात हे मानायला ते तयारच नाहीत!

'जाटांच्या आकांक्षाना मूर्त रूप देऊन त्यांना व्यक्त करणारी दुसरी कोणती संघटनात्मक, संस्थात्मक व्यवस्था नव्हती त्यामुळे त्यांना धार्मिक संघटनांचा आधार घ्यावा लागत आहे. ऐहिक (सेक्यूलर) आकांक्षाना व्यक्त करणाऱ्या इतर व्यवस्था नाही ही भारतीय समाजाचीच शोकांतिका आहे.'

रमेश थापर हे भारतातले अव्वल दर्जाचे बुद्धिवंत आहेत. मात्र असलेल्या परिस्थितीचेच रॅशनलायझेशन करण्याचा सिद्धांत वाद्यांचा कल असतो. तसा हा पंजाबप्रश्न व गटवादी मागण्या योग्य ठरविण्याचा प्रयत्न तर नाही? असे विचारता थापर उत्तरले, 'तो धोका असतोच. मात्र भारतात काय किंवा इतरत्रही अशा 'ग्रुप अॅस्पिरेशन्सला' पर्याय नाही. शिवाय योग्य तो समतोल राखण्यासाठी ही गोष्ट मानावीच लागते.'

'सेमिनार'च्या फेब्रुवारीच्या अंकात पंजाब प्रश्न चर्चिला गेला आहे. तो अंकही पाहण्यासारखा आहे.

पंजाबच्या पाच–सहा दिवसांच्या वास्तव्यात वरवरचे दिसलेले हे असे चित्र. मी तिथे असतानाच दरबारासिंगवर हमला झाला, रेल्वेपट्टी उखडली, सहा जण ठार अशा बातम्या येत होत्या. त्याच वेळी चंडीगढ, जालंदर, लुधियाणा, अमृतसरसारख्या शहरांमध्ये कुठलीच तत्काळ प्रतिक्रिया दिसली नाही. सर्व व्यवहार नॉर्मल होते. अमृतसरमध्येही केव्हा काय होईल याचा नेम नसल्याचे सांगतानाही सर्वसामान्य माणूस आपले नेहमीचे व्यवहार, संबंध थांबवून ठेवत नव्हता. किंबहुना तसा तो थांबवून ठेवला जाऊही शकत नाही. पंजाबात हिंसाचार, तणाव नाही असे नाही; परंतु हा तणाव, हिंसाचार, चार–पाच ठिकाणी, व्यक्तिगत रूपाने, दोन–चार जण निर्माण करतात. त्या गोष्टीचेच फार मोठे स्वरूप आपल्यासमोर येते. याशिवाय जो मोठा भाग नेहमीप्रमाणे सुरळीत चालू आहे त्याच्याकडे लक्षच जात नाही. धार्मिक, भाषिक, पंथीय झगड्यांमुळे नेहमीचे मूलभूत आर्थिक, सामाजिक व्यवहार व संबंध रोकले जाऊ शकत नाहीत. पंजाबमध्ये जे पाहिले ते या नेहमीच्या अनुभवाला पुष्टी देणारेच होते. एवढीच गोष्ट की या वास्तवतेकडे लक्षच दिले जात नाही. तिकडे लक्ष दिल्यास अकारण, कमी माहितीच्या अभावी निर्माण होणारी कटुता कमी होईल.

मात्र त्याचबरोबर पंजाबमधील समस्येचे कॅलिडोस्कोपसारखे अनेकांगी परस्परसंबंधित, बदलते पैलू लक्षात ठेवायलाच हवेत. केन्द्र–राज्यसंबंध, सामाजिक – आर्थिक संघर्ष, धार्मिक चढाओढ, भाषिक प्रश्न राजकीय सत्ता लढा, अंतर्गत भांडणे, यादवी असे सर्व प्रश्न, स्थिती अधिकच गुंतागुंतीची करतात. यासंबंधी लिहिणे हा स्वतंत्र विषयच होईल. □






समाजाची चौकट बदलत असली तरी त्याग उदात्त प्रेम, वात्सल्य, माणुसकी ही मूल्ये बदलत नाहीत. या मूल्यांबद्दल ज्यांना जवळीक आहे त्यांना ‘ विप्रदास ’ ही महान कथा आहे असेच वाटेल आणि ज्यांना कलादृष्टि आहे त्यांना या कादंबरीची घोटीव आकृती नेहमीच मोह घालत राहील.

# शरच्चंद्रांची एक सनातनी कादंबरी ‘ विप्रदास ’

**लेखांक : तीन । लेखक : प्रा. बा. वि. पोतदार**

शरच्चंद्र चटर्जी यांची ‘ विप्रदास ’ही कादंबरी पूर्णपणे नाटयात्म आहे, आणि ती नाटयात्मता विरोधावर आधारलेली आहे. एका गर्भश्रीमंत, आचारनिष्ठ जमिनदार कुटुंबातील व्यक्तींची जीवनसरणी व पाश्चात्य संस्कृतीच्या अर्ध्या हळकुंडाने पिवळया झालेल्या तथाकथित सुशिक्षित बंगाली समाजाची जीवनसरणी यातील हा विरोध आहे. जुन्या भारतीय परंपरेतील मानवता, त्याग, औदार्य, निःस्पृहता व ममता यांचे प्रतीक म्हणजे मुखर्जी कुटुंब. त्या कुटुंबाशी वंदना नावाच्या एका सुशिक्षित, बुद्धिमान, स्वतंत्र विचाराच्या मुंबईकर बंगाली युवतीचा काही लग्नकार्यानिमित्त संबंध आल्यावर ती साहजिकच चिकित्सक नजरेने त्या कुटुंबाकडे व त्या कुटुंबाच्या मूल्यांकडे पाहू लागतो. हळूहळू या कुटुंबाच्या धर्मनिष्ठ व कर्मठ आचारविचारामागे लपलेली माणुसकी, वत्सलता व उदात्तता तिला आकलन होत जाते. तिचा बंगालमधील तथाकथित सुशिक्षित समाजाशीही तिच्या मावशीमुळे परिचय होत जातो. या समाजाची सांस्कृतिहीनता व वैचारिक उथळपणा आणि मुखर्जी कुटुंबाची मूल्ये व जीवनपद्धती यांमधील विरोध जाणवल्यावर वंदना या मुखर्जी कुटुंबाकडे अधिकच आकर्षित होते आणि शेवटी तिच्या जीवनसरणीत परिवर्तन घडून येते, ती या कुटुंबातच समाविष्ट होते.

हे या कादंबरीच्या कथानकाचे सूत्र. कथावस्तू लेखकाच्या मनात रेखीवपणे उभी असल्याने कादंबरीचा आकृतिबंधही रेखीव व ठसठशीत आहे. शरदच्चंद्रांच्या एकंदर कथाविश्वाकडे नजर टाकली तर हा विषय तसा नवीन नव्हे. जणू या मुळेच या कादंबरीत अनावश्यक असे एक वाक्यही नाही. सर्व घटना वा चर्चा आटोपशीर व सूत्रसम आहेत. एखाद्या कुशल, अनुभवी चित्रकाराने आत्मविश्वासाने ब्रशाचा उपयोग करावा तशा पद्धतीने ही कादंबरी लिहिली गेली आहे. कुंचल्याचे फटकारे मोजून-मापून मारलेले. व्यर्थ उधळमाधळ कुठेही नाही. चित्रण पूर्ण संपल्यानंतरच सर्व आकृति वाचकांच्या डोळयांसमोर पूर्णपणे साकार होते. तोपर्यंत रंगछटा अपूर्ण असतात व क्वचित प्रेक्षक भांबावूनही जातात. उदाहरणार्थ, विप्रदास खरोखर कसा आहे ही गोष्ट कादंबरीच्या पहिल्या काही पानात संदिग्ध राहाते. द्विजदासच्या राष्ट्रीय चळवळीकडे तो फार करडया नजरेने पाहातो, द्विजदासच्या तो विरुद्ध आहे असाही आभास सुरुवातीला निर्माण केला आहे. द्विजदासने वंदनेपाशी केलेल्या कथनामुळे व बलरामपूर–कलकत्ता या प्रवासात विप्रदासने वंदनेशी केलेल्या चर्चेमुळे विप्रदासची व्यक्तीरेखा स्पष्ट होत जाते. तथापि अनपेक्षिततेचे धक्के वाचकांना देऊन मगच व्यक्तिरेखा स्पष्ट करण्याची शरदबाबूंना सवयच आहे. शेवटी यज्ञाच्या वेळी झालेले विप्रदासचे वर्तन व गृहत्याग हा वाचकांना धक्का देण्याचाच एक नाटयात्म प्रकार. यातूनच व्यक्तिरेखा साकारते.

विप्रदास हा या कादंबरीचा नायक. विशिष्ट मूल्यांचे व धर्मकल्पनेचे तो प्रतिक आहेच; पण त्याचे व्यक्तिमत्त्वही असाधारण व सामर्थ्यसंपन्न आहे. वंदना त्याच्या व्यक्तिमत्त्वाने भारली गेल्यास नवल नाही. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारी पुरुषार्थ त्याला सिद्ध

आहेत. लंब्याचवडचा कणखर देहाचा, उजाळा दिलेल्या सोन्यासारखा वर्ण असलेला, वाचनाच्या बाबतीत असामान्य धारणाशक्ति असलेला, भीति ही भावना जाणीवेतच नसलेला, कसलीही जबाबदारी एकटयाने खांद्यावर घेण्याबाबत मागेपुढे न पाहणारा, अत्यंत साधा मिताहार ठेवणारा, सर्व बाह्य व आंतरिक बाबतीत स्वयंपूर्ण व सामर्थ्यशाली असा हा माणूस आहे. त्याची भेट होण्यापूर्वीच त्याचा धाकटा भाऊ द्विजदास याच्याकडून वंदनेला विप्रदासची थोडीफार माहिती मिळते. विप्रदास हा एक करडा जमीनदार, त्या भागातील एक 'टेरर' होता असे तिने ऐकलेले असते. द्विजदास म्हणतो; 'इंग्रजीत ज्याला 'अरिस्टोक्रटिक' म्हणतात तसल्या लोकांचे कोणत्या तरी जन्मी आमचे दादा राजे असावेत.' देहाच्या ताकतीच्या बाबतीत विप्रदासची त्या भागात फार ख्याति होती. लाठी, तलवार, बंदूक याबाबतीत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. सर्वजण त्याला भीत; पण तो संतापी नव्हता. एवढया मोठया इस्टेटीची व्यवस्था पाहात असताना त्याला जणू कुणावर संतापायला वेळच नव्हता. तरीही एक त्याची आई सोडली तर असे कुणी नव्हते की त्याच्या डोळयाला डोळा देईल. त्याला युनिव्हर्सिटीची शिक्कामोर्तबे फारशी मिळालेली नसली तरी त्या भागातला तो एक मोठा अभ्यासू पंडितही होता. वाडयाच्या तिसऱ्या मजल्यावरील मोठे ग्रंथालय केवळ एम. ए. झालेल्या द्विजदासने जमवलेले नव्हते. ती विप्रदासची लायब्ररी होती. त्याला वाचायला वेळ केव्हा मिळत असे हे एक कोडेच होते; परंतु त्याच्या वाचनाच्या खुणा प्रत्येक पुस्तकात होत्या. बहुधा वाचनासाठी त्याला श्रमच करावे लागत नसत. पुस्तकातली अक्षरे जणू आपोआप डोळयांतून आत शिरून त्याच्या मेंदूत घुसून बसत असावीत.

द्विजदासने केलेल्या या वर्णनामुळे मुंबईहून आलेल्या वंदनेचे कुतूहल जागृत होते. प्रथम ती विप्रदासच्या व मुखर्जी कुटुंबाच्या सनातनी आचारांची टिंगल करू पाहाते; परंतु नंतर ती विप्रदासला व या कुटुंबाला समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करते. हळूहळू तिच्या नजरेस येते की, विप्रदासचे आचरण रेखीव व भाषण बेताबाताचे होते. वागायला अत्यंत सभ्य व गोड, तरीही प्रत्येक क्षणाला मध्ये काही तरी व्यवधान असल्याची जाणीव होत होती. सर्वांत राहूनही तो सर्वांपासून दूर होता. आश्रित, परिजन, दासी, कारकून वगैरे सर्वांना त्याच्याबद्दल मोठा आदर होता. मोठी भक्ती वाटत होती सर्वांना ! तशीच भीतीही वाटत होती. त्यांना वाट होते ते असे बडे बाबू म्हणजे अन्नदाते, बडे बाबू म्हणजे रक्षणकर्ते; पण बडे बाबू मात्र कुणाचेच नव्हते !

विप्रदासच्या व्यक्तिमत्त्वामुळे, विशिष्ट मूल्यांना व जीवनपद्धतीला महत्त्व प्राप्त झालेले आहे खरे, तथापि एक व्यक्तिरेखा म्हणूनही असामान्य, पुरुषार्थपूर्ण, एकाकी विप्रदासचे हे स्वभावचित्र फार प्रभावी आहे. अन्यायाविरुद्ध एकटयाने झगडण्याची तमा न बाळगणारा, सर्वसामान्य माणसात मिळून मिसळून थट्टामस्करी करू शकणारा, वात्सल्यपूर्ण, संसारदक्ष, व्यवहारी, सर्व मागचे-पुढचे धोरण ठेवून वागणारा, प्रचंड इस्टेट दक्षपणे सांभाळणारा; पयंतु अंतर्यामी निःसंग व एकाकी, कलकत्त्यास आल्यावर एका पहाटे त्याची ध्यानस्थ मूर्ति वंदनेला देवघरात दिसते. ते त्याचे अंतर्यामीचे स्वरूप धर्मकल्पनेने ज्याचे जीवन रेखलेले आहे अशा प्रकारचा विप्रदास हा एक कर्मयोगी तरुण आहे. तो बरेचसे कर्मठ आचारविचार धर्माचा एक भाग म्हणून पाळतो. सोवळेओवळे म्हणजे धर्म नव्हे हे अर्थातच त्याला माहीत आहे. तथापि विविध लहानमोठया कारणांमुळे त्याने या विधिनिषेधांचा स्वीकार केलेला आहे. भारतीय परंपरेचा त्याला अभिमान आहे. सामान्य माणसांना अशा आचारनिष्ठेची व विधिनिषेधांची आवश्यकता असते याची त्याला जाणीव आहे. ज्याला सामान्य माणसांच्या पसाऱ्यात राहायचे आहे त्याने ते आचार पाळले पाहिजेत, नाहीतर तो आदरणीय होणार नाही. त्याचे कार्य व्यवहार्य होणार नाही, याचीही त्याला जाणीव असावी. तथापि ज्याला जे स्वाभाविक नाही ते त्याने करू नये असेच विप्रदासने सांगितलेले आहे. प्रत्येकाने आपला स्वधर्म पाळावा. हा स्वधर्म व धर्म एकरूप झाले तर माणसाला स्वतःशीच झगडा करावा लागत नाही, त्याची बुद्धि संथ वाहणाऱ्या जलप्रवाहाप्रमाणे शांत होऊन जाते. जीवनातील कर्तव्याच्या बाबतीत मग मन द्विधा होत राहात नाही. कर्तव्य व मोह यात अनावर संघर्ष होत रहात नाही. चांगले व वाईट यांतील भेद सहजच कळू लागतो.

मुंबईहून वडिलांबरोबर बंगाल्यातील बलरामपूरला आल्याबरोबर वंदना दयामयी—विप्रदासच्या आईला—नमस्कार करू लागते, तेव्हा दयामयी पूजेत असल्याने, शिवाशिवीच्या भयाने मागे सरकते. या सोवळेपणामुळे आपला व आपल्या वडिलांचा अपमान झाला अशी वंदनेची कल्पना होते व आपल्या स्वाभिमानाला लागलेला धक्का सहन न होऊन ती ताबडतोब बलरामपूरहून कलकत्त्याला निघून जाते. वंदनेची समजूत घालताना विप्रदास जे उत्तर देतो तिथूनच वंदनेच्या परिवर्तनाला सुरुवात झालेली आहे. आपल्या आईची संस्कृति व स्वाभिमान यासंबंधीची कल्पना, तिचे औदार्य व वात्सल्य, आधुनिक सुशिक्षितांची संकुचित दृष्टी व वृथाभिमान याबद्दल थोडक्यात चर्चा करून वंदनेची समजूत घालताना विप्रदास म्हणतो, 'तुमची ही स्वाभिमानाची कल्पना आली कुठून ? शाळाकॉलेजातली मोठमोठी पुस्तकं वाचूनच ना ? माझ्या आईला इंग्रजी येत नाही, तिनं पुस्तकंही वाचलेली नाहीत, तिच्या समाजाची आणि तुझ्या भावनेची जुळणी व्हावी कशी ? एक दिवशी बाबांबरोबर आईचा झगडा सुरू झाला. कारण होते क्षुल्लक; पण काटयाचा नायटा झाला. ते सारंच काही तुला सांगता येत नाही खरं; पण त्या दिवशी मला नवी दृष्टी आली. माझ्या या अशिक्षित आईची स्वाभिमानाची कल्पना मोठी विलक्षण आहे, असं मला वाटलं. काही दिवसांनी अशीच एक गोष्ट निघाली, त्या वेळी मी आईला विचारलं, आई, स्वाभिमानाची एवढी मोठी कल्पना तुला आली कुठून ? मी तिचा सख्खा मुलगा नव्हे हे तुला माहीत आहे ना ? तिची दोन मुलं. द्विजू आणि एक कल्याणी. आई

**'तुमची ही स्वाभिमानाची कल्पना आली कुठून ? शाळा-कॉलेजात पुस्तकं वाचूनच ना ?'**

म्हणाली : 'तुम्हा तिघांना एका जागी एका बिछान्यात लहानाची मोठी माणसात आणायची ज़बाबदारी ज्या कुणी माझ्यावर टाकली त्यानंच मला ही विद्या दिली बाबा, दुसऱ्या कुणी नव्हे'...नमस्कार करण्यासाठी कुणी किती हात उचलला, कोण किती मागं सरकला, नमस्काराला प्रतिनमस्कार करताना कुणी किती मान वाकवली वगैरे बाबतीत मर्यादा घालायची लढाई साऱ्याच देशात चालत असते. तुमच्या प्रत्येक पाठ्यपुस्तकात पानापानातून अस्मितेच्या कैफाला खुराक मिळत असतो; पण स्वत: आई नसताना परक्याच्या लेकराची आई होऊन ज्या दिवशी आई आमच्या या मोठ्या कुटुंबात येऊन मिळाली त्या दिवशी नात्यागोत्याची, घरादारातली सारी माणसं जणू गळ्यात विषाची पिशवी बांधून उठली; पण ज्या वागणुकीच्या जोरावर तिनं साऱ्या विषाचं अमृत करून सोडलं, तो गृहिणीचा अभिमान नव्हता, गृहिणीपदाची जबरदस्तीही नव्हती. ती आईपणाची स्वाभाविक जाणीव होती, स्वाभाविक मर्यादा होती. ही मर्यादा एवढी उंच आहे की, ती ओलांडून जाणं कुणालाच शक्य नसतं. हे तत्त्वज्ञान या आमच्याच देशातलं. परदेशी माणसांना याचा अजून पत्ता नाही. वर्तमानपत्रातले चारदोन लेख वाचून ते म्हणतात की, हिंदी स्त्रिया म्हणजे गुलाम, अंत:पुरात साखळी बांधलेल्या दासी. बाहेरून पाहणाऱ्याला तसं दिसतही असेल, मी त्यांना दोष देत नाही; पण घरच्या चाकरनोकरांच्यासुद्धा सेवेला वाहिलेली ही अन्नपूर्णेची राजेश्वरी-मूर्ती त्या परक्यांना दिसत नसली तरी तुम्हा लोकांनासुद्धा कशी दिसत नाही ?'

## विप्रदासचा गृहत्याग

अर्थात 'शेषप्रश्न'मधील कमलप्रमाणे किंवा 'पथेरदाबी'मधील डॉक्टरबाबूंप्रमाणे विप्रदास हा असामान्य असा एक पुरुषश्रेष्ठ असल्यामुळे त्यांच्याप्रमाणेच तो अनुकरणातीत आहे. त्याचा धाकटा भाऊ द्विजदास, त्याची आई दयामयी, त्याची पत्नी सती, ह्या या कुटुंबातील सर्वसाधारण व्यक्ती; पण या सर्व कुटुंबातील वातावरण एक प्रकारे भारल्यासारखे आहे. या वातावरणात अंतर्गत सुसंगती आहे, एक प्रकारची आंतरिक ओढ आहे व ती केवळ कौटुंबिक स्वाभिमानाच्या पलीकडची आहे. ज्या प्रकारे भारतीय समाजाची धारणा धर्माच्या व त्यागाच्या आधारावर पिढ्या न् पिढ्या होत राहिली त्या जीवनपद्धतीची ही ओढ आहे. माणसे या भारलेल्या वर्तुळातून बाहेर पडत नाहीत, ती उलट आत ओढली जातात. विप्रदासचा धाकटा सावत्र भाऊ द्विजदास हा लहानपणापासून अस्थिर वृत्तीचा, देशभक्तीचे व समाजकार्याचे स्वप्न उराशी बाळगणारा. शेतकरी-कामगारांचा उद्धार करू इच्छिणारा व त्यामुळे वडील व आई यांचा विश्वास गमावून बसलेला; पण वयाबरोबर त्याला समज येत जातो, तसतशी त्याच्या सावत्र दादावर त्याची नि:सीम भक्ती जडते. त्याचे देशभक्तीचे स्वप्न विप्रदासच्या मूल्यांना विरोधी नाही याची जाणीव त्याला स्वत:ला व विप्रदासलाही आहे. धर्म, सत्य, त्याग, न्यायीपणा ही विप्रदासची मूल्ये असल्यामुळे ती शिरोधार्थ करून वडील भावाच्या छत्राखाली द्विजदास स्वखुषीने राहिलेला असतो. देशातली शेकडा नव्वद माणसे अर्धपोटी व उघडी-नागडी फिरत असता आपण जमीनदारी भोगावी हे द्विजदासच्या मनाला गोड लागत नसले तरी विप्रदास विरुद्ध बंड करण्याचे त्याच्या स्वप्नीही नाही. त्याला विप्रदासबद्दल अपार आदर आहे आणि मुखर्जी कुटुंबावर त्याची श्रद्धा आहे.

तसे पाहिले तर या कुटुंबाच्या चित्रणात अवास्तव किंवा वैचित्र्यपूर्ण असे काही नाही. बंगालमध्ये जे जीवन शरदबाबूंना दिसले त्याचा एक भाग त्यांनी येथे रंगविलेला आहे. परंपरेचा व आपल्या कुटुंबाच्या मोठेपणाचा अभिमान, वागणुकीतील संयमितता, आपल्या मोठेपणाला बाध येऊ न देता अतिथि-अभ्यागताचे होणारे हार्दिक स्वागत, दानधर्म, ग्रंथालय, नोकराचाकरांचा गोतावळा व त्यावरील वचक अशी कित्येक वैशिष्ट्ये या ॲरिस्टोक्रॅटिक कुटुंबांची असतात. पुष्कळदा ही कुटुंबे एखाद्या समर्थ अशा कुटुंबप्रमुखाच्या छत्राखाली, वटवृक्षाच्या सावलीखाली वावरावे तशी वावरतात. तथापि मुखर्जी कुटुंबाचे वैशिष्ट्य असे की, या कुटुंबात नोकराचाकरासहित सर्व माणसे प्रेमरज्जूने एकमेकांशी जोडली गेली आहेत. विप्रदासबद्दल सर्वांना जो भीतियुक्त आदर वाटतो, वचक वाटतो, त्याचे मूळ त्याच्या अधिकारात, श्रीमंतीत वा अलिप्तेत नसून त्याच्या धर्मनिष्ठेत, बुद्धिमत्तेत व न्यायीपणावरील त्याच्या विश्वासात आहे.

द्विजदासशी आपली दूरची बहीण वंदना हिचा विवाह करून देऊन वंदनेचा समावेश या कुटुंबात करावा अशी सतीची-विप्रदासच्या पत्नीची इच्छा असते. या संदर्भात द्विजदास वंदनेला म्हणतो, 'माझ्याकडे तू कोणत्या दृष्टीने पाहते आहेस याची मला कल्पना नाही; पण वहिनी, आई, दादा, आमची अतिथिशाळा, गोशाळा, आमच्या देवदेवता व आमचा सारा गोतावळा यांच्यातलाच मी एकजण आहे. त्यांना वगळून मला मोजणं मला शक्यच नाही.' म्हणूनच आजच्या जगातील वाचकाला हे संयुक्त कुटुंब एखाद्या भरलेल्या वर्तुळासारखे वाटते. येथे स्वत:च्या हक्कापेक्षाही एकमेकांसंबंधीच्या प्रेममूलक कर्तव्याला अधिक महत्त्व आहे. तसे पाहिले तर शरच्चंद्राच्या साऱ्या कथाविश्वाचेच हे एक वैशिष्ट्य आहे. वंदना गैरसमज करून घेऊन रागवून उपासपोटी निघून गेली हा तिचाच दोष; परंतु विप्रदासची आई दयामयी तिच्या पाठोपाठ कलकत्त्याला जाऊन तिला मोठ्या प्रेमाने म्हणते, 'माझी एक वेडी पोर रागारागाने उपासपोटी निघून आली, तिची समजूत काढून तिला पुन्हा घरी घेऊन गेल्याशिवाय मला कसं समाधान वाटेल पोरी ?' मोठ्या माणसांना येथे लहानांबद्दल उत्कट वात्सल्य आहे व लहानांना मोठ्यांबद्दल भक्ती आणि आदर आहे. फकिरी वृत्तीचा आव आणणाऱ्या द्विजदासला कादंबरीच्या उत्तरार्धात, विप्रदासच्या गृहत्यागाच्या वेळी, प्रामुख्याने विरह जाणवतो तो वासूचा, विप्रदासच्या मुलाचा. स्वत:लाही एखाद्या वेळी तुरुंगात जावे लागेल असा नुसता दृष्टांत विप्रदासने चर्चेखातर दिला तरी दयामयीचे अंत:करण भीतीने थरकते व तिचे डोळे अश्रूंनी डबडबतात. वंदनेचा, तिला निरनिराळ्या कारणांनी राग आलेला असताही, विप्रदासच्या आजारात वंदनेने केलेल्या त्याच्या सेवाशुश्रूषेची वार्ता वंदनेवरील म्लेंच्छपणाचा शिक्का पुन्हा एकदा पुसून टाकू शकते. कारण या आचारनिष्ठ कुटुंबात आचारा-

पेक्षाही माणुसकी श्रेष्ठ आहे. वासू आजारी असल्याने विप्रदास स्वतःच्या आजाराबाबत घरी कुणाला कळवीत नाही. कळवले असते तर बहुधा दयामयीचा वास्तुशांतीचा यज्ञ बंद पडला असता किंवा निदान बेमुदत लांबणीवर पडला असता. द्विजदास व त्याची वहिनी सती यांचे एकमेकांवरील प्रेम हे तर बंगाली कुटुंबातील एका स्वाभाविक स्नेहाचा नमुनाच आहे. ती द्विजदासची केवळ वहिनी नव्हे, त्याची बहीण, मैत्रीण, आई, सर्व काही.

एकमेकांवर उत्कट प्रेम करणाऱ्या सच्चरित माणसांनी मुखर्जी कुटुंबाचे हे विश्व व्यापलेले आहे व स्वतः त्याग करून दुसऱ्याचे दुःख कमी करण्याची या माणसांना सवय आहे. अनंदा ही पिढीजात दासी. तिचा मुलगा शिकून-सवरून मोठा झाला. विप्रदासच्या कृपेने गावातच नोकरीला लागला. तरी मुलाचा व सुनेचा मोह सोडून आनंदा मुखर्जी कुटुंबाचे कलकत्त्यातील घर सांभाळीत राहिलेली आहे. गावाकडून अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी कलकत्याला येत, मुखर्जींच्या वाड्यात राहून कॉलेजात जात. त्यांच्या जेवणा-खाण्याची, त्यांना हवे नको पाहण्याची जबाबदारी आनंदेने स्वच्छेने आपल्या शिरावर घेतलेली असते. ती या घरातील एक सामान्य दासी; परंतु ती द्विजदासला 'द्विजू' व विप्रदासला 'विपिन' म्हणू शकते. पतीबरोबर गृहत्याग करताना शेवटी निरोपाच्या वेळी सतीला तीव्रतेने आठवण होत असते ती आनंदेची व निमू मांजरीची.

म्हणूनच या भारलेल्या वर्तुळावर आघात करण्याचे धैर्य द्विजदासला किंवा वंदनेला होत नाही. वंदना तर या वर्तुळात भोवऱ्याच्या आकर्षणाने ओढली जावी तशी आकृष्ट होते. या भोवऱ्याच्या मध्यबिंदूकडे–विप्रदासकडे ती अर्थातच जास्त आकृष्ट होते; परंतु शेवटी तिचा असलेला द्विजदास तिला सापडून ती या वर्तुळात त्याच्या बरोबरीने फिरू लागते. सात्त्विक प्रेमाच्या वर्तुळात फिरत राहणारे हे विश्व भंगून जावे असे कुणालाच वाटत नाही. म्हणून द्विजदास व वंदना या कुटुंबासाठी स्वतःच्या प्रेमाचा त्याग करायलाही सिद्ध होऊ शकतात. शेवटी या विश्वावर आघात होतो तो बाहेरच्या विश्वातील पोटभरू स्वार्थी माणसांकडूनच. विप्रदास व त्याचा मेहुणा शशधर यांचे वास्तुशांतीच्या वेळी जे भांडण होते त्यावरून आपल्याला या आघाताचे ओझरते दर्शन घडते. त्याची सविस्तर माहिती देण्याची आवश्यकता शरदबाबूंना अर्थातच वाटत नाही. ते भांडण वास्तुशांतीच्या वेळी अनपेक्षितरीत्या उभे करून त्यांनी वाचकांना मोठा नाट्यात्म धक्का दिलेला आहे आणि त्यायोगे विप्रदासच्या करारी व निःसंग व्यक्तिमत्त्वावर मोठा प्रकाशझोत टाकलेला आहे. आपल्याला थोडा–फार इतिहास कळतो तो असा: शशधर हा विप्रदासचा बालमित्र व मेहुणा. म्हणजे विप्रदासची सावत्र बहीण व द्विजदासची सख्खी बहीण कल्याणी हिचा पती. तोही मोठा जमीनदार; पण हा माणूस स्वार्थी व हलक्या वृत्तीचा असावा. एक दिवस त्याचे सर्वस्व जाण्याची वेळ आली तेव्हा कल्याणीने येऊन भावापुढे पदर पसरला. विप्रदासच्या त्यागाच्या, औदार्याच्या भावनेला आवाहन केले गेले. द्विजदासचे जे होते ते राखून ठेवून विप्रदासने स्वतःचे जे होते ते सर्व शशधरसाठी खर्ची घातले; पण पुढे 'शहा चौधरी आणि कंपनी' एकाएकी दिवाळखोर ठरली. त्या प्रकरणात शशधरने विप्रदासची फसवणूक केली. विप्रदासची खोटी सहीसुद्धा त्याने केली असावी.

कलकत्त्याच्या मुक्कामात एक दिवस विप्रदास आजारी पडून कोर्टातून घरी येतो, त्या वेळीच त्याला शशधरने केलेल्या विश्वासघाताची खबर लागली असावी. निरवानिरवीची भाषा तेव्हापासून त्याच्या तोंडी येऊ लागते. कायद्याचा कीस काढीत न बसता शशधरला स्वतःच चांगली अद्दल घडवावी असाही विचार त्याच्या मनात येऊन गेला असेल. लहानपणी एकदा त्याने एकट्याने एका मुसलमान कुटुंबाची बाजू घेऊन मोठा प्रसंग स्वतःवर ओढवून घेतला होता. त्यातून तो जिवानिशी बाहेर कसा पडला ते कुणालाच माहीत नव्हते. स्वतःलाही एखाद वेळी तुरुंगात जावे लागेल असा दृष्टांत अशा प्रकारच्या विचारातूनच स्फुरलेला दिसतो. तथापि संयमाच्या व सदभिरुचीच्या संस्कारामुळे त्याने शशधरला स्वतः शिक्षा करण्याचा विचार झटकून टाकला असावा. द्विजदासने आता इस्टेटीचा भार स्वतःवर घ्यावा असे मात्र तो आग्रहाने व वारंवार सूचित करतो. कोणतीच गोष्ट निष्कारण करण्याची वा बोलून दाखविण्याची त्याला सवय नसल्याने दयामयी चिंताग्रस्त व भयग्रस्त होते; परंतु तो आपले शब्द सावरून घेतो. शशधरच्या फसवेगिरीबद्दल किंवा स्वार्थीपणाबद्दल कुणाकडे काही बोलावे असे त्याला वाटत नाही. या अफाट जगात तो एक प्रकारे अगदी निःसंग व एकटा. त्याच्या 'ॲरिस्टोक्रॅटिक' स्वभावाचा हा एक पीळ असणे शक्य आहे. तो ज्या उंचीवर वावरत असे तेथपर्यंत चढून जाण्याचे सामर्थ्यच कुणाला नव्हते हे वंदनेचे स्पष्टीकरणही बरोबर असण्याची शक्यता आहे. कोर्टात कायद्याचा कीस काढीत बसणे व मुखर्जी कुटुंबाची गृहछिद्रे जगासमोर उघड करणे हेही त्याच्या स्वाभिमानी व सुसंस्कृत प्रकृतीला अर्थातच मानवण्यासारखे नव्हते. शशधरसारख्या बालमित्राच्या व आप्ताच्या स्वार्थपरायणतेमुळे व त्याने केलेल्या विश्वासघाताने त्याच्या मनाला एक प्रकारे धक्का बसला असावा. तथापि त्यामुळे त्याचे ध्येयवादित्व हलवून बळकट केल्यासारखे होते. स्वार्थलोलुप पोटभरूपणाचे आव्हान धर्मनिष्ठ विप्रदास स्वीकारतो, व संसारत्याग करण्याचे ठरवितो. त्याने शोधून काढलेला मार्ग असामान्य असला तरी त्याच्या मनःपिंडाला तो मार्ग स्वाभाविक व अपरिहार्य आहे. द्विजदासला तरता ठेवून तो स्वतः बुडतो, त्याचे त्याच्यावर सोपवून स्वतः संसारातून निवृत्त होण्याचे ठरवितो. जीवनाच्या शेवटी कर्मयोगी विप्रदासने चतुर्थाश्रमात पदार्पण करणे स्वाभाविकच. तथापि शशधरच्या वर्तनामुळे ती वेळ लवकर येते. आपल्याला हे आकस्मिक असले तरी त्याच्या जीवनाची ती तर्कशुद्ध, स्वाभाविक अशी सांगता आहे व शशधरने केलेला विश्वासघात हा निमित्तमात्र आहे.

मुळातच विप्रदासचे व्यक्तिमत्त्व असे भव्य व उत्तुंग असले तरी त्या व्यक्तिमत्वाचे संपूर्ण दर्शन मात्र लेखकाने आपल्याला पायरीपायरीने घडविले आहे. एखाद्या उंच टेकडीवरचा पुतळा दुरून दिसावा, त्याच्या भव्यतेची कल्पना दुरूनही यावी; परंतु एकेक

**मुखर्जी कुटुंबातील भारलेल्या वर्तुळावर आघात करण्याचे धैर्य द्विजदासाला किंवा वंदनेला होत नाही**

पायरी चढून वर गेल्यावर, जवळ जाऊन सर्व बाजूंनी फिरून तो पुतळा पाहिल्यावर, त्याच्या भव्यतेची खरी साक्ष पटावी, तसे विप्रदासच्या व्यक्तिरेखेच्या बाबतीत वाचकांचे होते. स्वभावपरिपोषणासाठी व नाट्यनिर्मितीसाठी शरदबाबू पुष्कळदा एक साधी युक्ति वापरतात. पुष्कळशा घटना ते रहस्यात दडवून ठेवतात. मग केव्हा तरी त्या त्या वेळी योग्य क्षण पाहून नाट्यपूर्ण पद्धतीने ते रहस्यस्फोट करतात. वास्तुशांतीच्या वेळी अगदी अकाली निर्माण झालेला हा संघर्ष, विप्रदासची समर्थनीय जिद्द, आईचा विरोध, त्याचा गृहत्याग व परिणामी संसारत्याग, या घटना मुखर्जी कुटुंबावर फार मोठा आघात करणाऱ्या आहेत. त्यांच्या आकस्मिकतेमुळे आणि सतीच्या निरोपाच्या करुण प्रसंगामुळे, आपले हृदय इतके हेलावून जाते की, विप्रदासच्या निःस्पृहतेचा व ध्येयनिष्ठेचा तो स्वाभाविक परिपाक आहे, विप्रदासच्या व्यक्तिमत्त्वाचा तो एक प्रथमपासून अस्तित्वात असलेला तेजस्वी पैलू आहे, हे आपल्या लक्षातच येत नाही. खोटेपण व विश्वासघात यांशी कठोर होणे हा विप्रदासचा स्वभावच होता. दयामयीला ते उमगत नाही व लहानपणापासून उराशी धरून वाढविलेल्या या मुलाशी तिची वृद्धापकाळात ताटातूट होते. कुटुंबाचा मोठेपणा, आप्तांचा स्नेह, चार लोकांसमोर एखादी गोष्ट बरी किंवा वाईट दिसेल काय यांचा विचार, या भांडणाच्या प्रसंगी दयामयी करते. तिचा आग्रहीपणा वरील गोष्टीप्रमाणेच अज्ञानातून निर्माण झालेला आहे, म्हणूनच तिचा तोल जातो. उलट शशधरला आपल्या खोलीतून बाहेर घालविणे ही विप्रदासची क्रिया एखाद्या गलिच्छ व दगाबाज किड्याला झटकून टाकावे तशी आहे. तत्त्वनिष्ठ आणि ध्येयवादी माणसाला संधिसाधू व दगाबाज माणसाबद्दल येणारी ती घृणा आहे. सात्त्विक संताप आहे. वरवर जुळवून घेण्याच्या व्यावहारिक कल्पनेस येथे जागाच नाही. जावयाच्या प्रेमामुळे व मुलाने जावयाचा अपमान केल्यामुळे दयामयी रागावते. दयामयीच्या हट्टीपणामुळे विप्रदासवर आकस्मिकरित्या गृहत्यागाचा प्रसंग येतो. तथापि येथून पुढची त्याची विरक्ति अपेक्षितच आहे. गृहत्यागाने सतीचा मृत्यु ओढवतो आणि विप्रदासला गृहत्याग केवळ गृहत्याग न राहता संसारत्याग व संन्यास या पायरीवर पोहोचतो.

### प्रेमाचे उदात्तीकरण

यात विप्रदासच्या व्यक्तिमत्त्वाचा अधिक विकास कथानकाच्या ओघात घडून येतो असेही नव्हे. पात्राचा मनोविकास कथानकाच्या ओघात हळूहळू झालेला दाखविण्याची काही कादंबरीकारांची पद्धत आहे व वाचकांच्या नजरेसमोर झालेला व्यक्तित्वाचा हा विकास अधिक कलात्मक असतो असे मानण्याचाही टीकाशास्त्राचा प्रघात आहे. शरच्चंद्राच्या पुष्कळशा कादंबऱ्यांत स्वभावपरिपोषाची ती पद्धती अंगिकारलेली नाही. तिची त्यांना विशेष आवश्यकताच वाटलेली नसावी. एखाद्या व्यक्तीचे मन, अंतर्मन, आत्मा, त्यातील सूक्ष्म व गूढ मनोव्यापार यांचे विश्वच शरच्चंद्रांना इतके अद्भुत व गुंतागुंतीचे वाटते की, एखाद्या व्यक्तीच्या मनाचा क्रमाक्रमाने झालेला विकास व त्यातील बदल पद्धतशीरपणे दाखविण्याची कसरत त्यांना मोह घालत नाही. जीवाबद्दलचा त्यांचा समज एवढा प्रगल्भ आहे, त्यांचे अंतर्निरीक्षण इतके सखोल आहे व त्यांचे कथनकौशल्य एवढे समर्थ आहे की, ते एखाद्या अद्भुत गुहेत शिरावे तसे माणसाच्या अंतरंगात प्रवेश करतात आणि तिथे दिसणारे अद्भुत वाचकांना क्रमाक्रमाने दर्शवितात. सर्व अंतर्भाग दिलेच असेही नाही. विप्रदासपुरते बोलायचे तर असे म्हणता येईल की, अनेक पैलू असलेली वस्तू जशी हळूहळू आपल्या नजरेसमोर फिरत राहावी, सर्व बाजूंनी तिचे सर्व पैलू आपल्या नजरेखालून जाऊन तिच्यासंबंधी पूर्णांशाने कल्पना हळूहळू आपल्या मनात यावी, तसे विप्रदासच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन वाचकांना हळूहळू होत जाते. ते व्यक्तिमत्त्व आहे तसेच आहे, त्यात बदल नाही. वाचकाला मात्र त्याची पूर्ण जाणीव कादंबरी संपतानाच होते. कथेच्या ओघात विप्रदासचा मानसिक विकास होत जातो असे म्हणता येणार नाही.

मात्र बुद्धिमान व व्यक्तिसंपन्न अशा वंदनेचा परिचय होईपर्यंत स्त्रीच्या मधुर व चतुर अशा प्रेमाशी विप्रदासचा परिचयच झालेला नाही. त्याची पत्नी सती हिचे त्याच्यावरचे प्रेम व वंदनेला त्याच्याबद्दल वाटलेले प्रेम यात अर्थातच फरक आहे. त्याचे स्वतःचे जीवन रेखीव असले तरी अंधश्रद्धेने ग्रासलेले किंवा संकुचित नाही; परंतु ज्या प्रेमाचा स्वीकार त्याच्या नीतिकल्पनेप्रमाणे अशक्य आहे त्या प्रेमाचा मोह त्याला अर्थातच आकर्षू शकत नाही. वंदनेचे त्याच्यावरचे प्रेम हा त्याच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा व वंदनेच्या गोंधळलेल्या अस्थिर मनाचा एक खेळ असू शकेल हे जाणण्याचे तारतम्यही त्याला आहे. अर्थात प्रेम ही गोष्ट शरम वाटण्याजोगी नाही हे कळण्याइतकी त्याची बुद्धि व भावना प्रगल्भ आहे, म्हणूनच तो तिच्या प्रेमाचा केवळ मनाने वात्सल्यपूर्वक स्वीकार करतो. तिच्या विशुद्ध प्रेमाची आठवण त्याला दुःखात सांत्वना देईल, त्याचा एकाकीपणा अंशतः कमी करू शकेल, असे आश्वासून तो आपली कृतज्ञताही व्यक्त करतो. संयमाने प्रेमाचे उदात्तीकरण केल्याशिवाय समाजसुधारणा होऊ शकणार नाही व जो समाजधारणा करतो तोच धर्म. हा धर्म ज्यांना अत्याज्य असतो अशा सहृदय व बुद्धिमान माणसांपैकी तो एक. वंदनेचे प्रेम तो आकलन करू शकतो, तिच्या स्पष्टतेबद्दल तिचा तिरस्कार करत नाही, हाही त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक आकर्षक पैलूच आहे. एका बाजूला मुखर्जी कुटुंब व दुसऱ्या बाजूला सुशिक्षित असा समजला जाणारा समाज यांच्या जीवनपद्धतीतील व मूल्यांतील फरक प्रकर्षाने जाणवल्यामुळे वंदनेच्या मनाचा गोंधळ उडून जातो. त्यातून बाहेर पडून स्थिर होणे ही तिच्या मनाची एक गरज असते. ती आधुनिक समाजातली; परंतु तिचा ओढा तर मुखर्जी कुटुंबाकडे. या कुटुंबाला चिकटून राहाण्यासाठी व मावशीचा परिवार आणि सुधीर यांच्याशी फारकत करून घेण्यासाठी वंदनेचे मन विप्रदासविषयक भक्तीचा आधार घेते. बलवान आसरा शोधण्याच्या या स्वाभाविक प्रतिक्रियेलाच ती प्रेम समजते. शेवटी तिच्या मनाचा गोंधळ नाहीसा झाल्यावर ती द्विजदासचा पति म्हणून स्वीकार करते.

नेहमी मुंबईला राहिलेल्या वंदनेला बंगालमधील सुशिक्षित समाज पाहण्यासंबंधी कुतूहल असते व मावशीच्या घरच्या लग्नामुळे ती संधीही तिला मिळते; परंतु त्या समाजाचा तिला वीट येतो. ऐकावे तेव्हा साडी, गाडी आणि खोट्या प्रेमाच्या गोष्टी, नाही तर वर्तमान पत्रातल्या बातम्यांची निष्फळ व उथळ चर्चा. सारखी बडबड, बकवा, एकमेकांचा मत्सर, सारे अभावाने भरलेले. विप्रदासला ती म्हणते, ' या क्षुद्र टोळक्याच्या बाहेर आहे बंगालचा प्रचंड समाज. अजून तो

मला पहायला मिळालेला नाही. कदाचित असा बाहेरून पाहायला मिळायचा सुद्धा नाही. तरी पण वाटतं, बंगालच्या साऱ्या वातावरणात भरून राहिलाय तो. काही अगदी छोटे आहेत तर काही बडे. या बड्यांची उदाहरणे म्हणजे माझी ताई, अन सासू.' मावसबहिणीच्या लग्नाला गेल्या वेळी ती सुधीरचं प्रकरण संपवूनच येते. सुधीर या कायस्थ जातीच्या तरुणाबरोबर तिचा विवाह होणार असे सर्वजण समजत असतात. तिच्या बोलण्याचे आश्चर्य वाटून विप्रदास विचारतो,

'खरोखरच का सुधीरवर तुझं प्रेम नाही ?'

'नाही.'

'यापूर्वी होतं ना ?'

'मग इतक्या सहजासहजी ते नाहीसं कसं झालं ? इतक्या सहजी ते गेलं म्हणूनच इतक्या सहजी त्याचं उत्तर मिळालं मला. नाही तर आपल्यासमोर मला काही तरी खोटंच सांगावं लागलं असतं. पूर्वी वाटत होतं की, सुधीरवर खरोखरच माझं प्रेम आहे. त्यानंतर एकजण आला नजरेसमोर, सुधीर गेला कुठल्या कुठं. आता पाहते तो तोही गेला कुठल्या कुठं ! हे ऐकलं म्हणजे माझी कीव येईल. हिचं मन इतकं उल्लू कसं असे वाटेल. मुलीच्या जातीच्या दृष्टीने ही शरमेची गोष्ट आहे हे मी जाणते. कुठलीही मुलगी हे कबूल करायची नाही —उलट त्याच्यावरच दोष ठेवण्याचा प्रयत्न करील. कदाचित मीसुद्धा दुसऱ्या कुणासमोर कबूल केलं नसतं; पण का कोण जाणे, आपल्यासमोर मन मोकळं करून बोलायला मला मुळीच संकोच वाटत नाही.' काही सुद्धा न बोलता विप्रदास स्तब्ध राहिला. वंदना बोलत होती. कदाचित हा माझा स्वभावच असेल. कदाचित या वयात हे असंच होत असेल. मन शून्यावर ठरू शकत नाही. चोहीकडे उधळायला पाहातं. कदाचित् तसंही असेल मुलीच्या जातीचा स्वभावच असेल हा सारा जन्मभर शोधतांना प्रेमाचं स्थानच सापडत नसेल !' असे म्हणून ती स्तब्ध राहिली मनातल्या मनात ती कसला तरी विचार करीत असावी. त्यानंतर ती एकदम म्हणाली, 'कदाचित् ही शोधून सापडायची वस्तूच नसेल— नुसतं मृगजळ ! ...एक वर्षापूर्वी या सुधीरबरोबर माझं लग्न व्हायचं ठरलं होतं. त्याची आई आजारी होती म्हणून त्या वेळी ते झालं नाही. काल घरी आले त्या वेळी मनात आलं, त्याच वेळी जर लग्न झालं असतं तर आज असंच त्याला तोडून टाकायला माझं मन तयार झालं असतं का ! कोणत्या उपायानं मन काबूत ठेवत आलं असतं ? धर्मबुद्धीच्या जोरावर ? संस्काराच्या जोरावर ? पण बेफाम झालेलं मन जर काबूत राहायला तयार झालं नसतं तर काय झालं असतं ? ज्या लोकात हे काही दिवस घालवले त्यांच्याचप्रमाणे का मी वागले असते ? अशीच लबाडी, असंच ढोंग, अशीच लपवालपवी करीत, चेहऱ्यावर खोटं हसू ओढून आणून, लोकांना फसवीत का राहिले असते ?'

वंदनेच्या मनाचा हा गोंधळ तिच्या प्रामाणिक व सत्यशोधक वृत्तीमुळेच निर्माण झालेला आहे. प्रेम म्हणजे काय, त्याचे खरोखर स्वरूप तरी काय, की ते केवळ एक मृगजळ, कुणाला तरी कवटाळून स्वतःची फसवणूक करणे ? हा प्रश्न चिरंतन आहे; पण प्रेम खरोखरच गवसले, त्याचा जर खरोखर साक्षात्कार झाला तर खरे प्रेम धर्मनिष्ठेपेक्षाही श्रेष्ठतर असे मूल्य आहे, असा दुसरा एक मुद्दा तिच्या मनात आहे. काही वेळानंतर पुन्हा विप्रदासशी चर्चा करताना ती म्हणते, 'धर्म म्हणजे माणसानंच घडवलेली एक व्यवस्था, एक संस्कारच. अत्यंत दृढ असा संस्कार; पण त्यापेक्षा तो मोठा नव्हे. असे असेल तर धर्म व कर्तव्यभावना यापेक्षा प्रेमभावना ही अगदी वेगळीच नव्हे काय ? प्रेमाची शाश्वती काय ? हा प्रश्न शिल्लक राहतोच; परंतु प्रेमाचा प्रत्यय आला असेल, तरच प्रेम टिकण्यासंबंधी प्रश्न निर्माण होऊ शकेल; परंतु जिथे खऱ्या अर्थाचे प्रेमच नाही, केवळ धर्माचे व कर्तव्याचे पालन म्हणून निष्ठा आहे, अशा वैवाहिक जीवनाने आपले समाधान होऊ शकेल काय ? अशा तऱ्हेचे प्रश्न वंदनेच्या मनात आहेत.

प्रेमाचे महत्त्व धर्मातीत असले तरी प्रेम हे शेवटी धर्माच्या व कर्तव्यभावनेच्या मर्यादेत सीमित होऊनच राहिले पाहिजे. नाही तर समाजच टिकणार नाही. असे उत्तर विप्रदासने सूत्ररूपाने दिलेले आहे. तथापि प्रेमभावनेचा प्रभावीपणा लक्षात घेऊन त्याने असेही सुचविले आहे की, प्रेम या शब्दाची व्याप्तीच आपण वाढविली पाहिजे. प्रेम हे स्त्रीपुरुषांच्या शारीरिक प्रेमाच्या स्वरूपातच आपल्या डोळ्यांपुढे का यावे ? प्रेम ही एक उदात्त भावना असल्यामुळे प्रेमात लज्जास्पद असे काहीच नाही. वंदनेला विप्रदासाबद्दल प्रेम वाटले तर तिला त्याची लाज का वाटावी ? द्विजदास व त्याची वहिनी सती यांचे एकमेकांवर प्रेम नव्हते काय ? प्रेमाकडे, किंबहुना एकंदर जीवनाकडे पाहण्याच्या ज्या दोन मूलभूत प्रवृत्ति आहेत, त्यांना 'रोमॅन्टिक' व क्लासिकल' अशा दोन भिन्न प्रवृत्ति म्हणता येईल. विप्रदासची, किंबहुना भारतीय मनोरचनेची प्रेमविषयक कल्पना 'क्लासिकल' आहे. म्हणूनच प्रेम हे शाश्वत असते, टिकणारे असते, असे आपण धरून चालतो. आणि जे शाश्वत, टिकाऊ आहे ते टिकणार तरी कशाच्या जोरावर ? धर्म, कर्तव्यभावना, निष्ठा, संस्कार, यांच्याच जोरावर ते टिकू शकते, असे आपण धरून चालतो, म्हणून कोणत्या उपायाने मन काबूत ठेवता आले असते, या वंदनेच्या प्रश्नाचे उत्तर, धर्मबुद्धीच्या, संस्काराच्या जोरावर, एवढेच आहे. धर्म हा एक संस्कारच, हे वंदनेचे म्हणणे मान्य करून विप्रदास म्हणतो, 'कदाचित तुझं हे म्हणणं खरं असेल वंदना, तो आमचा संस्कारचं, अगदी बळकट असा संस्कारच; पण माणसाचा धर्म जेव्हा या संस्काराचं रूप धारण करतो तेव्हा तो एकदम यथार्थ बनून जातो. अगदी स्वाभाविक होऊन बसतो...त्या वेळी बुद्धि होऊन जाते शांत—अखंड वाहणाऱ्या जलप्रवाहासारखी ती संथपणे वाहू लागते.'

ज्यांना नवरा स्वतः शोधून टिपून काढावा लागतो अशीच माणसे वंदनेने आतापर्यंत पाहिलेली होती; परंतु वडील माणसे ज्याच्या हाती देऊन टाकतील त्याच्याशी स्वेच्छेनं व पतिपरायणतेनं संसार करण्यात केवढी मनःशांती होती ! रोमॅन्टिक प्रेम म्हणजे जर मृग-

**प्रेम म्हणजे काय ? त्याचं खरं रूप तरी काय ? का ते फक्त मृगजळच ?**

जळ असेल तर दैवावर विश्वास ठेवून, अदृष्टावर विश्वास ठेवून, जो मिळेल त्याच्याशी निःशंक मनाने संसार करणे हेच योग्य नव्हते काय? तिच्या ताईने व विप्रदासनेही तेच केले नव्हते का ? मुंबईस परत आल्यावर वंदनेच्या खाण्याजेवण्यात, संभाषणात आचार–विचारात फरक पडतो. बंगालमधून परत मुंबईला आल्यापासून बरोबर काही तरी गठडी बांधून आणल्याप्रमाणे तिचे वर्तन भासते. आता ती सकाळी उठल्यावर स्नान करून, वडिलांची पदधूली मस्तकी धारण करून नित्याच्या कामास सुरुवात करते. अशोकशी विवाह करण्याबाबत पंजाबची मावशी गळ घालते तेव्हा ती नकार देत नाही. कारण तिचे मन याबाबत श्रद्धापूर्वक उदासीन झालेले असते. बापाला ती म्हणते… ' विप्रदासबाबू म्हणजे एक साधुपुरुष आहेत. यायच्यापूर्वी मला आशीर्वाद देताना त्यांनी म्हटलं होते…जिथं माझं कल्याण होईल असंच स्थळ ईश्वर मला मिळवून देईल. त्यांचा आशीर्वाद खोटा व्हायचा नाही.. तुम्ही मला आज्ञा करा, मी ती पालन करीन. एवढी सुद्धा शंका घेणार नाही की भीति बाळगणार नाही. अशा तऱ्हेने, मुंबईच्या या आधुनिक वंदनेचे मुखर्जी कुटुंबामुळे व विप्रदास मुळे एक प्रकारचे अध्यात्मिक व सामाजिक परिवर्तन झालेले आपण पाहातो.

उनाड दीराच्या गळ्यात वंदनेला अडकवून त्याला जीवनात स्थिर करावे हे सतीचे प्रथमपासूनचे स्वप्न असते. वंदनेचे संस्कार मुखर्जी कुटुंबाशी जुळण्यासारखे नाहीत हे ओळखून द्विजदास वंदनेला प्रथमपासून सावध करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या देशभक्तीला घाबरून बाबांनी सर्व पैसा विप्रदासच्या नावेच ठेवला असावा, म्हणजे तो स्वतः एक प्रकारे विप्रदासवर अवलबूनच होता, हे ही तिला पहिल्या भेटीतच द्विजदास सांगून टाकतो. तिचे वडील विलायतेला जाऊन आलेले, त्यामुळे ती म्लेंच्छ, त्याच्या स्वतःच्या अपवादाशिवाय तिच्या शिवतीचे पाणीसुद्धा त्या घरात कोणी घेतले नसते, हेही द्विजदास बोलून दाखवतो. त्यामुळे वंदनेच्या मनात बंडखोरपणाची, विरोधाची व उपरोधाची जी उसळी उठते, तीतूनच कादंबरीच्या सुरुवातीस तिच्या व विप्रदासच्या चर्चेला सुरुवात झालेली आहे. सोवळेओवळे इ. आचार-विचार म्हणजे माणसाचे खरे दर्शन नव्हे, खरा माणूस त्यापलीकडे असतो, हे केवळ स्वतःला आवश्यक वाटलेले व स्वतःच लादून घेतलेले बाह्य आचार–विचार असतात, हे पाहण्याची दृष्टि विप्रदासकडूनच तिला मिळते. कुतूहला मुळे व विप्रदासला आपल्या हातचे खायला लावण्याच्या ईर्षेने ती हे आचार–विचार पाळू लागते, व तिच्यावरचा म्लेंच्छपणाचा शिक्का पुसला जातो.

सुधीरबाबत दयामयीला कळल्याबरोबर तिची जी प्रतिक्रिया होते तीत दयामयीचे व्यक्तिमत्व स्पष्टपणे दिसून येते. विप्रदासइतका संयम तिच्यात नाही. रागारागाने ती बलरामपूरला निघून जाते, कारण तिची एक प्रकारे फसवणक झालेली असते. वंदनेला धाकटी सून करून घ्यावी असा मोह तिच्याही मनात निर्माण झालेला असतो. पण वंदना ही पूर्वी सुधीरची वाग्दत्त वधू होती हे विप्रदासला माहीत असले तरी पूर्वी दयामयीला माहीत नसते. आता दयामयीच्या या नव्या तुटक वृत्तीचे वंदनेला आश्चर्य वाटून ती स्पष्टीकरणासाठी द्विजदासकडे वळते. मोठ्या संकोचाने, थट्टेच्या आवरणाखाली आपले हृदय लपवून, द्विजदास तिला काही गोष्टींची कल्पना देतो. सुधीरशी झालेला वाङ्‌निश्चय [द्विजदासखातर मोडणे हे वंदनेला सहज शक्य होते, परंतु सुधीरने रिकाम्या केलेल्या सिंहासनावर महामाननीय मुखर्जी कुटुंबातील दयामयीचा पुत्र बसू शकला असता काय ? शिवाय आईच्या मनाला विशेष लागलेली गोष्ट ही की पूर्वी वंदनेचा ज्याच्याबरोबर विवाह ठरला होता तो सुधीर कायस्थ जातीचा होता. वंदनेच्या लक्षात न आलेल्या या अडचणी द्विजदासशी झालेल्या चर्चेत तिला स्पष्ट होतात या कुटुंबावर तिचे प्रेम जडलेले असते, द्विजदासशी विवाह करण्याचा तिचा मानस असतो; पण विप्रदास व व दयामयी यांच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी विवाह करणे द्विजदासला शक्य नसते हे तो स्पष्ट करतो. या निर्णयाबाबत या घरात त्याचा नंबर तिसरा, पहिला आणि दुसरा नंबर, अर्थात आई आणि दादा, ज्या कुणा स्त्रीरत्नाच्या गळ्यात मला बांधतील तिला कवटाळून मी मोठ्या आनंदाने झुलत रहावं ही या घराण्याची सनातन रीत–ती बदलणं काही शक्य नाही, असे तो थट्टेच्या स्वरात तिला सांगतो.

दिसून आलेल्या अडचणीमुळे वंदनेचा विरस होतो. प्रेम, प्रेमविवाह या कल्पनांना या कुटुंबात महत्त्वच नव्हते आणि या कुटुंबाला वगळून केवळ स्वतःला मोजणे द्विजदासला शक्य नव्हते. बहुधा त्याची तेवढी शक्तीच नसावी. विप्रदासप्रमाणे तो स्वयंपूर्ण नाही, तो दुबळा आहे, प्रवाहपतित आहे; तटस्थ आहे व म्हणून तो 'श्रीकांत' ला अधिक जवळचा आहे. या घराण्याशी आलेला आपला संबंध आता संपुष्टात येणार या जाणिवेने वंदना विव्हळ होते. बोलणे पुरे झाल्यावर उठून उभी राहून ती म्हणते, 'बाबांची रजा संपली, उद्या ते जायला निघणार. त्यांच्याबरोबर मीही जाऊ का द्विजबाबू ?'

द्विजदास म्हणाला, 'तेसुद्धा मला सांगता येतंय् का वंदना ? पण गेलीस तर माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊन जाऊ नकोस. तू गेल्यानंतर तुझ्या वतीनं हे सारं काही स्पष्ट करून मी आईला सांगेन. लाज–शरम धरणार नाही. त्यानंतर माझ्यापाशी राहिली ही आजच्या संध्याकाळची स्मृति, अन् राहिला माझा 'वंदे मातरम्' मंत्र.'

पुरुष असूनही द्विजदासने आपल्या भावना संयत ठेवल्या व स्त्री असूनही आपण आपले हृदय निर्लज्जपणे उघड केले, या विचाराने वंदनेला स्वतःची चीड येते व ती बापाबरोबर तत्काळ मुंबईला जायचे ठरवते. तथापि मावसबहिणीच्या लग्नानिमित्त तिला स्टेशनवरूनच परत आपल्या मावशीकडे यावे लागते व मुखर्जी कुटुंबाशी असलेला तिचा संबंध तुटून जाण्याचे केवळ दैवयोगानेच या प्रकारे टळते. तरीही द्विजदासच्या ती अधिक जवळ येत नाही. या कुटुंबाच्या सनातन मूल्यांमुळे तिचा व द्विजदासचा संबंध अशक्य असेल तर त्या मूल्यांच्याच खरेखोटेपणाचा मागोवा घेणे आवश्यक होते. कलकत्याच्या मावशीकडे पाहिलेल्या आधुनिक समाजाच्या मूल्यांपेक्षा मुखर्जी कुटुंबाची मूल्ये तिला श्रेयस्कर वाटू लागतात. विप्रदासशी झालेल्या तिच्या चर्चेचा निष्कर्ष हाच आहे. ही मूल्ये सर्वोच्च नसली तरी श्रेयस्कर आहेत असे तिला वाटते म्हणूनच ती मूल्ये अवमानून तिचा व द्विजदासचा विवाह व्हावा हा विचार ती सोडून देते. नंतर विप्रदासच्या आजारीपणात तिच्या हातून घडलेल्या सेवा–

शुश्रूषेमुळे ती पुन्हा एकदा मुखर्जी कुटुंबाच्या हृदयात स्थान मिळवते; परंतु द्विजदासपेक्षाही काही विशिष्ट मूल्यांवर, जीवनसरणीवर तिचे लक्ष आता केंद्रित झालेले आहे. त्या मूल्यांचा–जीवनसरणीचा मागोवा शेवटपर्यंत घेण्याचा प्रयोग स्वतःच्या जीवनावर करून पाहाण्याचा निर्णय तिने घेतलेला आहे. या निर्णयातून व या प्रयत्नातूनच तिला शेवटी द्विजदासचा लाभ होतो.

विप्रदासवरील भक्तीच्या बाबतीत वंदना द्विजदासलाही मागे टाकून पुढे जाते. तिच्या स्त्रीप्रेमाचे रूपांतर भक्तीत झालेले आहे म्हणूनही त्या भक्तीला विशेष धार आहे. विप्रदास कधीही चूक करणार नाही असे ती शशधरबरोबर विप्रदासच्या झालेल्या भांडणाच्या प्रसंगी निश्चयपूर्वक सांगते. त्यानंतर सतीला व विप्रदासला स्टेशनवर पोहोचवून द्विजदास उद्‌विग्न अवस्थेत परत येतो व विप्रदासच्या गृहत्यागाच्या संबंधात वैतागाने तो काही उद्‌गार काढतो, तेही वंदनेला आवडत नाहीत. विलक्षण श्रद्धेने व उत्कटतेने जपलेल्या मूर्तीला धक्का लागला तर भक्त जसा विव्हळ होतो, तशी ती विव्हळ होते. तिच्या स्त्रीहृदयात विप्रदासबद्दल भक्ति व प्रेम ही तर एकवटलेली आहेतच. खेरीज ती ज्या मूल्यांचा मागोवा घेत आहे त्यांचे विप्रदास हे प्रतीक आहे. ते प्रतीक ढासळल्यास तिने स्वीकारलेली मूल्येही ढासळण्याचा संभव होता. म्हणूनच द्विजदासने त्याच्या या भयंकर विपत्कालात केलेल्या प्रेमयाचनेलाही ती होकार देत नाही. या कुटुंबात विप्रदासच्या मनात विवाहपूर्व प्रेमाला काहीच किंमत नाही हे तिच्या जाणिवेत पक्के रुजलेले असते. म्हणूनच प्रेमाबिमाच्या भानगडीत न पडता एखादी योग्य वधु शोधून काढून द्विजदासने आता संसारी बनावे, कुटुंबाचे व इस्टेटीचे जे राहिले आहे ते राखावे, असा पोक्त उपदेश ती द्विजदासला वडिलकीच्या नात्याने करते. विप्रदास तिला आकलन झाल्याने व द्विजदासइतकी ती दुर्बल नसल्याने ती जणू स्वतःला वडीलच समजते.

नंतर सतीच्या मृत्यूमुळे व विप्रदासच्या संसारत्यागामुळे विप्रदास अशा एका पातळीवर जातो की, तेथे त्याचा पाठपुरावा करणे वंदनेलाही शक्य होत नाही. तिच्या अनुकरणशक्तीच्या पलीकडे तो आता पोहोचलेला आहे. त्याच्या अलिप्ततेची, निःसंगवृत्तीची पूर्वी तिला जाणीव झालेली असली तरी भवबंधनापासून व या जगापासून खरोखरीची अलिप्तता म्हणजे काय हे आता तिला प्रत्यक्ष दिसून येते. त्या अलिप्ततेतील निर्विकारता व कठोरताही तिला खरोखर जाणवते. म्हणूनच ती आता सहजपणे विप्रदासच्या वात्सल्याचा व द्विजदासच्या प्रेमाचा स्वीकार करू शकते. तिच्या हृदयसिंहासनापेक्षाही विप्रदासचे स्थान फार उंच आहे अशी तिला निःसंदेह खात्री पटल्यामुळे तिच्या हृदयसिंहासनावर द्विजदास पुन्हा सुप्रतिष्ठित होतो. विप्रदासच्या भाषेत बोलायचे तर जो तिचा होता तो तिला मिळतो, तिचा प्रयोग पूर्ण होतो तो आणखी एका दृष्टीनेही पूर्ण झालेला आहे. द्विजदासचे पत्र वाचून वंदनेचे वडील रायसाहेब यांच्या डोळ्यांतूनही आसवांच्या धारा लागतात. ते म्हणतात, 'आजच जा पोरी, मी नको म्हणणार नाही.' मुखर्जी कुटुंबाचे व त्या कुटुंबाच्या मूल्यांचे महत्त्व त्यांनाही आता कळलेले आहे. हा केवळ वंदना–द्विजदास यांच्या प्रेमाचा मामला राहिलेला नाही, तिच्या वडिलांचाही आशीर्वाद तिला मिळतो. म्हणूनच द्विजदास वरची नवी संकटे पाहून केवळ दयाबुद्धीने वा करुणेने ती द्विजदासचा स्वीकार करते असे मानण्याचेही कारण नाही. सुधीर, द्विजदास, अशोक, विप्रदास असा तिचा माणसांचा शोध चालू होता तो आता संपलेला आहे व द्विजदासवर स्थिर झालेल्या तिच्या मनाला तिच्या वडिलांचा आशीर्वाद मिळालेला आहे.

म्हणूनच ही कादंबरी म्हणजे–वंदना–द्विजदास यांच्या प्रेमाची कथा नाही, म्हणूनच ही विप्रदासच्या मूल्यांची, भारतीय मूल्यांची कथा आहे. म्हणूनच या भारलेल्या वर्तुळात अक्षयबाबूंच्या मैत्रिणीचा प्रवेश होऊ शकत नाही. द्विजदासला ही मुलगी सांगून आलेली असते. शशधरशी व दयामयीशी नाइलाजाने भांडून यज्ञाच्या वेळीच विप्रदासला घर सोडावे लागते. त्या आणीबाणीच्या विपत्कालात दयामयीच्या व द्विजदासच्या खाण्यापिण्याची काळजी मैत्रेयी पराकाष्ठेने घेते. त्यात नाटकीपणा नसला तरी एक प्रकारची यांत्रिकता आहे. उलट तिच्या अन्य उद्‌गारांवरून तिच्या मनाचा संकुचितपणा द्विजदासला दिसून येतो. त्याला ती जेवायला वाढीत असताना एक दिवस तिच्या मेहुण्याचा विषय निघतो. आपली बायको वारल्यावर त्याने एक दिवस मेहुणीला म्हणजे मैत्रेयीला मागणी घातलेली असते. हा मोठा निर्लज्जपणा होता असे मत मैत्रेयी व्यक्त करते. तो बिजवर होता हे खरे; पण काही का असेना, निदान लीलेची मुले सुखाला लागतील असे तिच्या आईवडिलांनाही वाटले होते; पण बिजवर मेहुण्याशी लग्न करून बहिणीच्या मुलांचे संगोपन करण्याची कल्पना मैत्रेयीला मुळीच आवडलेली नसते. ती रागाने म्हणते, 'जसं काही लीलेची मुलं पोसण्याखेरीज आयुष्यात दुसरं काही ध्येयच नाही मला. मी अगदी स्वच्छ सांगितलं की, पुनः ही गोष्ट काढाल तर गळफास लावून जीव देईन!'

द्विजदास म्हणाला, 'हे तुझं बोलणं बरोबर नाही मैत्रेयी. बिजवराशी विवाह केल्याने मोठा बिघाड होतो असं मानण्याचं कारण नाही. माझ्या दादाला लहानपणी मोठा केला तो माझ्या आईनेच ना?

मैत्रेयी म्हणाला, 'पण आता शेवटी परिणाम काय झाला? आजच्या सारखी भयंकर आपत्ति या घरावर कधी आली होती का?'

शशधर हा कल्याणीचा म्हणजे विप्रदासच्या सावत्र बहिणीचा नवरा होता, म्हणून हे भांडण झाले असावे असे मैत्रेयी सूचित करते. बाहेरच्या काही लोकांना कदाचित असेच वाटले असावे. वस्तुस्थिती अशी होती की, द्विजदासच्या देशभक्तीला घाबरून सर्व संपत्ती विप्रदासच्या नावे ठेवण्याचा त्यांच्या वडिलांचा विचार होता; परंतु विप्रदास मात्र अर्धी इस्टेट द्विजदासची आहे असेच मानीत आला होता. इतकेच नव्हे तर काही वर्षांपूर्वी शशधरचा व्यवहार बुडला तेव्हा विप्रदासचा वाटा सुरक्षित ठेवून स्वतःचे जे होते ते सर्व शशधरसाठी खर्ची घातले होते व शशधरच्या लबाडीमुळे ते सर्व बुडाले होते. म्हणूनच विप्रदासला त्याची घृणा आलेली होती. कागदपत्रे तपासत असता द्विजदासला या गोष्टीचा थोडा–फार पत्ता लागलेला होता.

विद्वान बापाकडे पांडित्य शिकलेल्या मैत्रेयीच्या संकुचित विचा-

राचे त्याला आश्चर्य वाटले. एक–दोन मिनिटे तो जेवण थांबवून ताठरल्यासारखा स्तब्ध बसला. मग एकदम जाग आल्यासारखा होऊन तो म्हणाला, 'या घरावर मोठी आपत्ति आली खरी. तरी पण हेही खरं की, सामान्य मुलीच्या तोंडून निघणाऱ्या क्षुद्र संसारी दृष्टीनं बोलण्यापेक्षा तू अधिक काही बोलली नाहीस.' असे म्हणून तो उठून उभा राहिला. त्याचे जेवण झाले होते. त्याला वाटले, तिच्या मावशीच्या मेळाव्यातून बाहेर काढून वंदनेला मुखर्जी कुटुंबात सहज समाविष्ट करता आले असते. उलट, मैत्रेयीला येथून उचलून त्या समाजात सहज प्रविष्ट करता आले असते. वंदना शेवटी या कुटुंबात समाविष्ट होतेही. पिढ्यानुपिढ्या चालत आलेले या कुटुंबाचे ऐश्वर्य व त्याची मूल्ये एका सुशिक्षित, बुद्धिमान व ध्येयवादी तरुणीला सामावून घेऊन बळकट होतात.

मोडकळीस आलेल्या व मावळणाऱ्या मूल्यांना भावविवशतेने वृथा गौरवास्पद स्थान देण्याचा प्रतिगामी शरदबाबूंचा हा आणखी एक पवित्रा आहे. 'शेषप्रश्न' लिहून केलेल्या पापाचे 'विप्रदास' हे क्षालन आहे, असा सोयिस्कर समज करून घेणे सोपे असले तरी ते खरे नाही. समाजाची चौकट बदलत असली, समाजरचना बदलत असली, तरी त्याग, उदात्त प्रेम, धर्म, वात्सल्य, माणुसकी ही मूल्ये बदलत नाहीत. या मूल्यांबद्दल ज्यांना जवळीक आहे त्यांना विप्रदास ही एक महान कथा आहे असे नेहमीच वाटत राहील आणि ज्यांना कलादृष्टी आहे त्यांना या कादंबरीची आटोपशीर व घोटीव आकृती नेहमीच मोह घालीत राहील !

□

---

पुस्तके

## ललित–वैचारिक लेख

# आभाळातील अभ्रे

कधीकधी योगायोग फार विचित्रपणाने अनुभवाला येतात. प्रभाकर पाध्यांचं 'आभाळातील अभ्रे' वाचत होते आणि दूरदर्शनवर त्यांच्या निधनाची बातमी सांगितली गेली. पाध्यांचं हे अखेरचंच पुस्तक ठरलं साऱ्या विचारांनाच एकदम भूतकाळाचं रूप आलं.

मराठीतील लघुनिबंध हा प्रकार तसा मोठ्या प्रमाणावर फुललाच नाही; पण अलिकडे वृत्तपत्रांच्या साप्ताहिक आवृत्यांमधून अशा प्रकारच्या ललित, वैचारिक, आटोपशीर लेखनाला बऱ्यापैकी चालना मिळाली आहे. वर्ष–दीड वर्ष अशा प्रकारचे नियमित लेखन केल्यानंतर त्यांचे संग्रहही होत आहेत. 'आभाळातील अभ्रे' रविवार सकाळ 'मधून प्रसिद्ध झालेले लेख.

ललित लेखाला विषयांचे बंधन नसले तरी कोणत्याही विषयाकडे व्यक्तिगत दृष्टीने पाहणारा लेखकच उत्कृष्ठ लेख लिहू शकतो. साहजिकच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष ठसा तेथे उमटलेला असतो. पाध्ये हे बहुश्रुत, जगप्रवास केलेले, आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या व्यक्तींचा सहवास लाभलेले व्यक्तिमत्त्व. रूढ अर्थाने पाध्ये लोकप्रिय लेखक आहेत किंवा नाहीत हा वादग्रस्त मुद्दा असला तरी त्यांचा परखडपणा, अभ्यास, सत्यनिष्ठा आणि आग्रही वृत्ती वादातीत आहे. म्हणूनच 'रविवार सकाळ' मधून हे लेख प्रसिद्ध होत असतानाच त्यांना लोकप्रियतेची पावती मिळत होती.

पाध्यांनी एकूणच या सदरात असंख्य विषय हाताळले. निसर्ग, प्राणी, माणसे, थोर व्यक्तिमत्वे, स्वप्नसृष्टी, चित्रपट, पुस्तके, आणि किती तरी. या निमित्ताने ललित धर्तीवरील उत्तम लेखही परखड विचार मांडू शकतात हे पाध्यांच्या लेखणीने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

विचार मांडताना पाध्ये नेहमीच आपल्या विचारांशी प्रामाणिक राहिले आहेत. मग तथाकथित पुरोगामी काय म्हणतील ? आपण प्रतिगामी ठरू का ? रूढार्थाने लोक आपल्याला बुरसटलेला म्हणतील का ? याची पर्वा त्यांनी केलेली नाही. कारण अशी पर्वा करणं हा त्यांचा स्वभावच नव्हता.

स्त्रीमुक्ती, सामाजिक बांधिलकी, साडेतीन टक्क्यांची भाषा, हिंदुत्व आणि भारतीयत्व असे सध्या वादविषय म्हणून नाजुक ठरलेले आणि भलेभलेही ज्याला हात लावायला सहजपणे धजत नाहीत असे विषय पाध्यांनी चर्चिले आहेत तेही स्वतःशी प्रामाणिक राहून.

निसर्ग, प्राणी या विषयावरील लेख हे ललितलेखांचे उत्तम नमुने आहेत. 'बॉर्न फ्री' या चित्रपटाचे परीक्षण, 'सिंह आणि मानव' या लेखातील सिंहाच्या निमित्ताने 'स्वत्वा' विषयी केलेले विचारमंथन, 'आजचा महत्त्वाचा शोध' या लेखातील वाळवी, मधमाशी या कीटकांच्या जीवनक्रमातून सिद्ध केलेले आधुनिक मानवाचे अज्ञान, 'माणसाची तीन नाती' या लेखातील माणसाचे निसर्गाशी तुटत चाललेले नाते आणि निसर्गाच्या पूर्वकालीन विपुलतेमुळे, संपन्नतेमुळे भारतीय कसे आळशी बनले याची तर्कसंगती अंतर्मुख करणारी आहे.

विनोबा, कोस्लर, वालेसा, जेपींच्या प्रेमात पडलेली स्त्री हे लेख व्यक्तिविषयक आहेत. जेपींवर पाध्यांचे नितांत प्रेम. जेपींवर एकतर्फी प्रेम करणाऱ्या एका विदेशी स्त्रीबद्दल लिहिताना त्यांनी जेपींची तिच्यात कोठे गुंतवणूक झाली होती असे दूरान्वयानेही सुचविलेले नाही. त्या स्त्रीने मात्र 'कोस्लरच्या आश्रमात जेपींनी मद्य घेतल्याची बातमी चेहऱ्यावर सूड घेतल्याची भावना ठेऊन सांगितली. हे पाध्यांना मुळीच आवडले नाही.

विनोबांची तुलना खरं करताच येणार नाही असं स्वतःच अनेक उदाहरणे देऊन पटवून देणारे पाध्ये लेखाला शिर्षक मात्र 'भारताचा सॉक्रेटिस' असं देतात. आत्म्याचे अमरत्व मानण्याने देहाचा मृत्यू हा खरा मृत्यूच नाही हे तत्त्वज्ञान दोघांनाही पटले होते, दोघेही केवळ या एकच विषयावर एका पातळीवर येऊ शकतात, अन्यथा आणीबाणीची भलावण करणारा विद्वान म्हणून विनोबांशी पाध्यांचं सूत जुळण्यासारखं नव्हतंच; पण व्यक्तिविषयक लेख वाचताना एक जाणवतं. त्या व्यक्तीविषयी वैचारिक, तात्त्विक मतभेद व्यक्त करत असतानाही त्यांच्यातील बारीक गुणही ते

सांगत असतात. म्हणजे भांडणसुद्धा शत्रूचा मोठेपणा, शौर्य, पराक्रम मानूनच करावे, तसे करता येते हे त्यांनी स्वतःच्या उदाहरणाने सिद्ध केले आहे. त्यामागे त्यांचा अभ्यास आहे तितकाच मनाचा मोठेपणाही आहे.

कथा, कादंबरीच्या युगात ' ललितलेख ' हा वाङ्मय प्रकार गुदमरत असतानाच सातत्याने लेखन करणारे पाध्ये वृत्तपत्रातील ' सदरा 'चे आव्हान स्वीकारून दर्जेदार लेख लिहित होते. लोकांना ते आवडत होते; पण आता ती लेखणी थांबली आहे. समाधान एकच आहे, जवळजवळ अखेरपर्यंत प्रकृतीची तक्रार सांभाळूनही पाध्ये लिहित होते !

**— सौ. शशिकला उपाध्ये**

आभाळातील अभ्रे,
प्रभाकर पाध्ये,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
पृष्ठे १२६, कि. १८ रु.

## राजधानी दिल्ली

**पान ८ वरून**

जाणीव झाली. किंबहुना या भाषेतील वाङ्मय समजावून घेण्यासाठी इतर भाषिक अतिशय उत्सुक आहेत हेही वेळोवेळी लक्षात आले. या सेमिनारमुळे मराठी कवितेच्या प्रचलित प्रवाहांवर जो प्रकाशझोत पडला त्याचे सर्वांनी मोठ्या प्रमाणावर स्वागत केले.

३॥ ते ४ पर्यंत चहापान झाले. सर्व प्रतिनिधी ताजेतवाने होऊन आले. ठीक ४ वाजता उडियाचे चर्चासत्र सुरू झाले. दिल्लीच्या कथ्थककेंद्राचे अध्यक्ष उडिया कवी श्री. जीवन पाणी यांनी आपल्या निबंधाच्या आधारे भाषण केले. प्रा. जे. पी. दास (इंग्रजीचे प्राध्यापक) हे अध्यक्षस्थानी होते.

श्री. जीवन पाणी आपल्या भाषणात म्हणाले, कविता आणि संस्कृती यांचे देवघेवीचे नाते असते. अर्थातच जेव्हा समाजात मोठे स्थित्यंतर घडते तेव्हा कवितेच्या स्वरूपातही विशेष बदल घडून येतो. दळणवळणातील सुधारलेल्या साधनांमुळे नि पद्धतींमुळे जगातील अंतर कमी झाले. पाश्चिमात्य प्रवाहाचा भारतीय काव्यावर मोठा प्रभाव पडला. इ. स. १९५० ते ६० या काळात हा प्रभाव देशातील सर्व भाषांतील साहित्यात दिसून आला. काहीशी संदिग्ध वाटणारी परंतु अर्थगर्भी अभिव्यक्ती, छंद या रचनेतील नाविन्य, औपरोधिक शैली ही पाश्चिमात्य कवितेची वैशिष्टये आपल्याकडेही अवतरली. कवितेला असे आधुनिक वळण देणारा उडिया भाषेतील पहिला कवी म्हणजे ' सची राउतरे '. याच प्रवाहातील आणखी दोन कवी म्हणजे ' भानूजी राव ' व ' गुरुप्रसाद मोहंती '. १९५५ नंतर या दोघांच्या सुमारे ३० कवितांचा ' नूतन कविता ' हा संग्रह प्रसिद्ध झाला. गुरुप्रसाद मोहंती यांच्या काव्यावर टी. एस्. इलियटच्या काव्याचा विशेष प्रभाव दिसून येतो. १९६० नंतर प्रसिद्धीस आलेले नव्या पिढीचे आघाडीचे कवी म्हणजे ' रमाकांत रथ. ' तत्कालीन समाजातील भ्रष्टाचार, ढोंग, फसवणूक आणि त्यामुळे आलेले नैराश्य, रथ यांनी आपल्या कवितेतून उत्कटतेने चित्रित केले आहे. समकालीन समाजस्थितीचे यथार्थ दर्शन घडविण्यासाठी या आधुनिक कवींनी कवितेतील शब्द आणि भाषेच्या स्वरूपातही आमूलाग्र परिवर्तन घडवले.

या भाषणानंतर सुरू झालेली चर्चा दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता पुढे चालू राहिली. महाराष्ट्राप्रमाणेच ओरिसातही दलितांना दुःखं भोगावी लागली तरी त्या कवितेत दलितांच्या वेदना का प्रकट झाल्या नाहीत ? या श्री. दाभोळकरांच्या प्रश्नाला जीवन पाणींजवळ समाधानकारक उत्तर नव्हते. बाकीच्या प्रश्नाचे मात्र त्यांनी व्यवस्थित स्पष्टीकरण केले.

चहापानानंतर दुपारी १२ वाजता श्री. का. ना. सुब्रमण्यम् यांनी तामिळ कवितेसंबंधी आपले विचार मांडले. अध्यक्षस्थानी तामिळ कवी श्री. सलाई होते. श्री. सुब्रमण्यम् यांनी आपल्या भाषणात म्हटले, ' एखाद्या ध्येयवादाला चिकटल्यामुळे काव्यनिर्मिती होऊ शकत नाही... या शतकाच्या प्रारंभी सुब्रमण्यम् भारतींचा जेव्हा उदय झाला, तेव्हा तामिळ कवितेत एक प्रकारची पोकळी निर्माण झाली होती. पूर्वकवींच्या काव्यसृष्टीपेक्षा किती तरी विशाल सृष्टीचा अंतर्भाव सुब्रमण्यम् भारतींनी कवितेत केला. १९२१ मध्ये भारती अवघ्या ३९ वर्षांच्या अल्पायुमध्ये मरण पावल्यानंतर लगेचच्या काळात त्यांच्या कवितेचा प्रभाव काही काळ होता. त्यानंतर तमिळ कविता आणखी बदलली. या कवितेला गेयतेच्या बंधनातून मुक्त करणे, संगम काव्याच्या प्राचीन संभाषणात्मक शैलीचे पुनरुज्जीवन करणे, आणि गुळगुळीत रूपके आणि उपमा यांच्या पकडीतून कवितेची सोडवणूक करणे ही आमच्या नव्या कवितेची प्रमुख वैशिष्टये होती.'

दुपारच्या भोजनानंतर तमिळ पेपरवर बरीच वादळं उठली. हा ' करंट ट्रेंड ' वरील पेपर म्हणताच येणार नाही. यात कवी व वक्ते का. ना. सुब्रमण्यम् यांनी आत्मस्तुती बरीच केली आहे. येथपासून, ' भारताबाहेरील तमिळ कवींचा काही वेगळा प्रकार आहे का, त्याचा भारतीय तमिळ कवींवर काही परिणाम झाला का ? संस्कृतला मृतभाषा का म्हणता ?' वगैरे प्रश्नांची सरबत्ती झाली. का. ना. हे तसे मोठे कवी मानले गेले, तरी जुन्या काळातीलच कवी असल्यामुळे तमिळ कवितेतील नवीन प्रचलित प्रवाहांविषयी ते फारसे समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत.

दोन दिवस चाललेला हा सेमिनार चहापानानंतर संपला. या निमित्ताने भारतीय भाषांतील वाङ्मयाची एकमेकांना ओळख करून देऊन त्यांचा अधिक अभ्यास करण्याची व ते जाणून घेण्याची प्रेरणा उपस्थितांच्या मनात या सेमिनारने निश्चितपणे निर्माण केली, हे या सेमिनारचे खरे यश.

**— ललिता मिरजकर**



## रंगभूमी

# दोन घटका रंजन करणारे 'सख्खे सख्खे शेजारी'

वि. भा. देशपांडे

अनेकदा असे म्हटले जाते की, एखाद्या कलावंताला रंगभूमीचे आकर्षण मूळचेच असेल तर तो अन्य कलामाध्यमे कितीही यशस्वीपणाने हाताळून आला तरी त्याला रंगभूमीचे आकर्षण अधूनमधून वाटतेच. त्यासाठी आपण काही करावे अशी एक ओढ राहतेच. सई परांजपेंबाबत नेमके असेच आहे. बालनाट्य, प्रौढनाट्य, आकाशवाणी, दूरदर्शन आणि चित्रपट अशा आव्हानात्मक माध्यमांतून सईचा गेल्या वीस–पंचवीस वर्षांचा प्रवास मी पाहतो आहे. या प्रत्येक क्षेत्रात तिने आपली गुणवत्ता सिद्ध केलेली आहे. सर्व कलामाध्यमांमध्ये संचार झाल्यावर तिला नाटक लिहिण्याची, दिग्दर्शित करण्याची ऊर्मी आली तर समजू शकते. तितकी तिची कलात्मक गुणवत्ता आणि प्रयोगनिर्मितीसाठी आवश्यक असलेला ताजेपणा तिच्या ठिकाणी जरूर आहे.

'सख्खे सख्खे शेजारी' हा एक आनंददायी, काहीसा संगीतयुक्त मुक्त नाट्यप्रकार आहे; पण हे नाटक नव्हे. पूर्वी जसे सईने 'नांदा सौख्य भरे' हे फ्रेंच रिव्ह्यू पद्धतीचे लेखन केलेले होते, त्याच्याच जवळ जाणारे; पण अधिक ताजे वाटेल असे हे लेखन केलेले आहे. हे रूढार्थाने नाटक नव्हे याचे कारण सरळ आहे. कथानकाची सलगता, व्यक्तिरेखनाची वजनदार अर्थपूर्ण निर्मिती, नाट्याशयातील सघनता ह्या साऱ्या गोष्टी या ठिकाणी पृष्ठपातळीवर वावरणाऱ्या आहेत. यातील घटना–प्रसंगाची बांधणी आणि त्यातून साधलेली विनोद निर्मिती यातही आता नाविन्य नाही. ज्यांनी सईचे 'नांदा सौख्य भरे' दूरदर्शनवरील गजरे आणि 'कथा' सारखे चित्रपट पाहिले असतील त्यांना 'सख्खे शेजारी' कसे असतील हे नव्याने सांगण्याची गरज नाही. मात्र सईच्या संवादलेखनातील सतेजपण, चटपटीतपणा आपल्याला मोहवीत असतो, तसेच या शेजाऱ्यांमधील आंतरक्रियात्मक संबंध या ठिकाणी अधिक सुस्पष्ट आणि जाणीवपूर्वक सतत वापरात ठेवलेले आहेत. अर्थात घटकाभराची करमणूक एवढेच सईला अभिप्रेत असेल तर ते घडले आहे; पण ते उत्तम कार्य यापेक्षा किती तरी अधिक पटींनी तिने स्वतःच्याच लेखनाने यापूर्वी घडवलेले आहे. सई नाटक किती उत्तम रीतीने लिहू शकते याचा चांगला पुरावा म्हणजे तिचे 'जास्वंदी' हे नाटक! विजया मेहतांनी ते नाटक तितक्याच तोलामोलाने पेश केलेले होते याचे स्मरण अनेकांना आहे. सईकडून इतक्या दर्जेदार नाट्यलेखनाची अपेक्षा आहे. अशी अपेक्षा तिनेच आपल्या लेखनगुणांनी निर्माण करून ठेवली आहे.

सईने आपल्या लेखनातील उणीव दिग्दर्शनात भरपूर प्रमाणात भरून काढली आहे. सई जशी उत्तम लेखिका आहे तशीच ती उत्तम दिग्दर्शिकाही आहे. एखादा नाट्यप्रयोग जर परिणामकारी करावयाचा असेल तर त्यासाठी दिग्दर्शनाच्या कोणत्या हातोट्या वापरायच्या हे तिला सहजपणाने अवगत आहे. विशेषतः पात्रांच्या रंगमंचीय हालचाली, त्यांची विरचना संगीत ह्यांमधून आवश्यक तो परिणाम या प्रयोगात साधला आहे. हालचाली आणि विरचना यांचा विचार करताना संपूर्ण प्रयोगाची आंतरिक गती निश्चित करावी लागते, त्यावर दिग्दर्शकाचे नियंत्रण असावे लागते. ते जर पुरेसे असेल तर संपूर्ण प्रयोगाचा संकलित परिणाम प्रेक्षकमनावर यथायोग्य होत राहतो. या साऱ्या गोष्टी सईने अतिशय सहजपणाने, सावधपणाने आणि अर्थातच कलात्मक जाणीवेने केलेल्या आहेत हे जाणवत राहते. सईचे दिग्दर्शन ही जशी या प्रयोगाची जमेची बाजू आहे, तशीच आणखी एक गोष्ट म्हणजे तिने केलेली नेपथ्यसंकल्पना. तीन शेजाऱ्यांची तीन घरे, कधी बाहेरून तर कधी आतून दृश्यरूपात आलेली दारे खिडक्यांसाठी चौकटींचा वापर. मोजक्या तुकड्यांच्या आधाराने हे नेपथ्य उभे राहिले आहे. या घरांची रंगसंगती आणि प्रत्येक घराचे वेगळेपण सांगणाऱ्या सूचक गोष्टींचा वापरही उत्तम रीतीने झालेला आहे.

नेपथ्यसंबंधात महत्त्वाचे खटकले ते म्हणजे ज्या वेळी प्रसंगबदलामुळे नेपथ्यबदल अपरिहार्यपणाने करावा लागत होता, त्या वेळी रंगमंचावरचो तीन–चार फूट जागा सोडून एक गुंडाळी निळा पडदा सतत येत होता. ही तर सनातन पद्धत झाली. त्याची गरज नव्हती. एक तर एकूणच लेखन–दिग्दर्शन–अभिनय यासाठी जी प्रयोगरीती किंवा शैली सईने स्वीकारलेली होती ती मुक्त स्वरूपाची होती. त्याच सूत्रात नेपथ्यबदल हा केवळ अंधारयोजना करून किंवा अगदी चक्क प्रेक्षकांच्या समोर हा बदल करता आला असता. नाही तरी नाटकातले वरकामाचे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी एक 'अगांतुक किंवा पाहुणा कलाकार' वापरलेला होताच. तसे बदल घडते तर प्रयोगाला खंडित अवस्था आली नसती. अजूनही हे करून पाहण्यासारखे आहे! यशवंत देव यांच्या संगीताने वातावरणनिर्मिती चांगली केली.

दिग्दर्शन–नेपथ्य यांच्या तोडीस तोड असा कलाकारांचा संच सईला या प्रयोगासाठी लाभला. दिग्दर्शकाचे निम्मे यश त्याने निवडलेल्या संचात असते असे आपण नेहमी म्हणतो, त्याचा प्रत्यय या ठिकाणीही आला. अरुण जोगळेकर, सतीश पुळेकर, मंगेश कुलकर्णी, मीना गोखले, सुहास जोशी, संजीवनी बीडकर आणि अरुण होर्णेकर या प्रत्येक कलाकाराचे किमान एक आणि काहींची अनेक नाटके आपण सर्वांनी अनेकदा पाहिलेली आहेत. या कलाकारांनी आपली अभिनयगुणवत्ता वेळोवेळी सिद्ध केलेली



**‘ शेजारी ’ त सतीश पुळेकर, अरुण जोगळेकर आणि मंगेश कुलकर्णी**

□

आहेच. यातही अरुण जोगळेकर आणि सुहास जोशीचा रंगमंचीय अभिनयाचा अनुभव अधिक काळाचा आहे. त्या अनुभवाला साजेलसा अभिनय त्यांनी केला. म्हणजे असे की, प्रेक्षकाशी संवाद करण्याची पद्धती मुद्राभिनय, विनोदासाठी वेळेचा अचूकता साधणे वगैरे गोष्टी परिणामाच्या दृष्टीने त्या दोघांनी सातत्याने वापरल्या. त्यातही सुहासने बाजी मारली. सतीश पुळेकर आणि मंगेश कुलकर्णी या दोघांनी आपल्या वाट्याला आलेल्या भूमिका नुसत्या योग्य केल्या असे नव्हे तर नाटकाची रंगत वाढण्यासाठी आपली अभिनय–ताकद खर्ची घालून मजा आणली. या दोघांचे आणखी कौतुक असे की, प्रयोग फार्सच्या पातळीवर न नेता विनोदाच्या स्तरावर ठेवला. अनेक ठिकाणी शब्द आणि कृतिद्वारा आचरटपणाकडे झुकणारा विनोद निर्माण करणे शक्य होते; पण त्यांनी आणि इतरांनीही तो संयम राखला. मीना गोखले ही तशी व्यावसायिक नाटकात यापूर्वी एकदाच दिसलेली (मंतरलेली चैत्रवेल) तसेच दूरदर्शनच्या काही नाटकांतून तिने कामे केलेली. तिची जी थोडीच कामे मी पाहिली आहेत त्यावरून तिची अभिनयगुणवत्ता जाणवून देणारी ती आहेत. तिने या प्रयोगात योग्य त्या वेळी आवाजाचा वरच्या पट्टीतला उपयोग, आवेशयुक्त रंगमंचीय संचार अनेक प्रसंगांची खुमारी वाढवणारा होता. विशेषतः बायकांच्या बंडखोरीच्या प्रसंगांमध्ये ! संजीवनी बीडकर ही तर रंगमंचावरची सराईत कलावती आहे. तिचे दिसणे, नृत्य आणि अभिनय यांचा याच क्रमाने या प्रयोगात वापर झाला. अरुण होर्णेकर हा हरहुन्नरी कलावंत आहे. त्याने प्रायोगिक नाटकांपासून आपला नाट्यप्रवास आरंभित करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते; पण मध्यंतरीच्या काळात तो ‘ गरम ’ नाटकवाल्यांच्या कळपात गेला होता. या प्रयोगाच्या निमित्ताने तो पुन्हा योग्य मार्गी आला असे वाटते; (पण त्याचा तसा काही भरवसा नाही ! ) त्याच्याकडे रंगमंचावर वावरण्याची एक विलक्षण सहजता आहे, वाक्यफेकीची स्वाभाविक अशी पद्धती आहे, त्यामुळे तो कोणतीही भूमिका झकास करून जातो. त्याने या ‘शेजारी ’ मध्ये इतक्या अगांतुक आणि पाहुण्या भूमिका केल्या आहेत की त्या आठवणेही कठीण जावे !

‘ रंगयात्री ’ संस्थेच्या मधुकर नाईकने ‘ दुभंग ’, ‘ मुखवटे ’ या नाट्यनिर्मितीनंतर एक वेगळ्या प्रकारची ही हसरी नाट्यकृती आणून प्रेक्षकांची घटकाभराची करमणूक केली आहे. हे शेजारी सख्खे किती आणि सावत्र किती हे समक्षच जाऊन पाहायला हवे ! □

चित्रपट

## पहाताना लाज वाटते असा

# तोहफा

परवा तोहफा पाहिला. मला मनापासून तो सिनेमा काही फारसा वाईट वाटला नाही; पण मला माझीच जबरदस्त तिडीक आली. मला न आवडणाऱ्या गोष्टी कुणी मला दाखवल्या तर मी साधा चिडूदेखील शकत नाही याचीच मला लाज वाटली.

तसं पाह्यला गेलं तर मला ‘तोहफा बघायला यायचं हं.’ असं श्रीदेवी म्हणाली नव्हती की प्रभातचे मालकही. मी माझ्या इच्छेने गेलो. सिनेमा सुरू झाल्यावर काही वेळात मला उठून येता आलं असतं; पण तरीही मी तो सिनेमा शेवटपर्यंत पाहिला.

दोन बहिणी. गरीब-मोठी गावच्या जमीनदाराकडे मोलकरीण. धाकटी कॉलेजात. जमीनदाराच्या मुलाबरोबर धाकटीचं प्रेमपांचट योगायोग. धाकटीचा ‘ग्लिसरिनाईज्ड’ त्याग. मोठी बरोबर जमीनदारपुत्राचा विवाह. परत योगायोगांचा कहर. शेवटी पोटची मुलगी धाकटीच्या पदरात टाकून मोठीचे बलिदान ! चवीसाठी एक विनोदी खलनायक आहे, किळसवाणे विनोद करणारे विनोदी नट आहेत, आणि गाणी आहेत. असा एकूण हा सिनेमा. थोड्या-फार प्रमाणात बदल करून ह्याच्या आधीही तुम्ही हा सिनेमा वेगळ्या नावानं पाहिला असेल.

ह्या सिनेमातल्या विनोदी खलनायकाचे नाव आहे कामेश. हा कामेश काहीही करतो. आपल्या ७०–७५ वर्षांच्या आजीला काठीने झोडपून जीव घेईन अशी खोडकर धमकी देतो आणि इतकंच नव्हे तर तिच्या आजूबाजूला म्हणजे डोक्याच्या थोड्या वर, पायाजवळ, हाताजवळ काठी आपटतो. त्यामुळे ती म्हातारी बिचारी केविलवाणी ओरडत असते, आणि तिची दुर्दैवी गम्मत पाहून प्रेक्षागृह हास्यसागरात बुडून जातं. कामेशही तोंडानं म्हणत असतो. ‘ तुम बुढिया नहीं सडी हुई चिडिया हो ! ’

दुसरा धमाल विनोदी प्रसंग म्हणजे कामेशला संपत्तीचा वाटा हवा असतो. यासाठी तो तरकीब काढतो की मी गावातल्या लोकांना छळीन. ब्राह्मणांना त्रास देईन, तरुण मुलींवर बलात्कार करीन, लोकांना उगाचच बडवीन! दुर्दैवानं हिंदी सिनेमातले पोलीस एक तर कर्तव्यकठोर असतात, नाही तर नसतातच. इथे ते नाहीत. त्यामुळे कामेश असं ठरवू शकतो. या आयडियेतून आजीकडे तक्रारी जातील, ती त्याला हाकलून देईल. त्या वेळी हा संपत्तीचा वाटा मागेल अशी त्याची योजना असते. ही योजना तो स्वत: लोकांना सांगतो.

नंतर लगेचच आचरटपणे सुरू करतो. एक कुबडा ब्राह्मण सकाळी तळ्याजवळ काही तरी मंत्र वगैरे म्हणत असतो. हे पाहून कामेश बरोबरच्या मित्राला म्हणतो, 'आता जातो आणि या ब्राह्मणाच्या कुल्ल्यावर लाथ मारतो, म्हणजे तो माझी तक्रार करेल' मित्र म्हणतो, 'नको ते महापाप!' कामेश ऐकत नाही. लाथ मारतो. प्रेक्षागृहात हास्याचा स्फोट. पाण्यात पडल्या पडल्या ब्राह्मण ओरडतो, 'काय रे, माझ्या कुल्ल्यावर का लाथ मारलीस ? तुझ्या पायात किडे पडोत!' वगैरे. कुल्ल्याचा हा असा पुन्हापुन्हा डायरेक्ट उल्लेख लोकांचा हुकमी हशा मिळवतो.

यानंतरचा बेफाम विनोदी प्रसंग म्हणजे कामेश आपल्या पत्नीला मधु-चंद्राची योजना सांगतो. 'निवानपूर स्टेशनवर आपण प्रेम करायला लागू. गालगुंडा स्टेशन आलं की मी चुंबन घ्यायला लागीन तुझ्यागालांची! (त्या वेळी कामेश तोंडाने चुंबनाचा बीभत्स आवाजही करतो.) त्यानंतर निकटपूर स्टेशनला आपण एकमेकांच्या निकट येऊ. चिरागपूर स्टेशनवर दिवा घालवू आणि दर्यापूरपर्यंत आपण एकमेकांच्या प्रेमाच्या सागरात डुंबून जाऊ!' इथं तर अक्षरश: हास्याचा धबधबाच पाहायला मिळाला मला थिएटरात!

त्याचबरोबर या सिनेमात कामेश नेहमी म्हणत असतो की, मी वाईट मुलींकडे कधी जात नाही. चांगल्या मुलींना वाईट करतो, नासवतो!

आत्माराम हेही एक असंच पात्र. हा सिनेमात नायकाचा कारकून आहे. याला ६ मुलं आहेत. नावं सोमवार ते शनिवार. आत्मारामची बायको म्हणते, 'मला मुलगी हवी. तिचं नाव रविवार ठेवू!' आत्माराम म्हणतो, 'नाही. रविवारी सुट्टी!' बायको म्हणते, मला मुलगी आवडते. आत्माराम म्हणतो, 'मला पण. पण बाहेरची.' मग बायको पलंगावर पडते आणि गुडघ्यापर्यंत साडी वर करून तंगड्या हलवत, द्या ना मूल, द्या ना मूल असा नवऱ्याला लकडा लावते.

या सिनेमातल्या नायकाची पत्नी मूल होत नाही म्हणून दु:खी असते. आत्मारामची मुलं आईनं हाक मारल्यावर ताबडतोब पळतात हे पाहून तिला फार वाईट वाटतं की, मुलं माझ्याकडे राहत नाहीत. एवढ्यात नायक येतो. नायकाला ही व्यथा पत्नी सांगते, नायक म्हणतो, 'अगं मुलं आईचीच. त्यांच्या आईकडेच ती जाणार. त्यापेक्षा तू हे बघ की, अजूनही आपण दोघं तरुण आहोत आणि तुला आईही व्हायचंय. शेत घरचंच आहे. मोसमही चांगला आहे. लगेच सुरुवात करू मनापासून, काय?'

तर सिनेमातले हे काही किस्से. मी बघत होतो. ब्राह्मण पडल्यावर मला हसूदेखील आलं होतं; पण तरीही मला शिसारी आली होती माझीच. एका कुबड्याला एखाद्याने लाथ घातली की, मला हसू येतं. खूप म्हाताऱ्या बाईला तू साजूक तूप खाल्लंयस पूर्वी तू काय मरतेस लवकर? असं म्हटलं की मला हसू येतं? की निर्लज्जपणे मला मूल द्या, मला मूल द्या असं नवऱ्याला सांगणाऱ्या बाईचं मला हसू येतं? मला हसू का आलं? मला अजूनही उत्तर सापडलेलं नाही.

त्याचबरोबर या सिनेमातली गाणी. समुद्रावर पाणी भरायला गेलेली नायिका (तोंडानं नदी म्हणत असते; पण काठची वाळू पांढरी आणि पाणी निळं आहे.) नायकाच्या तावडीत सापडते. मग नायक तिचा हंडा समुद्रात फेकून देतो आणि म्हणतो, हजारो देईन तो एक गेला तर! यानंतर लगेचच हजारो हंडे आणि कळशांमध्ये नाच करत एक गाणं आहे. दुसरं गाणं वेगवेगळ्या किंमती साड्यांच्या मांडवात आणि सगळीकडे साड्या पसरलेल्या बागेत एक गाणं आहे. इतर दोन-चार आहेतच. ही दोन गाणी अशा तऱ्हेने का चित्रित केली ते मला कळू शकत नाही.

असा हा तोहफा. यामध्ये मधुचंद्राचे गलिच्छ वर्णन आहे. समुद्रावर पाणी भरणारी नायिका आहे. मूल मागणारी विनोदी पत्नी आहे, आपल्या आजीला बडवू-बडवू म्हणणारा विनोदी खलनायक आहे आणि घरच्या शेतीत पीक काढू असं सूचक बोलणारा नायक आहे.

—नितीन ठाकूर


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

—प्र. बा. भोसले

संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

ले. विजय परुळकर

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : ३६ रुपये

# नाट्यपंढरी



### ❑ 'आग्र्याहुन सुटका'ची सुटका

नागपूर मुक्कामात केशवराव दाते 'समर्थ नाटक मंडळी'त आले. त्या वेळी औंधकरांनी 'आग्र्याहून सुटका'चे दोन अंक लिहून पुरे केले होते. दाते आल्यावर सहाजिकच त्यांना हुरूप आला. त्यांनी नाटक पुरे केले. केशवरावांनी कस्सून तालमी घेतल्या नि नागपूर मुक्कामातच कंपनीने नाटक बाहेर काढले. प्रयोग सुरेख झाला. नागपूरकरांना आवडला. नाटक पैसे देणारे ठरले. दाते, औंधकर, वैशंपायन, सीतारामपंत जोशी हा आधीचा 'महाराष्ट्र'चाच कसदार नटसंच होता.

अमरावती–अकोल्यालाही प्रयोग झाले; पण या ठिकाणचे मुसलमान लोक नाटकावर नाराज आहेत, अशा तक्रारी दाते–औंधकरांच्या कानांवर येत होत्या. वाशिमच्या मुक्कामात तर चक्क एका मुस्लिम पोलीसइन्स्पेक्टरने थिएटरवर येऊन खेळ बंद केला. मालकमंडळींनी मेकप उतरून प्रेक्षकांचे पैसे परत केले; पण हा झालेला प्रकार त्या गावच्या पुढारी मंडळींना फार लागला. दुसऱ्या दिवशी ही मंडळी कंपनीच्या बिऱ्हाडी आली आणि त्यांनी खेळ झालाच पाहिजे असा हट्ट धरला! 'तुम्ही खेळ करा, बाकी सर्व जबाबदारी आमची' –झाले.तिसऱ्या दिवशी, नाटक उभे राहिले. दाते सांगतात. 'स्टेजवरून समोर पाहिले, तो खुर्चीपासून पिटापर्यंत प्रत्येक प्रेक्षकाच्या हातात काठी होती. तसेच थिएटरच्या बाहेर, चार चार पाच पाच, जवान लोकांचा गट पहारा करीत होता. नाटकाला चिक्कार गर्दी होती. त्या मुसलमान इन्स्पेक्टरची थिएटरवर फिरकण्याची छाती झाली नाही. ही वाशिमकरांची जिद्द मात्र पुढे कुठे दिसली नाही.

### ❑ अंगाऱ्याचा प्रभाव

'समर्थ नाटक मंडळी' जळगावला पोचताच खुद्द कलेक्टरसाहेबांचीच 'आग्र्याहून सुटका'च्या प्रयोगावर बंदी आली. दात्यांनी कलेक्टरची भेट घेण्याचे ठरविले. दाते–वैशंपायन जोडी, चोपडद्यास कलेक्टरच्या भेटीला गेली. कलेक्टर इंग्रज होता. या खेळाच्या उत्पन्नावर पाउणशे माणसांची उपजिविका अवलंबून असल्याचे दात्यांनी त्याला समजावून सांगितले. ते मान्य करूनही कलेक्टरसाहेबम्हणाले, 'या तुमच्या नाटकात औरंगजेबाची मुलगी झेबुन्निसा शिवाजीला भेटते, हे मुसलमानांना पसंत नाही. त्यांच्या भावना दुखावतात.' त्यावर केशवरावांनी त्यात धार्मिक भावना दुखविणारे काही नाही म्हणून स्पष्ट केले; परंतु कलेक्टरला ते पटेना. शेवटी त्यावर तोडगा म्हणून बदल करण्याचे दात्यांनी मान्य केले. तसे लिहून दिले. त्यावर कलेक्टरची सही झाली नि प्रयोगाची परवानगी हाती पडली. मग औंधकरांनी झेबुन्निसाचे हिंदूकरण करून 'राजकुंवर' (राजा जयसिंगाची कन्या) औरंगजेबाची मानलेली लाडकी मुलगी दाखविली. दाते नि कलेक्टर यांची चर्चा चालू असताना, इंग्रजी येत नसल्यामुळे वैशंपायन गप्प बसून होते; पण एकीकडे, टेबलाखाली वाकून कलेक्टरसाहेबांच्या दिशेने हातातला अंगारा फुंकीत होते 'असे करू नकोस' म्हणून दात्यांनी त्यांना एकदोन वेळा डोळ्यांनी दटावलेही. कारण साहेबाच्या लक्षात आले असते, तर हा काही तरी चेटूक करीत आहे म्हणून भानगड झाली असती. बाहेर पडताना, दाते वैशंपायनांना म्हणाले, 'अरे हे तुझं करणं, साहेबाच्या लक्षात आलं असतं तर आपण पकडले गेलो असतो?' त्यावर वैशंपायन शांतपणे म्हणाले, 'तसं होईलच कसं? ती कोंडिबामहाराजांची कृपा आहे. त्या अंगाऱ्यामुळे तर आपल्याला परवानगी मिळाली.' 'यावर आता दाते काय सांगणार? दाते म्हणतात,' 'परवानगी मिळण्यातली ग्यानबाची मेख वेगळीच असावी. आम्ही साहेबाला भेटलो ती डिसेंबरची तेवीस तारीख होती. साहेब नाताळसाठी मुंबईला जाण्याच्या गडबडीत होता म्हणून लगेच परवानगी हाती पडली. काही का असेना– गुरूची कृपा असो नाही तर, कोंडिबामहाराजांची असो, आमचे काम झाले एवढे खरे.'


### ❑ शिवाजी–औरंगजेब पळाले!

'आग्र्याहून सुटका' उभ्या महाराष्ट्रात गाजत होते. ज्या ज्या गावी कंपनी जाई, तिथे आधी मुसलमान पुढाऱ्यांची समजूत घालावी लागे. मुसलमानांच्या भावना दुखावण्यासारखे त्यात काही नाही, हे पटवावे लागे. बरे, इतके करूनही प्रयोग सहिसलामत होईलच याची शाश्वती नसे. अशाच वातावरणात कंपनी मुंबईत आली नि रिपन थिएटरमध्ये प्रयोग लावला. खिलाफतच्या लोकांना औंधकरांनी नाटकाला बोलावले होते. मुसलमानांना खुपण्यासारखे काही असल्यास, ते बदलण्याची समजूतदार भूमिका कंपनीची होती. कारण नाटक रंगणारे नि भरपूर कमाई करून देणारे होते.

प्रयोग सुरू झाला. पहिले दोन अंक सुरळीत पार पडले. तिसऱ्या अंकातला, राजकुंवर–औरंगजेब (सीतारामपंत जोशी–राजकुंवर, केशवराव दाते–औरंगजेब) प्रवेश सुरू झाला. तोच पुढच्या रांगेतून दोन तीन मुसलमान तरुण, चाकू काढून ओरडत स्टेजवर चढले, दिवे पाडल्या, आरसे फोडले, नट वर्ग रंगपटात पळाला. औरंगजेबाने राजकुंवरला सावरत तळघर गाठले. गडबड सुरू झाली. प्रेक्षक पळाले! प्रयोगाला पोलीस परवाना असूनही हे घडले. Evening News मध्ये बातमी छापून आली, 'शिवाजी–औरंगजेब खेतवाडीतून पळाले.'

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd No. PNCW–28


# ज्यावेळी दोघेजण तुमच्यावर अवलंबून असतात त्यावेळी एकाचा विमा उतरविणे आवश्यक असते. अर्थात् तुमचा स्वतःचा!



तुमचे कुटुंब सुरक्षिततेसाठी तसेच संरक्षणासाठी सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून असते. आयुर्विमा उतरवा जेणेकरून पुरेसा वित्त-संचयाचा आधार तुम्ही तुमच्या कुटुंबासाठी निर्माण करू शकाल. पॉलिसी संपूर्ण रकमेसाठी चालू असतांना केवळ एक हप्ता भरल्यानंतर दैववशात् मृत्यू घडल्यास विम्याची संपूर्ण रक्कम तुमच्या कुटुंबाला दिली जाते. अशा प्रकारचे संपूर्ण संरक्षण केवळ आयुर्विमा महामंडळच देऊ शकते. इतर कोणत्याही खाजगी बचत अथवा अमानत रक्कम योजना हे संरक्षण देऊ शकत नाहीत.

इतर योजनाहून आयुर्विम्याचे निश्चित फायदे कोणते हे तुम्हाला आयुर्विमा एजंट समजावून सांगेल. तुमच्या कुटुंबाच्या गरजानुसार योग्य पॉलिसीची निवड करण्यासाठी तो मार्गदर्शन करील. आजच त्याचा सल्ला घ्या अथवा नजिकच्या आयुर्विमा कार्यालयाशी अधिक माहितीसाठी संपर्क साधा.

सुरक्षित भविष्यासाठी आजच आयुर्विमा उतरवा.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**